सभापतीस्थानी - माननीय सभापती

कापसाच्या प्रश्नासंबंधी

सभापती : आता प्रश्नोत्तराचा तास घेण्यात येईल.

श्री.पांडु रंग फुंडकर : सभापती महोदय, काल सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला सारुन विदर्भ, खानदेश आणि मराठवाडा या विभागातील शेतकऱ्यांच्या कापसाच्या प्रश्नासंबंधी या सदनामध्ये चर्चा व्हावी आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यावा या मागणीसाठी विरोधी पक्षा तर्फे प्रस्ताव देण्यात आला होता.त्यानुसार सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला सारुन या विषयावरील चर्चेला सुरुवात झाली. मात्र ही चर्चा अपूर्ण असून काही सन्माननीय सदस्यांना या विषयाबाबत आपली मते मांडावयाची आहेत आणि त्यानंतर यासंबंधातील शासनाचा निर्णय सदनासमोर येणार आहे. त्यामुळे काल अपूर्ण असलेल्या विषयावरील चर्चा लगेच सुरु करण्यात यावी आणि कापसाच्या संदर्भात जो प्रश्न निर्माण झालेला आहे तो मिटविण्यात यावा. मग उर्वरित कामकाज करण्यात यावे असा आम्ही याबाबत जो प्रस्ताव दिला होता त्यातील आशय होता. त्या मुळे आता कालपासून सुरु असलेल्या चर्चेमध्ये खंड पाडून वेगळे कामकाज सुरु करावयाचे आणि कालपासून सुरु असलेल्या चर्चेला बाजूला ठेवावयाचे आणि सदरहू चर्चा सर्व कामकाज संपल्या-नंतर मग कधीतरी सुरु करावयाची हे योग्य होणार नाही आणि आपण कापूस उत्पादक शेतकऱ्याला न्याय दिला आहे असेही होणार नाही. म्हणून माझी आग्रहाची मागणी आहे की, आजही कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेले कोणतेही कामकाज न करता सदरहू चर्चेला ताबडतोब सुरुवात करावी आणि या विषयाच्या संबंधातील चर्चा संपल्यानंतरच कामकाज पत्रिकेवरील उर्वरित कामकाज घेण्यात यावे अशी माझी मागणी आहे. त्यामुळे आता प्रश्नोत्तराचा तास सुरु करु नये अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांना सांगू इच्छितो की, विदर्भामध्ये धानाचा प्रश्न आहे आणि कोकणामध्ये भाताच्या संबंधातील प्रश्न आहे. तसेच मला शासनाला मनापासून धन्यवाद द्यावयाचे आहेत. कारण काल आम्ही शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी चर्चा करण्याचा आग्रह धरला आणि शासनानेही त्याला मान्यता दिली. काल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिवसभर या विषयावर चर्चा झाली असून,आता यासंबंधात शासनाकडून उत्तर मिळाले पाहिजे असा आमचा आग्रह आहे. मात्र नियमाप्रमाणे संध्याकाळी 6.00 वाजता ही चर्चा थांबवावयाची आहे.

श्री.दिवाकर रावते .. . .

त्याप्रमाणे सदरहू चर्चा थांबविण्यात आली. जर ही चर्चा अर्धवट राहिली असेल तर ती ताबडतोब सुरु करुन त्याबाबत माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर यावयास पाहिजे अशी पध्दत आहे. त्यामुळे विदर्भातील कापूस उत्पादक, धान उत्पादक आणि फळ उत्पादक शेतकरी मोठ्या आशेने वाट पहात आहे की,आपल्या बाबतीत सदनामध्ये काही निर्णय घेतला जाईल. या विषयाच्या बाबतीत सदनामध्ये चर्चा सुरु झाल्यानंतर येथील शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. अशावेळी आजच्या कामकाज पत्रिकेवरील इतर कामकाज केल्यानंतर मग या विषयावरील चर्चा घेण्यात येणार असेल तर मग शेतकऱ्यांच्या प्रश्नाला दुय्यम स्थान दिल्यासारखे होईल आणि तसे करणे आम्हाला मान्य नाही. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत इतर कोणतेही कामकाज न घेता या विषयाच्या संबंधातील चर्चा तातडीने पूर्ण करावी अशी मी आग्रहाची भूमिका मांडतो आणि आपल्याही विनंती करतो की, आपण काल शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा जो सन्मान केला, तशा प्रकारे आजही सन्मान करावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

. . . .अे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता श्री पांडुरंग फुंडकर जी और माननीय सदस्य श्री रावते जी ने प्रश्न काल को स्थगित करने का अनुरोध आपसे किया है, मैं समझता हूं कि ऐसा करना बाकी सदस्यों पर अन्याय करने जैसा है. आपने कल जो रुलिंग दी थी, उसके हिसाब से कल किसानों की समस्याओं पर चर्चा शुरु हुई. आज यह चर्चा फिर से चालू होगी. लेकिन प्रश्न काल को स्थगित करके यह चर्चा आज फिर से चालू करना ठीक नहीं होगा.

(व्यवधान)

सभापति जी, विपक्ष के माननीय सदस्यों को जिस प्रकार बोलने का अधिकार है, उसी प्रकार से मुझे भी यहां पर बोलने का अधिकार है. इसलिए विपक्ष के माननीय सदस्य मुझे बोलने से रोक नहीं सकते. जिस प्रकार हम विपक्ष के माननीय सदस्यों की बात सुनते हैं, उसी प्रकार विपक्ष के माननीय सदस्यों को भी हमारी बात सुननी पड़ेगी. मेरा कहना यही है कि प्रश्न काल को स्थगित करना तर्कसंगत नहीं होगा. प्रश्न काल समाप्त होने के बाद ही यहां पर आज किसानों की समस्या पर चर्चा होनी चाहिए. किसानों की समस्या के लिए जितनी चिंता विपक्ष के माननीय सदस्यों को है, उतनी ही चिंता सत्तारुढ़ पक्ष के माननीय सदस्यों को भी है. इसलिए मेरा आपसे अनुरोध है कि कृपया आप प्रश्न काल स्थगित न करें.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी एक मुद्दा उपस्थित केला आहे.खरेतर काल देखील प्रश्नोत्तराचा तास व्हावयास हवा होता.परंतु विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या दृष्टीकोनातून कापूस, सोयाबीन आणि धान हे अतिशय महत्वाचे विषय आहेत. त्यामुळे सरकार देखील या मुद्यांबाबत सहानुभूतीपूर्वक चर्चा करण्यास तयार होते. त्यानुसार काल आपण सभागृहा-समोरील सर्व कामकाज थांबवून चर्चेला सुरुवात केली. पण अजूनही काल सुरु झालेली चर्चा संपलेली नाही. याठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा मांडलेला आहे, त्याला सरकार कडून देखील पाठिंबा आहे आणि त्याला आमची देखील तयारी आहे. कारण शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे.तसेच खरेतर प्रश्नोत्तराचा तास देखील तेवढाच महत्वाचा असतो. अधिवेशन सुरु होण्यापूर्वी 40 दिवस अगोदर प्रश्न देण्यात येतात. त्यानंतर त्याची उत्तरे दिली जातात.परंतु तुलनात्मकदृष्ट्या विचार केला तर शेतकऱ्याचा प्रश्न हा जास्त महत्वाचा आहे.त्यामुळे सरकारच्या वतीने आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन सदरहू विषयावर चर्चा ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार .. . .

करण्याची आमची देखील तयारी आहे.परंतु सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये पुर:स्थापनेसाठी एक शासकीय विधेयक दाखविण्यात आलेले असून माननीय मंत्री महोदय सदरहू विधेयक मांडतील आणि त्यानंतर चर्चेला सुरुवात केली तर जास्त बरे होईल असे माझे स्वत:चे मत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा झाल्यानंतर आम्ही सदरहू विधेयक पास करण्यास तयार आहोत. परंतु अगोदर चर्चा पूर्ण झाली पाहिजे.

सभापती : पण ते विधेयक चर्चेसाठी दाखविण्यात आलेले नाही.

श्री.रामदास कदम (खाली बसून) : सदरहू विधेयक केवळ पुर:स्थापनार्थ दाखविण्यात आलेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय,जर विधेयक केवळ पुर:स्थापनार्थ दाखविण्यात आले असेल तर ते नंतर घेण्यात यावे. तो विषय आता मध्येच कशासाठी घेण्यात येत आहे? जर आपण आता प्रश्नोत्तराचा तास स्थगित करीत आहोत आणि पुर:स्थापनार्थ असलेले विधेयक सुध्दा एका ओळीचे आहे.त्यामुळे आता मध्येच सदरहू विधेयक घेण्यात येऊ नये. माझी आपल्याला हात जोडून विनंती आहे की, शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या संबंधात चर्चा करीत असताना आता मध्येच हा विषय घेण्यात येऊ नये.सदरहू चर्चा पूर्ण झाल्यानंतर आम्ही सदरहू विधेयकाच्या संबंधात कामकाज करण्यास तयार आहोत, आम्ही त्याला मान्यता देण्यात तयार आहोत.याठिकाणी शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या संबंधातील चर्चा संपल्यानंतर आम्ही सदनातच उपस्थित राहू. आम्ही कुठेही जाणार नाही.म्हणून माझे असे म्हणणे आहे की,आता सदरहू चर्चेला सुरुवात करावयास पाहिजे.

सभापती : संसदीय कामकाजामध्ये प्रश्नोत्तराच्या तासाला सर्वोच्च प्राधान्य देण्याची प्रथा आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या हिताच्या दृष्टीने, त्यांच्या मतदार संघाच्या दृष्टीने काही प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी प्रश्नोत्तरे हे महत्वाचे आणि अचूक आयुध आहे असे आपण समजतो.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . .

काल विदर्भाशी संबंधित अत्यंत महत्वाच्या अशा कापूस, धान व अन्य पिकांच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्यात आला होता. विरोधी पक्षाने केलेली मागणी आणि त्या मागणीला सत्तारुढ पक्षाने दिलेला पाठिंबा लक्षात घेऊन काल सदनामध्ये प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. आज सुध्दा प्रश्नोत्तराचा तास पुकारल्या नंतर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या अनुषंगाने आपल्या भावना मांडल्या आहेत. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची चर्चा सुरु असल्यामुळे आज देखील अपवादात्मक परिस्थिती म्हणून प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्यात यावा अशी या ठिकाणी सूचना करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जमा यांनी सुध्दा अन्य सन्माननीय सदस्यांच्या भावना या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अशा वेळी अन्य सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला न्याय मिळण्याच्या दृष्टीने अन्य काही निर्णय घेता येईल काय अशी त्यांची भावना होती. सन्माननीय सभागृहाचे नेते उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांना या अनुषंगाने त्यांचा अभिप्राय देण्याची मी ज्यावेळी विनंती केली त्यावेळी सन्माननीय श्री. अजितदादा पवार यांनी प्रश्नोत्तराच्या तासाचे महत्व या ठिकाणी विशद केले पण काल सुरु झालेली चर्चाच मुळी महाराष्ट्रातील कष्टकरी शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असल्यामुळे एक अपवादात्मक परिस्थिती म्हणून आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्यात यावा असे मत त्यांनी या ठिकाणी मांडले आहे. या ठिकाणी दोन्ही बाजूकडून जी मते मांडण्यात आलेली आहेत त्या मतांचा आदर करुन मी आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करीत आहे. सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना या अनुषंगाने माझी विनंती आहे की, या पुढच्या काळात सभापती या नात्याने काम करीत असताना सतत प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्याचा असा प्रसंग आणि वेळ येऊ नये, याची काटेकोर काळजी आपण घ्यावी.

श्री. रामदास कदम (बसून) : आपण या बाबतीत सरकारला सांगावे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास झाला पाहिजे या साठी शासन आग्रही आहे. पण सन्माननीय विरोधी पक्षाने या ठिकाणी केलेल्या विनंतीला शासनाने एक अपवादात्मक परिस्थिती म्हणून मान दिलेला आहे. त्यामुळे आजचा प्रश्नोत्तराचा तास घेण्यात येणार नाही.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . .

आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनांवरील चर्चा आज घेण्यात येणार नाही, या लक्षवेधी सूचनांवरील चर्चा कधी घेण्यात यावी या संबंधीचा निर्णय सभापती त्यांच्या दालनात घेतील.

तसेच नियम 93 अन्वयेच्या सूचना आज घेण्यात येणार नाहीत. या नंतर आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये पुर:स्थापनार्थ दाखविण्यात आलेले विधेयक घेण्यात येईल.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. XI OF 2011.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PRIMARY EDUCATION ACT, 1947 AND THE MAHARASHTRA EMPLOYEES OF PRIVATE SCHOOLS (CONDITIONS OF SERVICE) REGULATION ACT, 1977.)

श्री. राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 11 मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम,1947 आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, 1977 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 11 मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात)

सभापती : काल नियम 97 अन्वये सुरु करण्यात आलेली अल्पकालीन चर्चा पुढे सुरु करण्यात येत आहे.

पृ. शी. : कापूस, सोयाबीन व धानाला प्रतिक्विंटल कमी हमी भाव जाहीर होणे

मु. शी. : कापूस, सोयाबीन व धानाला प्रतिक्विंटल कमी हमी भाव जाहीर होणे या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री पाशा पटेल, केशवराव मानकर, धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, रामनाथ मोते, डॉ. रणजीत पाटील, श्री. गोपीकिसन बाजोरिया, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरु)

श्री. केशवराव मानकर (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : माननीय सभापती महोदय, नियम 289 अन्वये उपस्थित केलेला प्रस्ताव आपण नियम 97 अन्वये मान्य केला त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. पण मला या ठिकाणी अत्यंत खेदाने सांगावेसे वाटते की, कापूस उत्पादक आमदारांनी काल या ठिकाणी आंदोलन केले तेव्हा विधानसभेच्या परिसरात कापूस आणून त्याचे या ठिकाणी दर्शन घडविण्यात आले आज मी आणि सन्माननीय सदस्य श्री. बडोले, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी या शासनाच्या कृषी मंत्री महोदयांना दाखविण्यासाठी धानाच्या पेंढया आणल्या होत्या. पण त्या धानाच्या पेंढया विधान भवनाच्या गेटवर अडविण्यात आल्या. त्या पेंढया तपासून घेण्यात याव्यात, त्याच्यामध्ये बॉम्ब ठेवलेला नाही. आम्हाला या धानाच्या पेंढया शासनाला दाखविण्यासाठी नेऊ द्याव्यात, अशी विनंती केली. पण जबरदस्तीने आमच्याकडील धानाच्या पेंढया काढून घेण्यात आल्या. त्या धानाच्या पेंढया घेऊन आमदार श्री. बडोले आणि

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर . .

सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हे विधान भवनाच्या पायऱ्यांवर बसलेले आहेत. मी स्वत: त्या ठिकाणी देखील बसलो होतो पण मला या ठिकाणी याच विषयावर बोलावयाचे असल्यामुळे मी सभागृहात आलो. मी आपल्या वतीने मंत्री महोदयांना निवेदन करतो, प्रार्थना करतो की, माननीय कृषी मंत्र्यांनी त्या ठिकाणी जाऊन धानाच्या पेंढयांची पाहणी करावी. या प्रश्नाचे उत्तर देत असताना शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी त्या धानाच्या पेंढया बघून धान उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी सभापती महोदय, मी आपल्या वतीने मंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, कापसाच्या अत्यंत महत्वाच्या प्रश्नाच्या संदर्भात आम्ही अशी मागणी केलेली आहे की प्रती क्विंटल कापसाला 6000 रुपये, प्रती क्विंटल सोयाबीनला 3000 रुपये आणि प्रती क्विटंल धानाला 2500 रुपये या प्रमाणे भाव सरकार जर आताच या ठिकाणी जाहीर करणार असेल तर मी माझे भाषण थांबवू शकतो. शासनाने या संबंधीची घोषणा केली तर या विषयावर चर्चा करण्याचे काही कारण नाही. आमचा मुख्य मुद्दा असा आहे की, प्रती क्विंटल कापसाला 6000 रुपये, सोयाबीनला 3000 रुपये आणि धानाला 2500 रुपये भाव देण्यात यावा. सभापती महोदय, मी याचे विश्लेषण करु इच्छितो. धानाचे आणि कापसाचे अर्थशास्त्र मी या ठिकाणी सांगू इच्छितो. धानाच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर धानाच्या बियाण्यासाठी 1500 रुपये लागतात. त्यानंतर नांगरणी-चिखळणी करणे यासाठी 2500 रुपये, रोवणा लावणे 2500 रुपये, खत 4000 रुपये, निंदन 2500 रुपये, धान कापणी 2000 रुपये, धान मळणी 1500 रुपये, औषधी फवारणी 2000 रुपये, पिकाला पाणी 2000 रुपये,कुटुंबाचे श्रम, दोन व्यक्ती पाच महिने अर्थात 150 दिवस, 100 रुपये प्रमाणे प्रती व्यक्तीनुसार 30 हजार रुपये अशा प्रकारे एकूण खर्च 50, 050 रुपये येतो. उत्पादनाचा खर्च व नफा मिळून 55 हजार 550 रुपये गृहीत धरले तरी प्रती क्विंटल धानाला सरासरी 3096 रुपये भाव दिला पाहिजे म्हणजे आज धानाला भाव 3100 रुपये प्रती क्विंटलपेक्षा कमी नको.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. केशवराव मानकर .....

आयोगाने सांगितल्याप्रमाणे जो उत्पादन खर्च आहे त्याच्या 50 टक्के नफा गृहीत धरुन म्हणजे जवळजवळ साडेचार हजार रुपयांपेक्षा जास्त भाव धानाला मिळाला पाहिजे. आम्ही सरकारच्या हितासाठीच सांगत आहोत की, धानाला फक्त 2500 रुपये भाव जाहीर करावा.

सभापती महोदय, कापसाचे जे अर्थशास्त्र आहे ते मी या ठिकाणी समोर ठेऊ इच्छितो. दोन बैलजोड्यांची दोन दिवसांची नांगरणी-1500 रुपये, दोन दिवस वखरणी-1600 रुपये, हेच काम ट्रॅक्टरने केले तर 2 हजार रुपये, चरे पाडणे-300 रुपये, दोन बॅग बी.टी.बियाणे-1900 रुपये, पेरणी-400 रुपये, 4 पोते खत-2600 रुपये, निंदणी-4000 रुपये, तण नाशकाची फवारणी-1500 रुपये, डवरणी-2000 रुपये, किटकनाशक फवारणी-1500 रुपये, वेचणी सरासरी 6 रुपये प्रमाणे 2400 रुपये आणि वाहतूक-400 रुपये असा एकूण खर्च 21 हजार 600 रुपये येतो. कोरडवाहूमधील सरासरी एकरी उत्पादन 4 क्विंटल असते. घोषित केलेला भाव 3300 रुपये आहे. त्याप्रमाणे 4 क्विंटलचे 13 हजार 200 रुपये होतात. या घोषित झालेल्या दराने शेतकऱ्यांचा एकरी तोटा 8400 रुपये आहे. बाजारात 4000 रुपये दराने कापूस विकल्यास शेतकऱ्यांना 16 हजार रुपये मिळणार. म्हणजे व्यापाऱ्यांना कापूस विकला तरी शेतकऱ्याला 5 हजार 600 रुपये तोटा येतो. जर शासनाने कापसाला 6 हजार रुपये भाव दिला नाही तर हे शेतकरी तोट्यात जाणार आहेत.

सभापती महोदय, सोयाबीनची अवस्था सुध्दा तशीच आहे. सोयाबीनला लागणारा खर्चही तसाच येतो. त्याचाही विचार केला गेला नाही. म्हणून मला शासनाला विनंती करावयाची आहे की, केंद्रीय कृषी मूल्य आयोग असेल, राज्य कृषी मूल्य आयोग असेल त्यांना तत्काळ बरखास्त करण्याची आवश्यकता आहे. त्या आयोगामध्ये 50 टक्के शेतकऱ्यांचे प्रतिनिधी समाविष्ट करावयास पाहिजे. त्याशिवाय शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळू शकणार नाही. म्हणून 50 टक्के शेतकऱ्यांचा आयोगामध्ये समावेश असावा अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ....

सभापती महोदय, या ठिकाणी मला अनेक मुद्दयांच्या बाबतीत विवेचन करावयाचे आहे. गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली आणि नागपूरचा काही भाग हे धान उत्पादक जिल्हे आहेत. माननीय पुरवठा मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. तीन वर्षापासून आजही 300 कोटी रुपयांचा धान गोडावूनमध्ये आणि बाहेर सडत पडलेला आहे. गेली सहा अधिवेशने या धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी मी हा मुद्दा सभागृहात उपस्थित करीत आहे परंतु त्याला कोठेही न्याय मिळत नाही. आपल्याजवळ गोडावून नाहीत. त्याचा परिणाम असा झाला आहे की, अजूनही सर्व धान खरेदी केंद्रे सुरु झालेली नाहीत. गोंदिया जिल्ह्यामध्ये मार्केटिंग फेडरेशनची दरवर्षी 42 केंद्रे सुरु राहात असत परंतु या वर्षी 25 केंद्रांना मंजुरी असून धानाची फक्त 21 केंद्रेच सुरु झालेली आहेत. गोंदिया जिल्ह्यात मार्केटिंग अधिकारी, नागपूर यांनी अतिरिक्त भार काढून घेतलेला आहे, हे खेदाने सांगावेसे वाटते. शेतकऱ्यांचा सर्व माल उचलून नेला असता, त्यांचे मिलिंग झाले असते तरच धान उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळाला असता आणि त्यांना चांगला भाव मिळाला असता.

मी केंद्र सरकारचे अभिनंदन करतो की त्यांनी मध्ये धानाच्या निर्यातीला परवानगी दिली होती. फक्त एक महिना शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळाला. त्यावेळी धानाला एका क्विंटलला 100 ते 150 रुपये जास्त भाव मिळाला. पण त्यानंतर जैसे थे परिस्थिती निर्माण झाली. जर ही निर्यात सुरु राहिली असती, राज्य सरकारने आणि केंद्र सरकारने सातत्याने धानाची निर्यात केली असती तर शेतकऱ्यांना चांगला भाव मिळाला असता. हा संपूर्ण माल उचलल्याशिवाय या भागातील शेतकऱ्यांना न्याय मिळू शकत नाही, धानाला भाव मिळू शकत नाही. मी माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारु इच्छितो. आमच्या जिल्ह्याची आणेवारी 14 क्विंटल एवढी काढली. धान केंद्रावर धान खरेदीची अट घालताना तुम्हाला 8 क्विंटलच धान विकता येईल अशी अट घातली. मग तो शेतकरी 6 क्विंटल धान कोठे विकणार, हे शासनाने सांगावे. म्हणजे त्यांनी तो माल 800 ते 900 रुपये क्विंटल प्रमाणे व्यापाऱ्यांना विकावयाचा का ? बाजार समितीमध्ये सुध्दा नॉन एफएक्यू म्हणून तो माल कमी दराने विकला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा सातत्याने तोटा होत आहे. हा तोटा भरुन काढण्यासाठी सरकार काही उपाययोजना करणार आहे का ? त्यांच्या परकाचे पैसे राज्य

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ...

शासन देणार आहे का ? मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्यामध्ये शेतकऱ्यांना 200 रुपये बोनस दिला जातो. आमच्या शेतकऱ्यांना जो 20 रुपये बोनस दिला जात होता तोही बंद करण्यात आला. म्हणजे सातत्याने शेतकऱ्यांची पिळवणूक करण्याचे काम, त्यांना नागविण्याचे काम या राज्य शासनाने केलेले आहे.

सभापती महोदय, आमच्या जिल्ह्याचे नेते आदरणीय श्री. प्रफुल्लभाई पटेल यांच्या नेतृत्वामध्ये केंद्राकडे एक प्रतिनिधीमंडळ गेले होते. आम्ही त्याचे अभिनंदन करतो. शेतकऱ्यांना न्याय मिळेल असे वाटले होते. पण आता आम्ही ते अभिनंदनही परत घेतले पाहिजे असे वाटू लागले आहे. ते अभिनंदन परत घेतलेच पाहिजे. कारण या ठिकाणच्या धानाचा प्रश्न सोडविण्यासाठी राईस मिल भरडाईचा जो 17 रुपये दर होता तो 10 रुपये वाढविण्याचे मान्य केले होते. मी जे ऐकले आहे ते खरे आहे की, असत्य आहे हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. जो दर वाढविणार होते त्यावरही ब्रेक लावण्यात आला आणि ते थांबविण्यात आले. हे जे राजकारण आहे ते शासनाने बंद करावे. मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्यामध्ये मिलिंगचे दर 45 रुपये क्विंटल असतील तर महाराष्ट्र शासनाला तसा दर देण्यामध्ये काय बिघडते ? वाहतुकीचा प्रश्न जशाचातसा पडून आहे. डिझेल आणि पेट्रोलचे भाव सातत्याने वाढत आहेत. महागाई सीमेला पोहोचलेली आहे. पण धानाच्या संदर्भात एकाही बाबतीत दर वाढवित नाही. त्यांचे दर का वाढवित नाही ? मिलिंग करण्यामध्ये वाहतुकीचा मोठा अडथळा आहे. तो अडथळा सरकार का दूर करीत नाही ? फक्त 5 हजार कोटी रुपये दिले असते तर हा प्रश्न मिटला असता. आपण फक्त 2 किलो तूट देतो. त्यामुळे एजन्सी खरेदी कशी करणार ? या खरेदी करणाऱ्या एजन्सीज कोण आहेत ? या सेवा सहकारी खरेदी-विक्री संस्था आहेत. हा प्रश्न थेट शेतकऱ्यांशी संबंधित आहे. जोपर्यंत या मालाची विल्हेवाट लावली जाणार नाही तोपर्यंत बाजारामध्ये कोणताही व्यापारी हा धान खरेदी करणार नाही आणि धानाला खुल्या बाजारात चांगला भाव मिळणार नाही. सरकारही खरेदी करत नाही आणि व्यापारीही घेत नाही मग शेतकऱ्यांनी आपला माल कोठे विकावा, हा खरा प्रश्न आहे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ....

हे सर्व प्रश्न जोपर्यंत निकाली निघणार नाहीत तोपर्यंत शेतकऱ्यांना न्याय मिळू शकणार नाही. हा घोर अन्याय आहे. हे महापाप आहे. शेतकऱ्यांची पिळवणूक केली जात आहे. जो शेतकरी रात्रंदिवस घाम गाळून उत्पादन काढतो त्या शेतकऱ्याला हवालदिल केलेले आहे. आता या शेतकऱ्यांना सुध्दा आत्महत्या करण्याशिवाय पर्याय नाही, हे मी या ठिकाणी खेदाने सांगत आहे.

या शेतकऱ्यांची स्थिती दयनीय आहे. या शेतकऱ्यांची स्थिती सुदृढ राहण्यासाठी सिंचनाची व्यवस्था असली पाहिजे. माननीय मंत्री श्री. विखे-पाटील यांना सांगू इच्छितो की, आमच्या जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांना जे पाणी दिले जाते त्यामध्ये एकदा रोटेशन पध्दत अवलंबिली. त्यामध्ये या धान उत्पादक शेतकऱ्यांना जे पाणी दिले जाते ते चार वर्षानंतर एकदा मिळते आणि ते सुध्दा निश्चित नसते. त्यामुळे शेतकरी कठाणीचे पीक घेऊ शकत नाहीत. ते रब्बीचे पीक घेऊ शकत नाहीत. हा दरवर्षीचा गोंधळ आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांना जर न्याय द्यावयाचा असेल तर ही रोटेशन पध्दती बदलण्याची गरज आहे. खरे म्हणजे शून्यापासून जिथपर्यंत पाणी पुरेल त्या ठिकाणी पाणी दिले पाहिजे. पण त्या ठिकाणी राजकारण येते. त्यामध्ये आमच्या आमदारांचे राजकारण येते. म्हणून मी या बाबतीत शासनाला एक उपाय सांगू इच्छितो की, आमगाव आणि सालेकसा तालुक्याला एक वर्ष आणि दुसऱ्या वर्षी संपूर्ण गोंदिया तालुक्याला आपण पाण्याचे वाटप केले तर शेतकऱ्यांना दरवर्षी पाणी मिळू शकते. म्हणजे चार वर्षे वाट पाहण्यापेक्षा एक-एक वर्षानंतर त्यांना पाणी देऊ शकतो. या शेतकऱ्यांना शासन न्याय देणार का हा प्रश्न आहे. जोपर्यंत शासन रोटेशन पध्दतीबाबत निर्णय घेणार नाही तोपर्यंत या धान उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

भंडारा, गोंदिया, गडचिरोली, नागपूर व चंद्रपूर जिल्हयात धान उत्पादक शेतक-यांसाठी सिंचनाची व्यवस्था केली तर त्यांना बारमाही पाणी मिळू शकते. तेथे भरपूर पाणी आहे. परंतु मला अत्यंत खेदाने असे म्हणावे लागते की, या प्रश्नाकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे.

सभापती महोदय, झुडपी जंगलाच्या नावाने अनेक नवीन प्रकल्प अडकले आहेत. त्याला सरकार परवानगी देत नाही ही खेदाची गोष्ट आहे. मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो. शासनाकडून शेतक-यांना लागणारी सर्व अवजारे दिली जातात. त्याप्रमाणे त्यांना नागरण्यासाठी लागणारे अवजार असेल, मळणी यंत्र असेल, ट्रॅक्टर असेल हे सर्व त्यांना उपलब्ध करुन द्यावे. या संदर्भात मी कृषी खात्याच्या सचिवांना पत्र लिहिले होते. एप्रिल ते डिसेंबर महिन्यापर्यंत आमच्या अधिकाऱ्यांनी दर करार निश्चित करुन एमएआयडीसीला का कळविले नाही ? याचे उत्तर मला पाहिजे. मी एक शेतकरी आहे याचे मला दु:ख वाटते. मी या अवजारांसाठी अर्ज केला होता. त्याबाबतचे कोटेशन एमआयडीसीमधून आणले होते. स्टेट बँकेला ते दिले होते. स्टेट बँकेच्या अधिकाऱ्यांनी असे सांगितले की, दर करार निश्चित करण्यात आलेले नसल्यामुळे आम्हाला पैसे देता येणार नाहीत. त्यामुळे तुम्ही खाजगी कंपनीकडून अवजारे घ्यावीत व त्यांच्याकडून कोटेशन आणावे. मी लोकप्रतिनिधी आहे. माझ्याबरोबर जर असा व्यवहार होत असेल तर सामान्य शेतकऱ्यांची काय अवस्था असेल हा खरा प्रश्न आहे. मी सेवा सहकारी संस्थेच्या माध्यमातून सहकारी बँकेकडे अर्ज केला. अजूनही 45 हजार रुपयांची सबसिडी शेतकऱ्यांना मिळालेली नाही. बजेट सादर करीत असताना शेतकऱ्यांसाठी खूप योजना जाहीर केल्या जातात. परंतु त्या योजना केवळ कागदावरच राहिल्या आहेत असे मला म्हणावयाचे आहे. मी सरकारला विनंती करतो की, हे दर करार निश्चित केले नसतील तर ते ताबडतोब निश्चित करुन एमएआयडीसीला देण्यात यावेत. मोरगावअर्जुनी तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना मागील 5 वर्षापासून 45 हजार रुपयांची सबसिडी मिळालेली नाही. हा विलंब कशासाठी होत आहे, आम्ही सबसिडी देऊ शकत नाही, असे शासनाने एकदा सांगून टाकावे. शासनाला खरोखरच मदत करावयाची असेल तर ही योजना ताबडतोब जाहीर करावी.

आता कोणताही शेतकरी मजुरांच्या भरवशावर शेती करु शकत

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

नाही. शेती करावयाची असेल तर त्याच्याकडे संपूर्ण साहित्य असावयास पाहिजे. मी स्वत: धान उत्पादक शेतकरी आहे. शेतीसाठी ट्रॅक्टर पाहिजे, नांगरण्यासाठी चांगली झोळी पाहिजे, चांगली झोळी 50 हजार रुपयाशिवाय मिळत नाही. त्याचे भाव आकाशाला भिडले आहेत. जनावरांना चारा मिळत नाही. जनावरांना चारा घालण्याची आमची ऐपत नाही. कारण शेतकऱ्यांच्या मालाला जो दर मिळतो तो अत्यंत कमी असतो. म्हणून शेतकऱ्यांना आवश्यक असलेली सर्व अवजारे शासनाने दिली पाहिजेत. कारण हे सर्व लहान लहान शेतकरी आहेत. हे शेतकरी अवजारे विकत घेऊ शकत नाहीत. त्यासाठी सामूहिक शेती करण्याची गरज आहे. सामूहिक शेतीसाठी ट्रॅक्टर असतील, नांगरण्याचे यंत्र, मळणीचे यंत्र, धान कापण्याचे यंत्र असेल इतर सर्व साहित्य त्यांना दिले पाहिजे. ही सर्व यंत्रे दिल्याशिवाय शेती करणे शक्य नाही. त्याशिवाय त्याच्या शेती मालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव दिला पाहिजे. कृषी मूल्य आयोगाने सांगितल्याप्रमाणे 50 टक्के भाव वाढवून दिले पाहिजेत. धान खरेदीची व्यवस्था वाईट आहे. धान्य कोठारांची अवस्था वाईट आहे. शेतकऱ्यांना नागविण्याचे काम शासनाने केलेले आहे. मी 2006 मध्ये निर्वाचित झाल्यानंतर तत्कालीन आदिवासी मंत्री माननीय डॉ.विजयकुमार गावित यांनी मला नागपूरच्या अधिवेशनामध्ये आश्वासन दिले होते. आदिवासी भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत त्यांनी असे सांगितले होते की, मालासाठी गोदामे बांधू, शेड बांधू. हे आश्वासन देऊन साडेपाच वर्षे झालेली आहेत. परंतु त्या कामाचा शुभारंभ झालेला नाही. शासनाला खरोखरच शेतकऱ्यांबाबत तळमळ असती तर हे काम सुरु झाले असते. गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींना न्याय मिळाला असता. पण हे सरकार आम्हाला केवळ आश्वासन देते, त्याच्या पलीकडे काही देत नाही.

कापूस एकाधिकार योजनेमार्फत शासन कापसाची खरेदी करते. त्या योजनेची देखील वाईट अवस्था झालेली आहे. त्या योजनेमार्फत गोळा झालेल्या कापसासाठी गोदामे नाहीत. शासनाने शेतकऱ्यांशी संबंधित असलेल्या योजना योग्य पध्दतीने कार्यान्वित करण्याची गरज आहे. सध्या शेतकरी 1010 जातीचे वाण मोठ्या प्रमाणात पेरत आहे. त्या वाणापासून चांगले उत्पादन मिळत आहे. त्याला काही पैसा मिळू शकतो अशी शक्यता निर्माण झालेली आहे. परंतु या शासनाने ती शक्यता सुध्दा धुळीत मिळविली आहे. 1010 या वाणापासून तयार झालेल्या धानाची अ

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

श्रेणीनुसार खरेदी केली पाहिजे. त्याप्रमाणे खरेदी केंद्रांवर खरेदी केली जात नाही. या धानामुळे शेतकऱ्यांना दोन पैसे अधिक मिळू शकतात. म्हणून या वाणापासून तयार झालेल्या धानाची खरेदी अ श्रेणीनुसार करण्याच्या सूचना शासनाने दिल्या पाहिजेत.

सभापती महोदय, ज्या शेतकऱ्यांनी आपले धान गोदामात ठेवले आहे त्यांना 2 टक्के तूट दिली जाणार आहे. त्यांनी धान ठेवून 2-3 वर्षे झाली असल्यामुळे शासन त्यांना किती तूट देणार आहे ते जाहीर करण्यात यावे. ते धान अधिक दिवस झाल्यामुळे सडले आहे, घुशींनी, उंदरांनी खाल्ले आहे. त्याचे बारदाने सडलेले आहेत. त्यामुळे या शेतकऱ्यांना किती टक्के रिलीफ दिला जाणार आहे ? त्यांच्या नुकसानीला शासन जबाबदार असल्यामुळे ही जबाबदारी शासनाने स्वीकारावी अशी आग्रहाची विनंती मी करणार आहे. ज्या शेतकऱ्यांनी आपले धान खरेदी केंद्रावर विकले आहे त्यांना 7 दिवसाच्या आत पेमेंट मिळाले पाहिजे. परंतु त्यांना 1-1 महिना पेमेंट दिले जात नाही.

सभापती महोदय, अनेक प्रश्न आहेत त्यामध्ये विजेचा जटील प्रश्न देखील आहे. मी माझ्या शेतीवर पंप लावलेला आहे. केशवराव मानकर त्या पंपाच्या ठिकाणी रहात नाही. हे त्यांना समजत नाही का ? पंपाची चोरी होऊ नये म्हणून एक छोटीशी खोली बांधली आहे. तेथे एक बल्व लावलेला आहे. परंतु वीज मंडळाचे अधिकारी माझ्या चौकीदाराला धमकी देऊन तेथे डी.एल.चे मिटर लावण्यास सांगत आहेत. तेथे कोणाचे निवासस्थान नाही. तरी देखील मी माझ्या मुलाला डी.एल.चे मिटर लावण्यास सांगितले आहे. शेतकरी वीज पंपाच्या ठिकाणी एक बल्ब सुध्दा लावू शकत नाही. तो केवळ पंपच लावू शकतो. हा कोणता न्याय आहे ? याबाबत मी संबंधित अधिकाऱ्यास फोन केला असता त्यांनी एक बल्ब लावू शकतो असे सांगितले आहे. असे असताना अधिकारी शेतकऱ्यांना धाकदपटशा का दाखवितात ? शेतकऱ्यांना 24 तास वीज दिली जात नाही. रात्रीच्या वेळी त्याच्या पंपाच्या ठिकाणी विंचू डंख मारु शकतो. याबाबत शासनाने संबंधितांना निदेश दिले पाहिजेत. माझ्यासारख्याची ही अवस्था आहे. मग सामान्य शेतकऱ्यांची काय अवस्था असेल हा खरा प्रश्न आहे. शासनाला खऱ्या अर्थाने न्याय द्यावयाचा असेल तर शेतकऱ्याला हमी भाव देऊन चालणार नाही. त्याला उत्पादन खर्चावर आधारित भाव दिला पाहिजे.

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या लोडशेडिंगचे मिटर अत्यंत वाईट आहे. केरळमध्ये शेतकऱ्यांना मोफत वीज दिली जाते. आम्ही रोजगार हमी योजना समितीच्या माध्यमातून केरळला गेलो होतो. तेथील शेतकऱ्यांनीच आम्हाला ही माहिती दिली आहे. मग महाराष्ट्रात शेतकऱ्यांना मोफत वीज का दिली जात नाही ? शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याची आवश्यकता आहे. शेतकरी घायकुतीला आला आहे, त्याचे दारिद्रय संपवावयाचे असेल, त्याला समृध्द करावयाचे असेल तर त्याला सवलती दिल्या पाहिजेत अशी मी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या विजेचे दर सुध्दा अवास्तव आहेत. त्यांच्या बिलामध्ये अधिभार लावू नये.

यानंतर श्री.गिते.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

पण शेतकऱ्यांना देखील अधिभार लावला जात असेल तर त्या बाबतीत मी खेद व्यक्त करतो. गोंदिया व भंडारा जिल्हयातील धानाचा प्रश्न सोडवावयाचा असेल तर राईस मिल्स् असोसिएशनचे जे अध्यक्ष आहेत ते माननीय श्री.प्रफुल्ल पटेल यांचे सहकारी आहेत. त्यांच्या सहकाऱ्यांना राईस मिल्सच्या बाबतीत काही देणे घेणे राहिलेले नाही. कारण महाराष्ट्र शासनाने राईस मिल्स् असोसिएशनच्या अध्यक्षांना चांगला उद्योग देऊन टाकलेला आहे. जिल्हयातील सर्व शाळांना धान्य पुरवठयाचे फार मोठे कंत्राट देऊन टाकलेले आहे. त्यामुळे ते धानाचा प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. भंडारा व गोंदिया जिल्हयातील जवळ जवळ 75 टक्के राईस मिल्स् बंद पडलेल्या आहेत. या गोष्टीचा सरळ इफेक्ट भंडारा व गोंदिया जिल्हयातील शेतकऱ्यांवर पडलेला आहे. शेतकऱ्यांचा माल हा राज्य शासन घेत नाही, राज्य शासन शेतकऱ्यांचा माल 10 ते 15 टक्के घेते. उर्वरित 85 टक्के माल कमी भावाने व्यापारी घेतात. आज 200 ते 250 राईस मिल्स् आजारी म्हणून आज बंद पडलेल्या आहेत. अनेक राईस मिल्स् विकावयास निघाल्या आहेत. त्यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था चांगली करावयाची असेल तर बंद असलेल्या सर्व राईस मिल्स्ना आर्थिक मदत केली पाहिजे.

सभापती महोदय, विदर्भात मोठया प्रमाणात कापूस उत्पादन होते. पश्चिम महाराष्ट्रामध्ये सूत गिरण्या आहेत. त्या सूत गिरण्यांना महाराष्ट्र सरकारने विनाव्याजी 300 कोटी रुपयांची मदत नुकतीच जाहीर केलेली आहे. विदर्भातील ज्या आजारी राईस मिल्स् आहेत, त्यांना देखील मोठया प्रमाणात आर्थिक मदत देण्यात यावी, अशा प्रकारची मी मागणी करतो. राज्यात सर्व शेतकऱ्यांना समतोल न्याय शासनाकडून दिला गेला पाहिजे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. पश्चिम महाराष्ट्रातील सूत गिरण्यांना आर्थिक मदत का करण्यात आली असे मी म्हणत नाही. तेथील सूत गिरण्यांना न्याय दिला गेला, त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. त्याप्रमाणे धान उत्पादक शेतक-यांना देखील तातडीने न्याय दिला गेला पाहिजे. या आजारी राईस मिल्स् पूर्ववत चालवावयाच्या असतील तर त्या मिल्स्मधील माल शासनाने तातडीने उचलला पाहिजे. त्या मिल्स्मधील तांदूळांचे मिलिंग केले पाहिजे. तेथील मालाची तातडीने विल्हेवाट लावली पाहिजे,

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशी मी आग्रहाची सूचना करतो. मी केलेल्या सूचनेची शासनाने अंमलबजावणी केली तर पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांना काही प्रमाणात न्याय मिळू शकेल.

सभापती महोदय, या शासनास धान उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यावयाचा असेल तर धानाची निर्यात सातत्याने चालू राहिली पाहिजे. धानाच्या निर्यातीवर शासनाने कोणत्याही प्रकारची बंदी आणू नये, अशा प्रकारचा निर्णय राज्य आणि केंद्र सरकारने घ्यावा अशी माझी विनंती आहे. धान,कापूस आणि सोयाबीन यांचे भाव ठरविण्याचे अधिकार केंद्र शासनाला आहेr असे आम्हाला या सभागृहात माननीय मंत्री महोदयांकडून उत्तरात नेहमी सांगितले जाते. केंद्र शासनाला प्रत्येक धान्याचे हमीभाव ठरविण्याचे अधिकार आहेत तर या बाबतीत राज्य शासनाला कोणते अधिकार देण्यात आलेले आहेत याचा खुलासा या ठिकाणी शासनाकडून झाला पाहिजे. लोकसभेतील भारतीय जनता पक्षाच्या विरोधी पक्ष नेत्या श्रीमती सुषमा स्वराज देवळा येथे शेतकऱ्यांच्या कार्यक्रमासाठी आल्या होत्या. तो कार्यक्रम शेतकऱ्यांचा होता. तो कार्यक्रम कोणाही राजकीय पक्षाचा नव्हता. त्या कार्यक्रमाच्या ठिकाणी सर्व धान उत्पादक शेतकऱ्यांनी त्यांना निवेदन दिले होते. त्या निवेदनाच्या अनुषंगाने त्यांनी शेतकऱ्यांना जे काही आश्वासन दिले होते. मी माननीय श्रीमती सुषमा स्वराज यांचे अभिनंदन करतो की, त्यांनी गोंदिया आणि भंडारा जिल्हयातील धान उत्पादकांचे प्रश्न लोकसभेत उपस्थित करुन धान उत्पादक शेतक-यांना न्याय देण्याची भूमिका घेतली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. केंद्रात आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार आहे, त्यामुळे राज्य शासनाने धान उत्पादक शेतकऱ्यांच्या बाबतीत केंद्र शासनास जाब विचारावा. राज्य शासन आणि केंद्र शासन धान उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबतचा निर्णय घेण्यास एकमेकावर चालढकल करीत आहेत. धान उत्पादक शेतकऱ्यांच्या बाबतीत राज्य शासनाची नीती काय आहे यासंबंधीचा खुलासा शासनाकडून करण्यात आला पाहिजे. या धान उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत शासनाकडून निर्णय घेतले जात नसल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचा न्याय मिळू शकत नाही, ही अतिशय दुर्देवाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मी अनेक मुद्यांचा उल्लेख केला. वायदा बाजारामुळे राज्यातील शेतकरी नागावत चालला आहे. त्यामुळे वायदा बाजार पध्दती केंद्र शासनाने तातडीने बंद करावी अशी सूचना राज्य सरकारकडून करावी. शेतकऱ्यांकडून माल खरेदी केला जातो. तो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माल अनेक दिवस तसाच पडलेला दिसतो. तो माल राज्य शासनाकडून अथवा केंद्र शासनाकडून लवकर उचलला जात नाही. सदरहू शेतकऱ्यांचा माल प्रत्येक व्यापारी मुनाफा घेऊन विकतो आहे. या गोष्टीचा परिणाम म्हणून देशात व राज्यात मोठया प्रमाणात महागाई वाढलेली आहे. व्यापारी शेतकऱ्यांकडून 900 रुपये प्रति क्विंटल या दराने धान खरेदी करतात आणि व्यापारी मात्र ते धान 900 रुपये प्रति क्विंटल, तांदूळ 4 ते 5 हजार रुपये प्रति क्विंटल या दराने विकत आहेत. हे सर्व प्रकार वायदा बाजारामुळे होत आहेत. म्हणून वायदा बाजार तातडीने बंद झाला पाहिजे. कापूस, धान, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न राज्य शासनाकडून सुटतील असे मला वाटत नाही. या बाबतीत सरकारचा गोलमाल ही शेतकऱ्यांना मारक आहे. धान, कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी विधिमंडळ रोजगार हमी योजना समितीचा सदस्य आहे. रोजगार हमी योजनेने महाराष्ट्रातील अनेक जिल्हयांना भेटी देऊन रोजगार हमी योजनेची तसेच महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी मजूर मिळत नाहीत अशी बाब प्रामुख्याने निदर्शनास आली आहे. शेतीची कामे करण्यासाठी मजूर मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची अतिशय वाईट अवस्था झालेली आहे. ग्रामीण भागात एमआरईजीएसची कामे मोठया प्रमाणात सुरु आहेत, परंतु बरीच कामे मजुरा अभावी बंद आहेत. त्यामुळे एमआरइजीएसच्या कामावरील मजुरांच्या दरात वाढ केली पाहिजे. आज एमआरइजीएसच्या कामावरील मजुराची मजुरी 127 रुपये एवढी आहे. एवढया कमी मजुरीमध्ये कोणताही मजूर काम करीत नाही. शेतीमध्ये रोवनी करावयाची असेल, धान कापावयाचे असेल, धुरावर माती टाकावयाची असेल ही कामे एमआरइजीएसमधून घेण्यात यावीत. एमआरइजीएससाठी येणारा केंद्र सरकारचा निधी पूर्णपणे खर्च केला तर राज्याचा खऱ्या अर्थाने विकास होईल असे माझे स्पष्ट मत आहे. शेतकरी समृध्द झाला तर महाराष्ट्र राज्य समृध्द होईल, पर्यायाने भारत देश देखील समृध्द होईल. त्यामुळे एमआरइजीएसच्या कामावरील मजुरांच्या मजुरीच्या दरात वाढ केली पाहिजे अशी माझी मागणी आहे. एक किलो कापूस वेचण्यासाठी सहा रुपये खर्च येतो. त्यात थोडया फार प्रमाणात वाढ केल्यास ग्रामीण भागातील शेतमजुरांना आर्थिक हातभार लागेल, त्यामुळे शेतकऱ्यांना शेतमजूर उपलब्ध होतील व यातून शेतकऱ्यांना देखील दिलासा मिळू शकतो. शेती

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपयोगी अशी सर्व कामे एमआरइजीएस मधून घेण्यात यावीत अशी माझी विनंती आहे. राज्यातील शेतकऱ्यांना जीवंत ठेवावयाचे असेल तर सिंचन व्यवस्थेकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. सिंचनाची कामे प्राधान्याने हाती घेऊन ती कामे अतिशय गतीने पूर्ण केली पाहिजेत. पश्चिम विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्याला अन्य पीक घ्यावयाचे असेल तर त्यांना सिंचनाची व्यवस्था करुन देणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या शेतीसाठी सिंचनाची व्यवस्था मोठया प्रमाणात उपलब्ध करुन दिली तर विदर्भातील शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होणार नाहीत. शेतकऱ्याला मरण पत्करण्याचा शौक नाही. परंतु काही वेळा अतिशय कठीण वेळ येते तशा वेळी माणसाला मरण पत्करावे लागते. या राज्यात शेतकऱ्यांनी मरावे की जगावे हा खरा प्रश्न निर्माण झालेला आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न खरोखर सोडवावयाचे असतील तर सिंचन व्यवस्थेकडे शासनाने गांभीर्याने बघितले पाहिजे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतीमाल विकला. त्या शेतकऱ्यांची शेतमाल विक्रीची बिले कृषी उत्पन्न बाजार समितीकडे आहेत. सरकारी दराप्रमाणे 100, 150 रुपये एवढी फरकाची रक्कम द्यावी लागेल. ही फरकाची रक्कम अतिशय कमी असल्यामुळे ती रक्कम राज्य शासनाने दिली पाहिजे. बाहेरील व्यापाऱ्याने शेतकऱ्यांचा माल खरेदी केला असेल त्यांना ती रक्कम देण्यात यावी. पणन विभागाच्या माध्यमातून कृषी उत्पन्न बाजार समित्या चालविल्या जातात. त्या बाजार समित्यांनी अतिशय कमी दरात शेतकऱ्यांचा शेतीमाल खरेदी केलेला आहे, त्यांना अर्थसहाय्य देण्याची आवश्यकता आहे. गोंदिया आणि भंडारा जिल्हयात धान उत्पादक शेतक-यांच्या धानाच्या पेंढया जळाल्या आहेत. ज्या शेतकऱ्यांच्या धानाच्या पेंढया जळाल्या आहेत, त्यांना कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत दिली जात नाही. शेवटी तो शेतकरी दरिद्री होतो. त्या शेतकऱ्यांकडे जनावरांसाठी चारा शिल्लक रहात नाही. या प्रस्तावाच्या माध्यमातून राज्य शासनास विनंती करतो की,शेतकऱ्यांच्या धानाच्या पेंढयांचा राज्य शासनाच्या मार्फत विमा काढून द्यावा व त्या शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. शेतकऱ्यांच्या धानाच्या जळीत पेंढयाच्या अनुषंगाने 100 टक्के नव्हे तर 50 टक्के एवढी तरी नुकसान भरपाई देण्यात यावी. शेतकऱ्यांच्या धानाच्या पेंढया जळाल्या तर त्या शेतकऱ्यास कोणत्याही प्रकारची मदत दिली जात नाही. म्हणून या बाबीचा विमा योजनेत समावेश करुन गेल्या वर्षी ज्या शेतकऱ्यांच्या धानाच्या पेंढया जळाल्या आहेत, त्यांना आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी मी या प्रस्तावाच्या निमित्ताने

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करतो. सर्व पातळीवर शेतकऱ्यांचा विनाश होतो आहे, तो थांबविण्यासाठी हा प्रस्ताव अतिशय योग्य आहे. कापसाला 6 हजार रुपये प्रति क्विंटल, धानाला 3 हजार रुपये प्रति क्विंटल आणि सोयाबीनला प्रति क्विंटल 2500 रुपये भाव शासनाने सभागृहात आजच जाहीर करावा व शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी माझी विनंती आहे. शेतकऱ्याला त्यांच्या शेती मालास योग्य भाव मिळालेच पाहिजे.

सभापती महोदय, कृषीमूल्य आयोग आहे तो रद्यबादल करण्यात येवून नव्याने कृषी मूल्य आयोगाची स्थापना करण्यात यावी व त्यात शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा. कृषी क्षेत्रातील अनुभवी लोक या आयोगावर नेमले गेले तर शेतकऱ्यांना जो उत्पादन खर्च येतो आहे, त्यानुसार हमीभाव ठरविण्यास त्यांची मदत होईल. शेतकऱ्यांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी राज्य सरकारने आजच तातडीने निर्णय घ्यावेत आणि ते सभागृहात जाहीर करावे, अशा प्रकारची विनंती करुन मी माझ्या शब्दास विराम देतो. धन्यवाद.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, काल नागपूरचे हिवाळी अधिवेशन सुरु झाल्यापासून विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील शेतकऱ्यांच्या अतिशय जिव्हाळ्याच्या प्रश्नावर इतर सर्व कामकाज बाजूला सारुन या सभागृहामध्ये ही चर्चा उपस्थित केलेली आहे. खरे म्हणजे या चर्चेची सुरुवात करीत असताना सत्ताधारी बाजूकडून ही चर्चा महत्वाची आहे आणि प्राधान्याने घ्यायला हवी म्हणून सर्व कामकाज बाजूला ठेवून ही चर्चा सुरु केली आणि आजही हीच चर्चा पुढे चालवित असताना प्रश्नोत्तराचा तासही थांबला. पटलावर ठेवावयाचे जे कामकाज होते ते सुध्दा घेऊ नये अशा प्रकारचा आग्रह धरण्यात आला. कारण असे सांगण्यात आले की, हा एक संदेश लोकांपर्यंत जायची इच्छा आहे की, या प्रश्नाचे प्राधान्य इतके मोठे आहे की, त्यासमोर दुसरे कोणतेही कामकाज चालविता कामा नये. मला वाटते, या भूमिकेचाही फेरविचार करण्याची गरज आहे. असा संदेश आपल्याला देण्याची आवश्यकता का वाटली होती? तो आग्रह मान्य करुन त्या पध्दतीने आपण कामकाज केले. हा आपण वरच्या सभागृहात बसतो म्हणून सुचलेला एक विचार होता.

सभापती महोदय, कापूस, धान आणि सोयाबीन या महाराष्ट्रातील एक मोठया विभागातील कोरडवाहू शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करताना अनेक गोष्टींचा ऊहापोह या ठिकाणी मांडण्यात आला. मागील दोन महिन्यात लोकप्रतिनिधींनी जाणीवा, जागृतीच्या ज्या मोहिमा राज्यभरात विविध भागातून घेतल्या, मग त्यात दिंड्या असतील, उपोषण असेल, या सगळ्या माध्यमातून सरकारला जाग येते का असाही एक प्रश्न त्यांनी या निमित्ताने विचारलेला होता. हा प्रश्न सरकारला होता, सरकारच्या व्यवस्थेलाही होता. तसे पहावयास गेलो तर व्यथा आणि वेदनांच्या कहाण्या माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व इतरांच्या भाषणातून मांडल्या गेल्या आहेत. कारण ज्या शेवटच्या माणसांची घरेदारे उद्ध्वस्त झाली, शेतातून काही हाती लागत नाही अशा माणसांपर्यंत पोहोचून त्यांच्या व्यथा या सभागृहात मांडल्या जातात त्यावेळी निश्चित त्यामागील भावना या अतिशय तीव्रतेने व्यक्त होतात. मूळ प्रश्नाकडे लक्ष देताना आपण या सभागृहात अतिशय प्रोफेशनल म्हणता येणार नाही परंतु थोडेसे भावनेच्या आहारी न जाता या प्रश्नाच्या मूलभूत स्वरुपाकडे बघण्याची आवश्यकता आहे. तसे पाहिले तर माणसाची संस्कृती ज्याप्रमाणे उत्क्रांती पथावर चालत जाते, त्यावेळी सगळ्यात प्रथम माणूस काय शिकला असेल? तो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

शेती करण्यास शिकला आहे. म्हणजे कोणत्याही उद्योगधंद्यापेक्षा या जगाच्या निर्मितीपासून, माणसाच्या या पृथ्वीतलावरील अस्तित्वापासून सगळ्यात प्रथम माणूस निसर्गाच्या माध्यमातून आपल्या पोटापाण्याची व्यवस्था करु लागला आणि कालांतराने त्यात फरक पडत गेला. जग वेगवेगळ्या देशात विभागले गेले. देश वेगवेगळया राज्यांमध्ये विभागले गेले आणि प्रत्येकाच्या वाट्याला काहीतरी जमीन आली, नद्या आल्या, डोंगर आले, पाण्याचा साठा आला. भूगोलाचा अभ्यास केल्यानंतर वर्तमानात डोकावून पर्जन्यमानाचा अभ्यास झाला. कस कशात आहे हे पाहिले गेले. कोणत्या भागात काय आहे हे पाहिले गेले. नागपूरची संत्री, नाशिकची द्राक्षे आणि कांदा अशाप्रकारे टप्प्याटप्प्याने विकास होत गेला. हे होत असताना राज्याचे एकूण जमिनीचे क्षेत्र काही वाढविता येणार नाही. एकूण सिंचनाखाली येणाऱ्या जमिनीचे जे क्षेत्र आहे तिच्याही मर्यादा लक्षात येतात. निसर्गाच्या लहरीपणामुळे जे फटके वेगवेगळ्या वेळेला बसणार आहेत त्याचाही अंदाज बांधता येतो. मग व्यवस्थेतील या चौकटी एकदा स्पष्ट झाल्यानंतर दरवर्षीच्या अधिवेशनामध्ये अवकाळी पाऊस, शेतीमालाला योग्य भाव न मिळणे, शेतकऱ्यांची कर्जबाजारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या असे वेगवेगळे विषय एखाद्या दुष्टचक्राप्रमाणे आपल्याभोवती घोंघावत असतात. याचाही मूलभूत विचार या निमित्ताने झाला पाहिजे.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी आपल्या मुद्यांच्या बळकटीकरिता काही आधार घेतले. काही समित्यांच्या अहवालाचाही ऊहापोह या ठिकाणी केला गेला. शासन शेतकऱ्यांना पैसे न देता दारु निर्मिती करणाऱ्या विजय मल्ल्याला 400 कोटी रुपये देते असे सांगण्यात आले. मला वाटते, या गोष्टी अप्रस्तुत आहेत. अधिक माहिती घेतली, दप्तर तपासले तर लक्षात येईल की, जे 400 कोटी रुपये कोण्या एकाला दिले गेले त्या 400 कोटी रुपयांसमोर सिकॉम संस्थेमध्ये त्याचे कितीतरी अधिक रक्कमेचे डिपॉझिट होते. आपला मुद्दा जरुर मांडणे आवश्यक आहे. आज शेतकऱ्यांवर आलेली परिस्थिती अतिशय दयनीय आहे. काही गोष्टी मूलभूत स्वरुपात आपण बघतो त्या वेळेला जागतिकीकरणानंतर जे वातावरण निर्माण झाले त्यातून शासनाने कोणतीही गोष्ट करण्यापेक्षा खाजगीकरणातून ती अधिक चांगली होते, त्याचे निकाल अधिक चांगले मिळतात, कार्यक्षमता अधिक चांगल्या दर्जाची पहावयास मिळते असे आपण अनेक क्षेत्राबद्दल म्हणतो. हे काही प्रमाणात सत्य असले तरी सुध्दा मला वाटते की, राज्य शासनाने

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

कोणता उद्योग संपूर्णपणे आपलाच आहे आणि कोणत्या उद्योगासाठी पहिले प्राधान्यक्रम द्यावयाचे हे कायमच शासनाचे काम आहे हे स्वीकारुनच केले पाहिजे. त्यामध्ये अग्रक्रमाने कृषी क्षेत्राचा विचार निश्चित झाला पाहिजे. या क्षेत्राशी संबंधित जे जे काही आहे ते करण्यासाठी आपल्याला याच क्षेत्रात अधिकाधिक लक्ष केंद्रित करुन त्याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, हे सगळे करीत असताना मला आणखी एका गोष्टीचे स्मरण होते. खूप पूर्वी मी एका इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद वाचला होता. श्रीमती वीणा गव्हाणकर यांनी हा मराठी भाषेतील अनुवाद केलेला होता. एक होता कार्व्हर या नावाचे ते पुस्तक होते. हा कोण होता? हा अमेरिकेतील शेती तज्ज्ञ होता. भुईमुगाचे वाण अमेरिकेमध्ये त्याने पहिल्यांदा शोधून काढले आणि नंतर त्याचा प्रसार कसा झाला आणि कार्व्हरने शेतीमध्ये जी जी क्रांती केली या संदर्भातील ते पुस्तक होते. आपणही बघतो की, भारताच्या कृषी क्षेत्रामध्ये ज्या अनेक प्रकारच्या सुधारणा झाल्या, मग त्यात हरित क्रांती असेल, धवल क्रांती असेल, हे टप्पे पुढे जात असताना अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करीत असताना जो पिकवितो त्याला काय मिळते, त्याच्या जीवनमानाच्या दर्जात गेल्या 15 ते 20 वर्षात काही गुणात्मक वाढ झाली आहे का?

नंतर श्री.खर्चे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

हे चित्र जोपर्यंत स्पष्टपणे मांडत नाही तोपर्यंत यातून मार्ग निघणार नाही. मग आपल्याला धक्का बसतो की, या देशात इतक्या मोठ्या प्रमाणात आर्थिक प्रगतीचा वेग असताना वाढत्या लोकसंख्येत दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या सुध्दा वाढत आहे. त्यानंतर मग नवनवीन प्रकल्प येतात, मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी उपाययोजना केल्या जातात. आपल्या राज्याचा विचार केला तर असे लक्षात येईल की, अनेक जिल्ह्यातील तालुक्यांची परिस्थिती अशी आहे की, या भागातील जीवनमान देशाच्या सरासरीपेक्षा किती तरी कमी आहे. तेव्हा आपल्याला आश्चर्य वाटते की, देशाच्या नियोजन आयोगाने जगण्यासाठी ठरवून दिलेले जे 32 रुपये आहेत किंवा असा जेव्हा निष्कर्ष काढला जातो तो पाहिला की, तेव्हा प्रत्येक वेळेला आपण कोणत्याही प्रश्नाची उकल करताना त्याच त्याच तज्ज्ञांकडे वारंवार कशासाठी जात असतो. का त्यांच्या गृहितकांकडे, त्यांनी धरलेल्या सिध्दांतांकडे जातो, त्यापेक्षा त्यांनी काढलेल्या निष्कर्षांकडे तेवढ्यापुरतेच लक्ष का देत नाही, असा प्रश्न पडतो.

महोदय, काल सभागृहात भाषण करताना दांडेकर समितीच्या अहवालाचा उल्लेख करण्यात आला. तसेच राज्यातील विविध भागांची एकमेकाशी तुलना करण्याची परंपरा आहे. मग त्यात पश्चिम महाराष्ट्राचे पाणी थोडे कमी करुन विदर्भाला मिळू शकेल असाही उल्लेख करण्यात आला, पण हे कसे शक्य आहे याचा खुलासाही होणे आवश्यक होते. आपण जे बोलतो ते कृतीत आणण्यासाठी किंवा तशा प्रकारचा कार्यक्रम ठरविणे खरोखरच शक्य आहे काय याचाही विचार होणे आवश्यक आहे. अशा प्रकारे या अशक्य वाटणाऱ्या गोष्टी आपण बोलत राहिलो तर आपल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी ज्या यंत्रणा आपल्याकडे आहेत त्यांच्यामध्ये काही तरी दोष निर्माण होतील, पर्यायाने आपण चांगल्या व्यवस्थेकडे जाणार नाही अशी शक्यता निर्माण झालेली आहे. या अनुषंगाने एन्रॉन प्रकल्पाचा संदर्भ दिला तरी वावगे ठरणार नाही. त्या काळात एन्रॉन प्रकल्पाच्या संदर्भात एक तज्ज्ञांची समिती नेमली होती. त्या समितीला पुढील 10 ते 15 वर्षात किती वीज लागणार याचा अंदाज काढायला सांगितला होता. त्या समितीने असा अंदाज काढला होता की, राज्यात सध्या पुरेशी वीज असून नवीन वीज प्रकल्पांची गरज नाही. असे धक्कादायक निष्कर्ष आपण शासन म्हणून ज्यावेळी स्वीकारतो तेव्हा आपण आपले राज्य विकासाच्या मार्गावरुन

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

किती तरी मागे नेत असतो याचेही भान ठेवण्याची गरज आहे.

महोदय, आजची चर्चा ही पीक पध्दतीबाबतची आहे. सोयाबीन पिकाला यावर्षी चांगला भाव मिळाल्यानंतर पुढील वर्षी जास्तीत जास्त शेतकरी त्याच पिकाची लागवड करतात व त्यामुळे भाव कमी होतात. कापसाच्या बाबतीत सांगितले जाते की, अमुक भावाने शासनाने कापसाची खरेदी केली तर कापूस संकलन केंद्रांवर कापूस विकण्यासाठी शेतकरी आणत नाही. तर आपल्या कापसाला सध्या आहे त्यापेक्षा अधिक भाव मिळेल असे कोणाच्या तरी सांगण्यावरुन आपला माल साठवून ठेवतो. आणि पुढील काळात चांगला भाव मिळेल म्हणून आपला कापूस विकत नाही. अशा वेळेस व्यापारी यशस्वी होतात आणि मग गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होतात. त्यात कापसाच्या गठाणी निर्यात करण्याचा प्रश्न असेल अथवा अन्य राज्यात आपले उत्पादन जाऊन त्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांच्या बाबतीतील असेल असे अनेक प्रश्न समोर येतात. त्यात काही राजकीय कारण सुध्दा असतात. या सर्व बाबींचा विचार करताना शेवटी पुन्हा असा प्रश्न पडतो की, इस्त्रायल सारख्या छोट्या देशात जेथे जमिनीचे आणि पाण्याचे प्रमाण सुध्दा कमी आहे असा देश शेतीमध्ये अग्रेसर होऊ शकतो तर आपले राज्य का होऊ नये. आपल्या राज्यातील कोणत्याही प्रकारचे पीक घेणाऱ्या शेतकऱ्याला त्याच्या शेतीसाठी लागणारी अवजारे, मजुरांसाठीची मजुरी, बी-बियाणे किंवा खते, फवारणीसाठी औषधे अथवा मालाचा साठा करण्यासाठीचे गोदाम असेल अशा सर्व यंत्रणा आपल्या राज्यात सक्षम बनविणे आवश्यक आहे. यासाठी फार मोठ्या आर्थिक तरतुदीची गरज आहे असे नाही तर केवळ मानसिकता असली तरी या सर्व गोष्टी होऊ शकतात. खूप अडचणीत असलेल्या शेतकऱ्याला दर वेळेस मदतीचा हात देऊन त्याला फक्त खड्डयाच्या बाहेर आपण तात्पुरते काढू शकतो. कापसाला 6 हजार, 3 हजार किंवा 4 हजार रुपये एवढा भाव देण्याचे आमिष दाखवून हे सर्व करु शकतो पण ही मलमपट्टी किती काळ चालू ठेवणार आहोत हा खरा प्रश्न आहे. जेव्हा शेतकऱ्याला मदत केली पाहिजे असे आपण म्हणतो तेव्हा पायाभूत सुविधा आहेत त्या उभ्या करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र मिळून विचार केला पाहिजे. काल सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी केलेल्या भाषणात एक हेक्टर आणि काही गुंठे जमिनीचे उदाहरण देऊन अतिशय चांगला उल्लेख केला. तेवढ्या कमी जमिनीत

.....3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

त्या शेतकऱ्याला आपला संसार चालवावयाचा असेल तर ते शक्य नाही. याबाबत आपण जेव्हा विचार करतो तेव्हा असे लक्षात येते की, या शेतकऱ्यांनी कापूस, धान अथवा सोयाबीनचे पीक घेतले तरी तो एक वर्षाच्या काळात किती काळ आपली शेती करतो. जेवढा काळ या पिकासाठी लागतो तो काळ सोडून उरलेल्या दिवसात त्याच्या शेतीला जोडधंदा म्हणून गायी-म्हशी अथवा पोल्ट्री फॉर्म सारख्या जोडधंद्याची मदत झाली तर त्याचे आर्थिक उत्पन्न वाढू शकेल. पण या सर्व गोष्टींचा फायदा शेवटच्या घटकापर्यंत पोहचत नाही म्हणून यंत्रणांमधील दोष किंवा अडचणी असतील त्या दूर करणे आवश्यक आहे. कारण अशा प्रकारच्या योजना केवळ कागदावरच चांगल्या वाटतात, प्रत्यक्षात त्याचा फायदा फार कमी लोकांना मिळताना दिसतो अशी परिस्थिती आहे. अशी दूरवस्था असताना आपण विचार करतो की, या छोट्या शेतकऱ्याची जीवन पध्दती जी झालेली आहे त्यातून त्याला बाहेर काढण्याची गरज आहे.

महोदय, मघाशी सभागृहात समूह शेतीबाबतचा विचार व्यक्त करण्यात आला होता. पण त्यात अशी भीती आहे की, राज्यातील नाडलेला व पिचलेला शेतकरी हा सर्वच बाजूंनी प्रामाणिक असल्याने त्याला त्याच्या कष्टाची फक्त किंमत मिळावी अशी अपेक्षा आहे. त्यामुळे या समूह शेतीत वेगवेगळे धोके संभवण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. मी दोन तीन महिन्यापूर्वी एका आंतरराष्ट्रीय दैनिकात वाचले आहे की, आपल्या देशातील प्रमुख उद्योगपतींपैकी काही ठराविक उद्योगपती वेगवेगळ्या छोट्या देशांमध्ये जाऊन हजारो एकर जमिनीची खरेदी करतात आणि तेथे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने त्यांनी मोठ्या प्रमाणावर शेतीतून उत्पादन काढण्यास सुरुवात केली आहे. पण मला वाटत नाही की, या देशातील 150 ते 200 उद्योगपती घराण्यांपैकी कोणी अशा उत्पादनाकडे वळलेले असेल. कारण ज्यावेळेस आपल्या राज्यात कापसाचे उत्पादन घेतले जाते तसे ते बांगला देशात घेतले जाते, पाकिस्तानमध्ये सुध्दा घेतले जाते. त्यातून स्पर्धा करीत असताना आपल्या कापसाचा दर्जा, एकरी उत्पादन यासंबंधीचे गणित जमवित असताना आंतरराष्ट्रीय पातळीवर विचार करतो तेव्हा त्यांच्यापेक्षा आपल्या स्पर्धेची तीव्रता पुढील काळात वाढवून शेतमालाच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय पातळीवर आव्हान दिले जाणार आहे आणि ही परिस्थिती जेव्हा आपल्या देशात निर्माण होईल तेव्हा निश्चितपणे आपल्या राज्यावर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशोधित प्रत / शोधनेसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

त्यामुळे या प्रश्नाचा आपल्याला व्यापक व गंभीरपणे विचार करावा लागणार आहे. आपण आपल्या राज्यातील शेती क्षेत्रासाठी पाण्याची योजना, विजेची उपलब्धता, बी-बियाणे, खतांची उपलब्धता केली आहे. शेतीच्या मजुरीचा प्रश्नाला तात्पुरती उपाययोजना म्हणून नरेगा मधून शेतक-याला सवलत द्यावी यासंदर्भातही पाऊले उचलली आहेत.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेली यांनी सांगितले आहे की, शेतक-याला मजुरी देता येत नाही म्हणून त्याला आपल्या 80 वर्षाच्या आईला कापसाची वेचणी करण्यासाठी न्यावे लागते. या देशात वृध्दांची संख्या मोठया प्रमाणात वाढत आहे. सामाजिकतेचा विचार केला तर जे वृध्द आहेत त्यांना त्यांचे उरलेले आयुष्य समाधानाने घालवण्यासाठी तसेच दोन घास खाऊन आयुष्य सुदृढ राहील यासाठी विचार करावा लागणार आहे. परंतु वृध्दांना आपण जर मजुरीच्या तांडयाकडे नेणार असू तर ही व्यवस्था कोठे तरी बिघडलेली असून त्यामध्ये मूलभूत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. यामध्ये केवळ तज्ञांवर अवलंबून न राहता योग्य ती उपाययोजना तातडीने निर्माण करण्याची गरज आहे. या सर्व व्यवस्थेकडे बघितल्यानंतर कृषी संस्कृतीचा झालेला विकास, कोकणात फलोत्पादनात झालेली क्रांती तसेच पश्चिम महाराष्ट्रात फुलांची शेतीची झालेली क्रांती यामध्ये आपण प्रगती केलेली आहे. नागपूर मधील संत्रा पिकावर होणारी प्रक्रिया विदर्भात होणे आवश्यक आहे. आपण या ठिकाणी कृषी क्षेत्रावर नेहमी चर्चा करतो परंतु कृषी क्षेत्राच्या संदर्भात योग्य पाऊल आपल्याला टाकता आले नाही तर कृषीवरील चर्चा वांझ ोटी ठरण्याची शक्यता आहे. सभागृहापुढील सर्व कामकाज थांबवून आज आपण विदर्भातील कापूस, धान व सोयाबीनवर चर्चा सुरु करुन शेतीच्या प्रश्नांना वाचा फोडली आहे. शेतक-यांना तातडीने मदत करण्याच्या उपाययोजनेबद्दल सभागृहाच्या दोन्ही बाजूचे सदस्य आग्रही आहेत. शासन दर वर्षी शेतक-यांना मदत करीत असते त्यामुळे यावर्षी देखील शासन मदत करेन. पुढील वर्षी दुस-या पिकाच्या संदर्भातील प्रश्न सोडविण्यासाठी आंदोलने, मोर्चे होतील, सभागृहात चर्चाही होईल, शासनाकडून मदतही दिली जाईल परंतु शेतीसाठीचे क्षणिक समाधान आपण कोठे तरी थांबविले पाहिजे. शेतीच्या प्रश्नाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

मुळाशी जाऊन आपल्या राज्याचा शेतकरी सक्षम कसा होईल, त्याची कुटुंब व्यवस्था चांगली कशी होईल, त्याचे आरोग्य चांगले कसे होईल, शेतक-यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय आपण चांगल्या प्रकारे कशी करु शकतो या प्रादेशिक सीमांच्या वादामध्ये किंवा चर्चेमध्ये न अडकता एक सर्वांगीण कृती प्रकल्प शासनाने हाती घ्यावा असे मला या चर्चेच्या निमित्ताने सुचवावेसे वाटते.

सभापती महोदय, या चर्चेमध्ये मला भाग घेण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्रात सर्वात जास्त उत्पादन कापसाचे घेतले जाते. विदर्भामध्ये कापसाबरोबर धान व सोयाबीनचे उत्पादनही मोठया प्रमाणात घेतले जाते. विदर्भातील कापूस, धान व सोयाबीनच्या विषयाच्या संदर्भात या सभागृहात चर्चा उपस्थित करण्यात आलेली असून या चर्चेच्या अनुषंगाने माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा तसेच खान्देश हा अविकसित भाग आहे. विदर्भ, मराठवाडा व खान्देशच्या शेतक-यांना शासन दर वेळेस मदत करीत असते व या वर्षी त्याच निमित्ताने या सदनात चर्चा सुरु आहे. विदर्भात या वर्षी कापूस, सोयाबीन व धानाचे उत्पादन कमी प्रमाणात झालेले आहे. यावर्षी शेतीवर नैसर्गिक आपत्ती तसेच उत्पादन खर्च मोठया प्रमाणात वाढल्यामुळे शेतक-यांसमोर मोठी आर्थिक अडचण निर्माण झालेली आहे. कापूस, सोयाबीन व धानाला राज्य शासनाने मदत करावी यासाठी सभागृहाच्या बाहेर व सभागृहात चर्चा सुरु आहे.

सभापती महोदय, देशामध्ये तसेच परदेशामध्ये कापसाला तसेच इतर धान्याला काय भाव दिले जातात याचा विचार करावा लागणार आहे. शेतीमधून उत्पादन जास्त प्रमाणात निघाले तर मालाला भाव कमी मिळाला तरी शेतक-याला जास्त झळ पोहचत नाही. परंतु या वर्षी कापूस, धान व सोयाबीनचे उत्पादन फार कमी प्रमाणात निघाले आहे, त्याच बरोबर उत्पादनाचा खर्चही वाढला आहे तसेच मागच्या वर्षीपेक्षा कापूस, सोयाबीन व धानाला कमी प्रमाणात भाव मिळत आहे व या सर्वांमुळे शेतक-यांमध्ये असंतोष पसरल्यामुळे सभागृहात आपण चर्चा करीत आहोत.

सभापती महोदय, विदर्भामध्ये पहिल्यापासून कापसाची लागवड मोठया प्रमाणात होते. परंतु सुरुवातीला कापसाचे दर आणि कापडाच्या दरात प्रचंड तफावत होती. त्यामुळे शेतक-यांच्या कापसाला कापडापर्यंतचे दर मिळावे यासाठी माननीय यशवंतराव मोहिते हे सहकार मंत्री असतांना त्यांनी कापूस एकाधिकार योजना या राज्यात सुरु केली. कै.वि.स.पागे यांनी टिळक भवन येथील काँग्रेस कमिटीमध्ये बसून कापूस एकाधिकार योजनेचा मसुदा तयार केला होता व त्यामध्ये कापूस एकाधिकार योजना कशा प्रकारे असली पाहिजे, पर्चेसिंग कशा प्रकारे झाले पाहिजे, त्याचे परिणाम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .....

काय होतील याचा विचार केला होता. देशातील इतर कोणत्याही राज्यात कापूस एकाधिकार योजना सुरु नसतांना आपल्या राज्याने ही योजना प्रथमत: सुरु केली व या सदनात तशा प्रकारचा कायदाही करण्यात आला. कापूस एकाधिकार खरेदी योजनेमध्ये जो काही तोटा होईल तो शासन सहन करील व जो काही नफा होईल तो शेतक-यांना दिला जाईल अशा प्रकारचा निर्णय या योजनेमध्ये घेण्यात आला होता. कापूस एकाधिकार खरेदी योजना महाराष्ट्रात चांगल्या प्रकारे सुरु झाली. या योजनेमध्ये केंद्र शासनाच्या आधारभूत किंमतीवर कापसाची खरेदी केली जात असे व त्यातून 3 टक्के डेव्हलपमेंट फंड कापला जात असे तसेच अतिरिक्त फायद्याच्या 25 टक्के बोनस शासन संग्रही ठेवत असे व 75 टक्के नफा शेतक-याना दिला जात असे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभाध्यक्ष श्री.भगवान साळुंखे)

श्री.माणिकराव ठाकरे.....

1974 पर्यंत आपण अतिरिक्त बोनस कापसासाठी देत होतो. आपण 100 रूपये, 150 रूपये, 300 रूपये अतिरिक्त बोनस कापसासाठी दिलेला आहे. 1994 मध्ये संपूर्ण राज्यामध्ये आधारभूत किंमतीने आपण कापूस खरेदी करीत होतो. त्यावेळी बाहेरच्या राज्यामध्ये कापसाचे भाव मोठ्या प्रमाणावर वाढले होते. केंद्र सरकारच्या माध्यमातून 1500 रूपये या आधारभूत दराने आपण शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करीत होतो. त्याच वेळी बाहेरच्या राज्यामध्ये कापसाची किंमत साधारणत: 2100 ते 2200 रूपये होती. त्यामुळे राज्याच्या सीमेवर शेतकऱ्यांची शासनाशी कापसाला भाव वाढवून देण्यासंबंधीची झुंज सुरू झाली होती. शेतकऱ्यांचे म्हणणे होते की, आमचा कापूस परराज्यात विकायला परवानगी द्यावी. आपल्या राज्यात कापूस एकाधिकार योजना असल्यामुळे आपल्या राज्यातील कापूस बाहेरच्या राज्यात घेऊन जाता येत नाही हे सांगण्याचा शासन प्रयत्न करीत होते. या संघर्षातून शेतकऱ्यांवर गोळीबार देखील झाला, हे आपणा सर्वांना आठवत देखील असेल. त्यावेळी मी महाराष्ट्र युथ कॉंग्रेसचा अध्यक्ष असताना यवतमाळ येथे एक सभा घेतली होती. या सभेला दीड लाख लोक आले होते. त्यावेळी श्री.शरश्चंद्रजी पवार साहेब हे मुख्यमंत्री होते. त्यावेळी माझ्या प्रास्ताविक भाषणामध्ये मी बाहेरच्या राज्यात कापसाला 2100 ते 2200 रूपये भाव असल्यामुळे व आपल्या एकाधिकार कापूस योजनेच्या भाव रूपये 1500 असल्यामुळे आपण शेतकऱ्यांना नफा येण्यापूर्वीच अतिरिक्त बोनस देण्याची पद्धत अंगिकारावी अशी विनंती माननीय मुख्यमंत्र्यांना केली होती. सप्टेंबर 1994 मध्ये घेतलेल्या दीड लाख लोकांच्या सभेमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना 500 ते 450 रूपयांचा अतिरिक्त बोनस दिला जाईल. सप्टेंबरच्या पुढच्या काळात युती शासन आले. त्यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्याच्या कापसाला 2100 रूपये भाव मिळावा म्हणून 450 ते 500 रूपये अतिरिक्त बोनस देण्यासंबंधीची पद्धत पुढे सुरू ठेवली. त्यानंतर 1999 मध्ये लोकशाही आघाडीचे सरकार आले. त्यावेळी आम्हीच आग्रह धरला की, मागच्या 2100 रूपये भावावरून आपण पुढे

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

जावे. कारण आम्ही निवडणुकीच्या वेळी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना भाव देऊ असे जाहीर केले होते. त्यामुळे 1999 मध्ये श्री.विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसाला 2300 रूपये भाव देण्याचा निर्णय नवनियुक्त झालेल्या मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीमध्ये घेण्यात आला. त्यावेळी राष्ट्रवादी पक्षातील बरेच मंत्री त्या मंत्रिमंडळाच्या बैठकीला उपस्थित नव्हते. पहिल्याच मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय घेण्याचे ठरले होते त्याप्रमाणे तो घेण्यात आला. त्यानंतर श्री.सुशीलकुमारजी शिंदे हे मुख्यमंत्री झाल्यानंतर कापसाला अतिरिक्त बोनस देऊन 2500 रूपये भाव देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी सदनामध्ये कापूस एकाधिकार योजनेवर बऱ्याच वेळा चर्चा व्हायची. नागपूरचे अधिवेशन आल्यानंतर कापसाला भाव वाढवून देण्याची मागणी पुढे यायची. याला कारण नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यामध्ये शेतकऱ्यांच्या हातामध्ये मोठ्या प्रमाणावर कापूस पडतो. त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्याला मदत करण्यासंबंधीच्या बाबी पुढे येतात. त्याप्रमाणे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्यासंबंधीच्या घोषणा नागपूर अधिवेशनात केल्या आहेत. सन 2000 मध्ये कापसाचे भाव बाहेर जास्त वाढले. त्यावेळी सदनातील दोन्ही बाजूने आवाज उठविण्यात आला की, व्यापाऱ्यांचा भाव जास्त आहे, त्यामुळे व्यापाऱ्यांना देखील कापूस खरेदी करण्यास अनुमती देण्यात यावी. तेथूनच आपण कापूस एकाधिकार योजनेला तिलांजली देण्यास सुरूवात केली. त्यावेळी आम्ही विदर्भातील नेते चुकलो. त्यावेळी कापूस एकाधिकार योजना सुरू ठेवली असती, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अतिरिक्त बोनस देण्याचाच पायंडा सुरू ठेवला असता तर आज ही वेळ आली नसती. त्यावेळची विरोधी पक्षाची भाषणे ऐकली तर असे दिसून येईल की, त्यांनी शासन कापसाला भाव कमी देत असल्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना खुल्या मार्केटमध्ये कापूस विकण्यास परवानगी द्यावी, अशा प्रकारची मागणी केली आहे. तसेच व्यापाऱ्यांना कापसाची खरेदी करू द्यावी अशा प्रकारची देखील मागणी करण्यात आली होती. त्यामुळे कापूस एकाधिकार योजनेसंबंधीचा जो कायदा होता त्यावर सदनामध्ये चर्चा करण्यात आली व तो कायदा मागे घेऊन कापूस खुल्या बाजारात विक्री

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

करण्यासाठी मोकळा करण्यात आला. खुल्या बाजारात कापसाची विक्री सुरू ठेवल्यामुळे फेडरेशनकडे कोणीही कापूस विक्रीसाठी आणला नाही. कापूस विक्री केंद्र ओस पडत होती. सर्व कापूस व्यापाऱ्यांकडे जात होता. कापूस खरेदी योजना भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असल्यामुळे पुन्हा सुरू करावी यासंबंधीचा कोणताही प्रस्ताव गेल्या दहा वर्षात विरोधी पक्षाकडून किंवा अन्य माननीय सदस्यांकडून आलेला नाही. आज आपण दहा वर्षानंतर कापसाला भाव मिळावा म्हणून चर्चा करण्यासाठी बसत आहोत. सन 2002 पर्यंत शासनाचे कापूस फेडरेशन होते आणि आता आपण कापसाला 6000 रूपये भाव द्यावा या अविर्भावात बोलत आहोत. आता व्यापाऱ्यां मार्फत कापूस खरेदी होते. त्यामुळे आता आपण फेडरेशकडून भाव मागण्या पेक्षा आजची परिस्थिती काय आहे या सर्वांचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे असे मला वाटते. आज महाराष्ट्र फेडरेशन मार्फत कापूस खरेदी करण्यात येत नाही. ग्रेडर आहेत काय, फेडरेशनकडे किती कर्मचारी आहेत, कापूस खरेदीची व्यवस्था फेडरेशनतर्फे होत आहे काय, याचा विचार केला पाहिजे. आपण गेल्या काही वर्षापासून फेडरेशन मार्फत कापूस खरेदी करीत नाही. कापूस खरेदी करीत आहोत हे भासविण्यासाठी ती जबाबदारी आता आपण नाफेडवर टाकलेली आहे. नाफेड ही केंद्र शासनाची संस्था आहे. नाफेड पूर्वीपासून त्यांच्या ज्या प्रथा आहेत त्याप्रमाणेच कापूस खरेदी करते. शेतकरी अडचणीत आला म्हणून त्यांना मदत करण्याची भूमिका नाफेडने कधीच केलेली नाही. आधारभूत किंमत वाढवली पाहिजे अशा प्रकारची मागणी भारतीय जनता पक्ष व शिवसेनेचे खासदार केंद्रात करत आहेत. भाजपा-शिवसेनेचे केंद्रात सरकार असताना कापसाची आधारभूत किंमत एकदा तरी वाढली होती काय ? केंद्राने आधारभूत किंमत वाढवून दिली पाहिजे अशी मागणी करून विरोधी पक्षाने राजकारण करता कामा नये. केंद्र शासन सर्व मालाला सपोर्ट प्राईझ जाहीर करते. मालाला एक ठराविक किंमत मिळावी म्हणून केंद्राने आधारभूत किंमती जाहीर केलेल्या आहेत. कापूस एकाधिकार योजना केंद्र शासनाची नव्हती. कापसापासून कापडापर्यंतचा सर्व नफा शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे अशी आधारभूत किंमत त्यांना अभिप्रेत नाही.

या नंतर श्री.सरफरे....

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे....

त्यांनी फक्त एका विशिष्ट किंमतीपेक्षा शेतीचे भाव खाली जाऊ नयेत म्हणून आधारभूत किंमत दिली पाहिजे एवढयापुरता मर्यादित स्वरुपात केंद्र सरकारचा त्यामध्ये सहभाग येतो. परंतु त्यामध्ये राज्य सरकार आणि फेडरेशनकडून व्यवस्था होत नसेल तर काय केले पाहिजे हा महत्वाचा विषय आहे. आज आपण फेडरेशनमध्ये सर्व ग्रेडरची भरती करणार काय, सर्व कर्मचाऱ्यांची भरती करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय? फेडरेशनमार्फत सर्व केंद्रे सुरु करण्याचा निर्णय राज्य शासन घेणार आहे काय? तसे असेल तर विरोधी पक्षाकडून त्याबाबतची मागणी करणे आवश्यक होते की, राज्य सरकारमार्फत फेडरेशनमधील सर्व केंद्रे तत्काळ सुरु केली पाहिजेत, सर्व ठिकाणी कर्मचारी भरले गेले पाहिजेत. तशाप्रकारची व्यवस्था निर्माण केल्यानंतर राज्य सरकारने कापसाची खरेदी सुरु केली पाहिजे आणि शेतकऱ्याच्या कापसाला योग्य भाव दिला पाहिजे. परंतु ही कोणतीही व्यवस्था राज्यामध्ये अस्तित्वात नाही. अशावेळी आपण कापसाला अधिक भाव मिळण्यासाठी चर्चा करतो त्यावेळी अस्तित्वात असलेल्या परिस्थितीच्या आधारावर आपल्याला चर्चा करावी लागेल. एकंदरीत असलेली सर्व परिस्थिती आपल्यासमोर असून मी राज्य शासनाला सांगितले आहे की, कापूस उत्पादकांचा विषय हा नागपूरच्या अधिवेशनापुरता किंवा जिल्हा परिषदा, महानगरपालिकांच्या निवडणुकांपुरता मर्यादित नाही. कापसाचा विषय हा कायमचा भेडसावणारा असल्यामुळे आपल्याला कायमस्वरुपी व्यवस्था करावी लागेल.

सभापती महोदय, आपण कापूस एकाधिकार खरेदी योजना बंद केली. त्या योजनेच्या माध्यमातून आपण गेली 25 ते 30 वर्षे वेगवेगळया प्रकारचे अनुभव घेतल्यानंतर त्या योजनेला कुणीही समर्थन दिले नाही. त्या योजनेच्या माध्यमातून कापसापासून कापडापर्यन्त जाण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक होते परंतु दुर्दैवाने तसे प्रयत्न केले गेले नाहीत. त्यावेळी शेतकऱ्यांनी आपल्याकडील 3 टक्के रक्कम शासनाकडे जमा ठेवली होती. त्यामधून राज्य सरकारकडे 900 कोटी रुपये जमा झाले होते. 1:9 प्रमाणे हिशेब केला तर 10 हजार कोटींचा प्लॅन करावयास पाहिजे होता, परंतु त्याबाबत कुणीही माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामधून तो विषय मांडलेला नाही. त्यांनी फक्त कापसाला भाव वाढवून देण्यात यावा एवढीच मागणी केली. लोकप्रतिनिधी म्हणून आपल्या भागातील शेतकऱ्यांच्या मालाला अधिक भाव मिळवून देण्यासाठी आम्ही देखील सातत्याने मागणी करीत आलो आहोत. त्याबाबतीत शासनाकडून सुध्दा पुढील पावले उचलली गेली नाहीत. त्यामधून कापूस एकाधिकाराचा उद्देश बाजूला पडल्यानंतर आज कापूस खरेदीच्या संदर्भात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री. माणिकराव ठाकरे....

काहीतरी पावले उचलणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सर्वात महत्वाचा मुद्दा असा की, यामध्ये किती मदत द्यावयाची, किती एकरी भाव द्यावयाचा या बाबतचा निर्णय राज्य शासन घेईल याची आपल्याला जाणीव आहे. त्या संदर्भात सुरुवातीला कॉग्रेस पक्षाने भूमिका घेतली, माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेतली, मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये चर्चा झाली. पहिल्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत आहे,सोयाबीन आणि धान उत्पादक शेतकरी अडचणीत असल्यामुळे त्यांना मदत दिली पाहिजे. त्यामुळे या प्रश्नाकरिता कुणालाही मोर्चा काढणे,आंदोलन करण्याची गरज नाही. ही मदत करण्यासाठी राज्य शासनाच्या असलेल्या एकूण बजेटची मांडणी करीत असतांना त्याकरिता राज्य सरकारला बजेटमध्ये किती कपात करावी लागेल. त्यामुळे कोणत्या कामांवर इफेक्ट होऊ शकेल आणि कोणत्या कामांवर इफेक्ट होऊ शकणार नाही या संदर्भात गणिते मांडली गेली असती तर शेतकऱ्याला अधिक मदत देण्याबाबत निश्चितपणे हातभार लागला असता. परंतु तशाप्रकारची भूमिका न घेता फक्त क्विंटलमागे भाव वाढवून द्या, कुणी सहा हजार तर कुणी सात हजाराची मागणी केली. या ठिकाणी 9 ते 10 हजाराची मागणी केली तर ती लोकांना अधिक पसंत पडेल . जर कुणी 10 हजाराची राजकीय स्वरुपामध्ये मागणी करीत असेल तर त्याला निवडून दिले पाहिजे असा लोक विचार करतील. परंतु कुणी असाही विचार करील की, 6 हजाराची मागणी करीत असतांना शासनाला बजेटमध्ये किती कपात करावी लागेल, कोणकोणत्या कामांवरील तरतूद आपल्याला कमी करावी लागेल, कोणकोणत्या कामासाठी बजेटमध्ये किती तरतूद ठेवली आहे त्यापैकी कोणत्या कामांना कपात लावली पाहिजे, त्यामध्ये कोणती कामे टाकली गेली पाहिजेत, कोणत्या कामांसाठी कर्ज घेतले पाहिजे हे सर्व आपण सामूहिकपणे ठरविले पाहिजे. कर्ज घेण्याची वेळ आली तरी चालेल परंतु शेतकऱ्यांना मदत द्या असेही म्हटले जाईल. यामध्ये जो काही आपल्याला निर्णय घ्यावयाचा असेल त्याकरिता आपल्याकडे असलेल्या बजेटची मांडणी योग्य प्रकारे केली तर शासनाला देखील त्या संदर्भात योग्य पध्दतीने निर्णय घेणे सोयीचे होईल.

सभापती महोदय, कापसाच्या भावाच्या संदर्भातील महत्वाचा विषय असून त्या संदर्भात मला आपल्याला सांगितले पाहिजे की, संपूर्ण राज्यामध्ये फक्त विदर्भापुरता मर्यादित विषय राहिलेला नाही तर विदर्भामध्ये 40 लाखापैकी 15 लाख हेक्टरमध्ये कापूस पिकविला जातो. बऱ्याचवेळा

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री. माणिकराव ठाकरे...

शेतकऱ्यांना सांगितले जाते की, तुम्ही कापसाऐवजी दुसरे कुठलेतरी पीक घेतले पाहिजे. या संदर्भात आपण नेहमी विदर्भातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत असतो. विदर्भातील शेतकऱ्यांना केलेल्या मार्गदर्शनानुसार त्यांनी सोयाबीन लावला परंतु पुढे काय हाल झाले? मागील वेळी त्यांच्या सोयाबीनला 2900 चा भाव होता यावेळी 1600 रुपये भाव द्यावा लागत आहे. म्हणजे जिकडे आपण काही करावयास जातो त्याठिकाणी आपला पाय डोहात जातो. त्यामधून पाहिले तर त्या परिसरात 3 ते 5 टक्केपेक्षा जास्त इरिगेशन होत नाही. आपल्याकडे कापसाचे उत्पादन अल्प प्रमाणात होत असल्यामुळे संपूर्ण देश पातळीवर महाराष्ट्राइतके कमी उत्पादन अन्य कोणत्याही राज्यामध्ये सरासरीप्रमाणे होत नाही. आपल्याकडे तीन ते साडे तीन क्विंटलपर्यन्त उत्पन्न मिळते. बाकीच्या राज्यामध्ये चार ते साडे चार, पाच क्विंटलपर्यन्त उत्पन्न मिळते. एकंदरीत या राज्यातील शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती पहाता इरिगेशनचे प्रमाण सुध्दा कमी आहे. त्याचप्रमाणे खताची किंमतही 300 ते 400 रुपयांनी वाढलेली, कापूस वेचण्यासाठी क्विंटलमागे 800 ते हजार रुपये खर्च येतो. अशाप्रकारे सर्व वस्तूंचे भाव वाढल्यानंतरही शेतकऱ्यांच्या शेतामध्ये होणाऱ्या उत्पादनावर त्याला उपजीविका करावी लागते, त्याला आपला संसार चालवावा लागतो, बॅन्केची देणी द्यावी लागतात. अशावेळी अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याला अडचणीतून बाहेर काढण्याची सर्वस्वी राज्य सरकारची जबाबदारी असते. त्यावेळी अन्य बाहेरच्या राज्यामध्ये कापसाला भाव कमी आहे असे आपल्याला सांगता येणार नाही. परंतु राज्यातील एकंदरीत सर्व परिस्थिती पाहिल्यानंतर शेतकऱ्याला पुरेसे उत्पादन न मिळाल्यामुळे तो अडचणीत सापडला असेल तर त्याच्या मदतीला आपण नेहमी धावून गेलो आहोत.

या वर्षी विदर्भामध्ये कापसाचे उत्पादन कमी झाले, फक्त 15 लाख हेक्टर क्षेत्रामध्ये कापसाची लागवड झाली, मराठवाडयामध्ये 17 लाख हेक्टरमध्ये लागवड झाली, 9 ते 10 लाख हेक्टर क्षेत्रामध्ये खानदेशामध्ये लागवड झाली. खानदेशातील एकटया जळगाव जिल्ह्यात साडे पाच ते सहा लाख हेक्टरमध्ये कापसाची लागवड झाली. याचा अर्थ कापसाच्या उत्पादनाचे स्थानांतर आता होत आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आता कापूस परवडेनासा झाला आहे,त्याला दुसरे उत्पन्नाचे साधन सापडत नाही. त्याकरिता इरिगेशनची व्यवस्था होणे अत्यंत गरजेचे आहे. आपण धरणे बांधल्यानंतर शेतकऱ्याच्या शेतीला पाणी मिळेपर्यन्त किती काळ जाईल हे सांगू शकत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ KTG/

श्री.माणिकराव ठाकरे....

तोपर्यन्त किती शेतकरी आत्महत्त्या करतील हे सांगता येणार नाही. त्याकरिता तत्कालिक स्वरुपाची उपाय योजना आपण केली पाहिजे. त्यामध्ये ठिबक सिंचन योजना असेल, टयूब वेलची योजना असेल, ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे ते पाणी शेतकऱ्याच्या शेतापर्यन्त आणता आले पाहिजे तशी व्यवस्था आपण केली पाहिजे.

शेतकऱ्याला शेतीबरोबर जोडधंदा दिला पाहिजे. शेतकरी अडचणीत असेल त्यावेळी त्याला मदत करण्यामध्ये आपण मागे रहात नाही. राज्य सरकारने त्यांना अनेक वेळा मदत केली आहे. या राज्यात शिवसेना आणि भारतीय जनता पार्टीचे सरकार असतांना शेतकऱ्यांना एकदा मदत करण्याचा प्रसंग आला होता. त्यावेळी राज्य सरकारने शेतकऱ्यांना मदत केलेली होती. माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांना आठवत असेल. त्यांना मदत मिळाली नसल्यामुळे कदाचित ते विसरले असतील. त्यावेळी राज्य सरकारने कापसाच्या बोंड अळीसाठी अडीच हजार रुपये हेक्टरी मदत जाहीर केली होती व 4 हेक्टरपर्यन्त मदत देण्याची घोषणा केली होती. त्या संदर्भात काही जिल्ह्यांमधून अहवाल सुध्दा मागविण्यात आले होते. विदर्भातील यवतमाळ, अमरावती, वर्धा या सर्व कापूस उत्पादक जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांना मदत देण्याकरिता हेक्टरी किती पैसे लागतील, जिल्हाधिकाऱ्यांना किती पैसे दिले पाहिजेत या बाबत विचारणा करण्यात आली होती. त्यावेळी वर्धा, अमरावती, नागपूर, चंद्रपूर या जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे अहवाल पाठविले होते. त्या अहवालाच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्याला 45 ते 50, 52 कोटी रुपये त्यावेळच्या युती सरकारने पाठविले होते. ज्यावेळी मोठया प्रमाणात पैसे जात आहेत असे वाटल्यानंतर शासनाने पैसे पाठविणे बंद केले. त्यानंतर यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, अकोला, परभणी, जालना या जिल्ह्यांचे अहवाल आले आणि प्रत्येक जिल्ह्यांना 40 ते 50 कोटीं रुपये द्यावे लागतील असे सांगण्यात आले. त्यानंतर युती सरकारने एकही पैसा त्या जिल्ह्यांना पाठविलेला नाही. फक्त चार जिल्ह्यांना मदत मिळाली. अमरावती, यवतमाळ आणि अकोला हे तीन जिल्हे असे आहेत की, या तिन्ही जिल्ह्यांच्या सीमा रेषेवर दोनंद गावामध्ये माझी सासरवाड आहे. त्या गावात जाऊन मी कुणाकुणाला मदत मिळाली अशी विचारणा केली. त्यावेळी तीन जिल्ह्यातील सीमेवर रहात असलेले लोक मला भेटायला आल्यानंतर मी त्यांच्याबरोबर चर्चा करण्यास बसलो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यावेळी अमरावती मधील लोकांनी सांगितले की, आम्हाला एकेका शेतकऱ्याला 15 हजार, 20 हजार रुपये मिळाले. मात्र यवतमाळ आणि अकोला येथील शेतकऱ्यांनी सांगितले की, आम्हाला एकही पैसा मिळाला नाही. कलेक्टरकडे केवळ तीन-चार जिल्ह्यांतील शेतकऱ्यांसाठी निधी पाठविला, बाकीच्या भागांसाठी पाठविला नाही.

सभापती महोदय, आपण कापसाच्या संदर्भात मदतीच्या दृष्टीकोनातून वेगवेगळया वेळेस निर्णय घेतले आहेत. कदाचित त्या-त्या वेळेला कधी कमी मदत दिली असेल किंवा कधी जास्त दिली असेल. मागच्या वेळी युती शासनाच्या काळामध्ये संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 23 लाख हेक्टर कापूस होता आणि त्याप्रमाणे मदत देण्यात आली. मात्र आपण आजचा हिशोब केला तर जवळजवळ 40 लाख हेक्टर कापूस असून जवळजवळ दुप्पटीने कापसाच्या उत्पादनामध्ये वाढ झालेली आहे. परंतु ही वाढ इतर ठिकाणी झाली. विदर्भामधील हे शिप्टींग झाले. त्यामुळे आजच्या परिस्थितीत 40 लाख हेक्टरसाठी मदत देत असताना किती मदत दिली पाहिजे, बजेटसाठी किती कपात लावली पाहिजे यादृष्टीने सुध्दा राज्य शासनाने भूमिका घेऊन याच अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा करावी आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आणि धान उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने चांगल्या प्रकारे मदत द्यावयास पाहिजे अशा प्रकारे सदनामध्ये अपेक्षा व्यक्त करतो. राज्य शासन शेतकऱ्यांना मदत देणार आहे आणि त्याबद्दल कोणाचेही दुमत नाही. याबाबतीत बऱ्याच जणांशी चर्चा देखील केलेली आहे. मला असे वाटते की, याबाबत विरोधी पक्षाच्या नेत्यांनी सुध्दा चर्चा करावी. जेणेकरुन त्यांना सुध्दा या संदर्भातील अंदाज येऊ शकतो. यासाठी शासनाने एखादी बैठक घ्यावयास हरकत नाही. काल-परवा सत्तारुढ पक्षाचे सन्माननीय सदस्य आणि अपक्ष सदस्यांची एक बैठक झाली. त्यावेळी देखील सर्वांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.मात्र त्यावेळी आपल्या भावना मांडत असताना कापसाला क्विंटलमागे भाव देण्यात यावा अशा प्रकारची कोणीही लमसम भूमिका घेतली नाही.त्यावेळी अशीच मागणी करण्यात आली की,आता शेतकऱ्यांना हेक्टरी मदत दिली पाहिजे आणि जी वास्तविकता आहे. ज्या आधारावर आपण मदत देऊ शकतो. यामध्ये राजकारणासाठी नाही पण 7 हजार रुपये दिलीच पाहिजे अशी मागणी केली आहे. पण ही बाब शेतकऱ्यांना कशी माहिती होईल? त्यांना वाटेल की, पूर्वीही शासन 500,700, 1000 रुपये वाढवून देत होते. कोणी आंदोलन केले किंवा अधिवेशन असले तर 200 रुपये, 300 रुपये वाढवून द्या हे असे होत असे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे . . . .

आजच्या वास्तव परिस्थितीमध्ये शासनाला हेक्टरीच मदत द्यावी लागणार आहे. परंतु ही मदत मात्र मोठ्या प्रमाणात असावयास पाहिजे अशी मी कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय,धानाच्या संदर्भात सांगावयाचे तर त्याठिकाणी केंद्रे सुरु नाहीत. मागच्या वेळेला धान घेतले, परंतु सर्व कोठारे भरली होती. त्यामुळे पर्चेसिंग वेळेवर झाले नाही. यावेळी वेळेवर पाऊस आला नाही, यामुळे शेतकऱ्यांना धानाचे उत्पादन कमी मिळाले. त्यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांना सुध्दा काही प्रमाणात मदत दिली पाहिजे.सोयाबीन पिकविणाऱ्या शेतकऱ्यांबाबत सांगावयाचे तर आज तो शेतकरी कापसाच्या ऐवजी सोयाबीनचे पीक घेत आहे. अशी त्यांची फार विचित्र अवस्था झालेली आहे आणि सोयाबीनच्या बाबतीत सांगावयाचे तर काही क्षेत्रामध्ये एक क्विंटल सुध्दा सोयाबीन झाले नाही.सोयाबीनच्या उत्पादनाबाबत फार विचित्र अवस्था आहे. कारण जर सोयाबीनचे पीक काढण्याच्या वेळेस पाऊस आला तर मग सोयाबीनचे उत्पन्नच फारसे येत नाही. त्यामुळे मागच्या वेळेला सोयाबीनचा भाव 1900 रुपये इतका होता परंतु आता हे भाव 1800 रुपये किंवा 1600 रुपये किंवा 1700 रुपयापर्यंत कमी आलेले आहेत. अशा वेळी या शेतकऱ्यांना सुध्दा आधार देणे, त्यांना मदत करणे गरजेचे आहे. आपले पर्चेसिंग हे क्विंटल मागे नसल्यामुळे या शेतकऱ्याना देखील आपण हेक्टरी कशा प्रकारे मदत देऊ शकतो याचा विचार केला पाहिजे. मात्र ही मदत देत असताना ती कमी असू नये. याबाबत मी माननीय मंत्री महोदयां कडे विचारणा केली की,आपण एकंदर किती शेतकऱ्यांना हेक्टरी मदत दिली ? जर अशा प्रकारे मदत दिली असेल तर ती किती एकरापर्यंत दिली? परंतु याबाबत आता माननीय मंत्री महोदयांकडे माहिती नाही.

सभापती महोदय, 2 हेक्टरच्यावर जमीन असलेल्या किंवा 5 एकराच्यावर जमीन असलेल्या शेतकऱ्यांची संख्या 5 टक्केच आहे अशा प्रकारची माहिती मिळालेली आहे. परंतु या आकडेवारी बाबत शासनाला तपासणी करावी लागेल. कारण विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये अशी स्थिती आहे आणि पश्चिम महाराष्ट्रातील जो शेतकरी आहे, त्याच्याकडे दोन, अडीच, तीन किंवा चार आणि पाच एकर जमीन असलेला शेतकरी असून तो मोठा असतो आणि 5 एकराच्यावर जास्त कोणाची जमीन नसते. परंतु विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशमधील काही भागांमध्ये कापूस,सोयाबीन किंवा धान बेल्ट आहे, त्याठिकाणी मात्र जास्त जमीन मालक आहेत. याठिकाणी ज्याच्याकडे साधारणत:

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

10 एकर, 20 एकर किंवा 25 एकर जमीन आहे,त्याला मध्यम शेतकरी म्हणून समजण्यात येते आणि 25 ते 30 एकर जमीन असलेला मोठा शेतकरी समजला जातो.परंतु 5 एकराच्या आतील शेतकरी किंवा 7 एकराच्या आतील शेतकरी असेल,त्याला मदत दिली तर अशा वेळी आम्ही शेतकऱ्याला खूप मदत दिली असे म्हणता येणार नाही.कारण ते मजुरी सुध्दा करतात आणि शेती देखील करतात. कापसाची पाच एकराच्या आतील कोरडवाहू शेती असेल तर ती त्या शेतकऱ्याच्या दृष्टीने पुरेशी होत नाही.त्यामुळे त्याला आपल्या शेतावर देखील काही वेळ काम करावे लागते, पार्ट टाईम मजुरी देखील करावी लागते आणि आपली उपजीविका करावी लागते.त्यांना 2 बैल ठेवणे सुध्दा परवडत नाही. मग दोघे-चौघे शेतकरी मिळून दुसऱ्या गावातून बैल आणतात आणि वहिती करतात.

सभापती महोदय, जर आपल्याला त्यांना शेतकरी म्हणून मदत करावयाची असली तर तो मोठा लॅण्ड होल्डर असल्यामुळे त्याला हेक्टरी मदत करण्याविषयी ठरवित असताना, आपण पश्चिम महाराष्ट्र आणि इतर भागातील लॅण्ड होल्डींगचा विचार न करता विदर्भातील लॅण्ड होल्डींगचा विचार करुन त्यांना मदत देण्याच्या बाबतीत घोषणा सुध्दा केली पाहिजे.तसेच यामध्ये मदतीची रक्कम कमी नसावी. ही रक्कम किती असावी याबाबतीत मी तुमच्यावर प्रेशर टाकत नाही. पण माझे मदत देण्याच्या बाबतीत जे मत आहे, ते मी माननीय मुख्यमंत्र्याकडे स्पष्टपणे मांडलेले आहे आणि मला खात्री आहे की, राज्य शासन मी सुचविल्याप्रमाणे याबाबत सारासार विचार करुन तीनही पिकाच्यां बाबतीत शेतकऱ्यांना मदत दिल्याशिवाय रहाणार नाही आणि तशी मदत देण्यात यावी अशा प्रकारची मागणी करतो. तसेच जरी भविष्यामध्ये कापूस एकाधिकार योजना नसली तरी देखील दरवर्षी कापूस खरेदी करण्याकरता राज्य शासनाची एखादी व्यवस्था निर्माण करावी आणि तसे झाले तरच आपण खऱ्या अर्थाने कापूस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देऊ शकू अशा प्रकारची राज्य शासनाने भूमिका घ्यावी अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

. .. . .3 के-4

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कापसाला जास्त भाव मिळाला पाहिजे म्हणून सध्या विदर्भामध्ये दिंडी, पदयात्रा काढण्यात येत आहेत आणि विरोधी पक्षाकडून देखील आंदोलने करण्यात येत आहेत आणि महत्वाची बाब म्हणजे सध्या विदर्भामध्ये अधिवेशन सुरु आहे.

सभापती महोदय, विदर्भातील 11 जिल्ह्यांमध्ये कापसाचे पीक जास्त होते. तसेच खानदेश मधील एक-दोन जिल्हे, मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये देखील कापसाची पेरणी होते, उत्पादन होते.सोयाबीन व धानाच्या बाबतीत सांगावयचे तर विदर्भामध्ये धानाचे देखील उत्पादन जास्त होते. पण इरिगेशन नसल्यामुळे कास्तकारांसमोर अनेक प्रश्न निर्माण होत आहेत आणि त्यात भर म्हणून वीज टंचाईचा प्रश्न आहे. विदर्भामध्ये विजेचा जो वापर होत आहे, त्याबाबत सांगावयाचे तर आम्ही विदर्भामध्ये 6 हजार मे.वॅ.पेक्षा जास्त विजेचे उत्पादन करतो. शासनाने अनेकवेळा आश्वासन दिले की, 2012 मध्ये आम्ही येथील लोड शेडींग पूर्णपणे कमी करु.आता आपण 10-15 दिवसानंतर 2012 या वर्षामध्ये प्रवेश करु.पण आताही येथील ग्रामीण भागामध्ये शासन 8 तास लोड शेडींग करीत आहे, तेथे 8 तास वीज मिळत नाही. माझी शासनाला अशी विनंती आहे की, विदर्भामध्ये वीज तयार होते आणि येथे 6 हजार मे.वॅ.पेक्षा जास्त उत्पादन आहे, हे उत्पादन डबल आहे आणि विजेचा वापर 3 हजार मे.वॅ.इतका देखील नाही. नागपूर कराराप्रमाणे सध्या याठिकाणी अधिवेशन सुरु आहे. जेव्हा नागपूरमध्ये अधिवेशन होते, तेव्हा येथील लोकांना अनेक प्रकारचे त्रास सहन करावे लागतात.

सभापती महोदय, विधान सभेचे अधिवेशन नागपूरमध्ये होते आणि याठिकाणी मात्र पश्चिम महाराष्ट्र, मुंबई, मराठवाडा इ.भागातील जास्तीतजास्त प्रश्न उपस्थित केले जातात आणि नागपूर येथील अधिवेशनाच्या वेळी जास्तीतजास्त फायदा दुसऱ्या विभागाला होत असतो. विदर्भातील जनतेची कापसाच्या संदर्भात मागणी आहे.येथील कास्तकाराला कोणतेही पीक घ्यावयाचे असेल तर मग कापूस, सोयाबीन असो किंवा धान असो,या सदनातील अनेक सन्माननीय सदस्य कास्तकार आहेत आणि त्यांना माहिती आहे की, वीज आणि पाणी उपलब्ध झाले नाहीतर शेती होऊ शकत नाही. तसेच शेतीसाठी बी-बियाणे, खत आवश्यक असते. मात्र खताचे, विजेचे असलेले दर लक्षात घेता करण्यात येणारे उत्पादन मग ते कोणतेही पीक असो म्हणजे धान असो किंवा कापूस असो. आपण जर त्याची सरासरी काढली तर लक्षात येईल की, आपल्याला जो भाव मिळतो, त्यापेक्षा कास्तकाराला दुप्पट भूर्दंड सोसावा लागतो आणि कास्तकाराची सर्वात वाईट परिस्थिती आहे.

अशुद्धीत पत्र / शोधनेसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

श्री. जैनुद्दीन जव्हेरी.. .

सभापती महोदय, थोडया वेळापूर्वी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी असे सांगितले की, विजेचे उत्पादन झाले पाहिजे. त्यासाठी आंदोलन नको. त्यांचा इशारा कदाचित विदर्भाकडे असावा. कारण आज विदर्भात अनेक उद्योग येत आहेत. विजेचे 45 ते 46 प्लँट येणार आहेत, ते सर्व विदर्भातच कां येत आहेत. या प्लँटमध्ये वीज निर्माण झाल्या नंतर ती वीज विदर्भाला मिळेलच याची शाश्वती नाही. अनेक विचारवंत आणि हुशार लोक आहेत. जेव्हा काही घ्यावयाचे असेल तेव्हा पूर्ण राज्य एक आहे असे सांगितले जाते. मी या सभागृहात असा प्रश्न विचारला होता की, कर्नाटक राज्यामध्ये विजेचे उत्पादन होणार आहे, त्यासाठी चंद्रपूर जिल्हयातील माईन्स का देण्यात आली? आपल्याला कोळशाची गरज आहे. विदर्भात आणि महाराष्ट्रात देखील कोळसा नसल्यामुळे विदर्भातील कोळसा विदर्भात ठेवला पाहिजे. आणि महाराष्ट्रातील कोळसा महाराष्ट्रात ठेवला पाहिजे. ओरिसा राज्य कर्नाटक राज्याच्या शेजारी असल्यामुळे त्यांनी तेथून कोळसा नेला तर त्यांच्या कोळसा वाहतुकीच्या खर्चात बचत होईल. सभापती महोदय, मला याच सभागृहात असे उत्तर मिळाले होते की, "भारत एक आहे, आमचे विचार एक आहेत." जेव्हा घ्यायचे होते तेव्हा एक झाले आणि द्यायची वेळ आली तेव्हा वेगळे झाले. (अडथळा) सभापती महोदय, माझे सांगण्याचे तात्पर्य असे आहे की, लहान भावाच्या बाबतीत मोठया भावाचे कर्तव्य असते की, जेव्हा द्यायची वेळ येते तेव्हा मोठया मनाने लहान भावाला दिले पाहिजे. आता आपण ज्या ठिकाणी बसलो आहोत हे ठिकाणी 1960 मध्ये राजधानीचे ठिकाण होते. त्यावेळी या ठिकाणी सभागृहाचे कामकाज चालत होते. येथील मुख्यमंत्री होते. कारस्थान काहीही असो. आपण म्हणता 115 हुतात्मे झाले. माझ्या माहितीप्रमाणे नागपूरचा एकही हुतात्मा झाला नाही आणि आमचे राजधानीचे ठिकाण येथून तिकडे घेऊन जावे असे आम्ही कोणीही म्हटले नाही. नागपूर हे राजधानीचे ठिकाण होते आणि मध्यप्रांतातून काही भाग वेगळा करुन विदर्भ वेगळा झाला पाहिजे अशी आमची मागणी होती. तरी देखील मराठी माणूस एक झाला पाहिजे अशा मोठया मनाने इकडचे राजधानीचे ठिकाण आम्ही मुंबईला शिफ्ट केले आणि आमच्या राजधानीच्या ठिकाणाला कुलपे लावली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी.. .

सभापती महोदय, नागपूर कराराप्रमाणे आज या ठिकाणी अधिवेशन होत आहे आणि या अधिवेशनामध्ये विदर्भातील कापसाच्या महत्वाच्या प्रश्नासंबधी चर्चा होत आहे. कापसाला प्रती क्विंटल काय भाव देण्यात येणार आहे, तो देण्यात येणार आहे की नाही, हा भाग वेगळा आहे. शासनाच्या तिजोरित तेवढा पैसा आहे काय हे शासनाला पहावे लागेल. माझा सांगण्याचा उद्देश असा आहे की, शेतकरी, त्याचे उत्पन्न आणि त्याचा उद्योग याचा विचार केला पाहिजे. मी शेतकरी असून, माझा सुध्दा एक छोटासा उद्योग आहे. माझ्याकडे चांगली शेती होती पण आता मी शेती करणे बंद केले आहे. माझ्या मुलाने उद्योग सुरु केला आहे. जमीन घेण्यासाठी प्रोजेक्ट रिपोर्ट द्यावा लागतो. त्या रिपोर्टमध्ये जमीन, तेथील डेव्हलपमेंट्स, रोड्स्, इमारती, मशिनरी या सर्व गोष्टी असल्या पाहिजेत तरच तो प्रोजेक्ट तयार होतो. दोन कोटी रुपयाच्या प्रोजेक्टसाठी 50 लाख रुपयांची जमीन लागत असेल तरच त्याचा समावेश प्रोजेक्टमध्ये होतो. एखादा प्रोजेक्ट दोन कोटी रुपयांचा असला आणि त्यामध्ये 35 टक्के सबसिडी असेल तर आम्ही तो प्रोजेक्ट पाच कोटी रुपयांचा करतो. त्यासाठी फक्त एक सी.ए.चे सर्टिफिकेट असले पाहिजे. म्हणजे मुळात दोन कोटी रुपये लावले की पाच कोटी रुपयांचा प्रकल्प दाखविता येतो. त्यामध्ये पावणे दोन कोटी रुपये सबसिडी मिळते. त्यामुळे तो प्रोजेक्ट फुकटातच होतो. मात्र कास्तकारांना जमीन विकत घेण्यासाठी लोन मिळत नाही. स्वत:ची वडिलोपार्जित जमीन असली तरी नांगर विकत घेण्यासाठी देखील लोन मिळत नाही, लोन मिळाले तरी बँकेचे अधिकारी दादागिरी करतात.

सभापती महोदय, विदर्भातील शेतकरी आत्महत्या का करतात? अशा प्रकारचा प्रश्न निर्माण होतो. कोणालाही आत्महत्या करण्याची आवश्यकता वाटत नाही. विदर्भातील कास्तकार आत्महत्या करतो या मागचे कारण काहीही असले तरी मुख्य कारण असे आहे की, दहा ते वीस एकर शेती असली तरी ती शेती करण्यासाठी पाणी मिळत नाही. त्यामुळे शेतकरी कसा तरी इकडून-तिकडून शेती करतो. ईश्वराच्या भरवशावर बी-बियाणे घेतो, खत घेतो, कर्ज घेतो. बँकेने कर्ज दिले नाही तर खाजगी सावकाराकडून कर्ज घेतो. नातलगाकडून उसने पैसे घेतो आणि शेती करतो. पण शेतीतून उत्पन्न मिळत नाही. मुलीचे लग्न असते. घरातील इतर कामे असतात. सभापती महोदय, आता बँकेने वसुलीची एक नवीन पध्दत सुरु केलेली आहे. जसे खाजगी सावकार असतात तसे बँकेने देखील वसुलीसाठी सावकार ठेवले आहेत, त्याला ते वसुली एजंट असे म्हणतात. हे वसुली

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी.. .

एजंट रोज शेतकऱ्याच्या घरी वसुलीसाठी जातात आणि वसुली मिळाली नाही तर तुझा बैल घेऊन जाऊ ट्रॅक्टर घेऊन जाऊ अशी धमकी देतात. रोज सकाळ-संध्याकाळ बॅकेंचे एजंट वसुलीसाठी तगादा लावतात. मग तो शेतकरी या संबंधात आपल्या मित्रांशी बोलतो. इकडे-तिकडे विचारपूस करतो. त्याला शेतीतून उत्पन्न मिळत नाही, त्यामुळे जेवण मिळत नाही. मुलाला नोकरी मिळत नाही. अशा परिस्थितीत त्याच्या मनात एकच विचार येतो की, मी मेलो तर वसुली एजंट तगादा लावणार नाही म्हणून तो आत्महत्या करतो. पण शेतकऱ्याने आत्महत्या केल्या नंतरही बँकेचे एजंट वसुलीसाठी तगादा लावण्याचे थांबवत नाहीत. पण त्या शेतकऱ्याला वाटते की, आपला मृत्यू होणार आहे, हे तर निश्चितच आहे. आज नाही तर उद्या, माझ्या वयाच्या 51 व्या वर्षी, 65 व्या वर्षी किंवा 70 व्या वर्षी तरी माझा मृत्यू नक्कीच होणार आहे. तेव्हा मी दहा वर्षे अगोदरच मेलो तर माझ्या पत्नीवर आणि मुलांवर जो ताण येत आहे तो येणार नाही. मुलगा शाळेत जात नाही, पत्नी काही काम करु शकत नाही. त्यामुळे घर चालविता येत नाही, म्हणून तो आत्महत्या करतो. आत्महत्या करण्यामध्ये त्याला खुशी वाटत नाही? विदर्भातील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना असे वाटते की, मी मेलो तर माझ्या घरी येऊन माझ्या पत्नी आणि मुलांसमोर वसुलीचा जो तगादा लावला जात आहे तो तगादा लावला जाणार नाही, म्हणून तो आत्महत्या करतो. ज्या प्रमाणे उद्योगाच्या बाबतीत कर्ज माफ केले जाते त्याप्रमाणे आत्महत्या केल्यानंतर त्या शेतकऱ्याचे कर्ज माफ केले जात नाही.

सभापती महोदय, या सभागृहात मी एक प्रश्न उपस्थित केला होता आणि 50 पत्र पाठवून त्याचा पाठपुरावाही केला होता. 50 रुपयात तयार होणारे सिमेंट 250 रुपये भावाने विकले जाते. 1 रुपया 10 पैशात एक मेगॅवॅट वीज तयार होते आणि ती 7 रुपये दराने विकली जाते. आता विजेचे उत्पादन सर्व खाजगी कंपन्यांकडे देण्यात आलेले आहे.शेती आणि उद्योगाची तुलना केली तर शेती करण्यामध्ये शेतकऱ्यांना फायदा मिळत नाही म्हणून सर्व कास्तकार पाच लाख ते दहा लाख रुपये एकर या दराने शेती विकत आहेत. शेती-शेती असे म्हटले जाते, पण विदर्भातील शेतकऱ्यांचा कबाडा होणार आहे. प्रती क्विंटल कापसाला दहा हजार रुपये भाव दिला तरी तो त्याला परवडणार नाही. आता केंद्र सरकार जमिनीच्या बाबतीत एक नवीन कायदा आणीत आहे.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी.. .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कास्तकारांची जमीन घेतली तर त्याला फायदा द्यावा लागणार आहे. अर्थात उद्योगपती हा कायदा आणू देतील काय, हे माहीत नाही. पण काँग्रेस सरकारने हा कायदा केला तर कमीत कमी कास्तकार उद्योगामध्ये पार्टनर होईल आणि 50 रुपयात तयार होणारे सिमेंट 250 रुपये भावाने विकले जात असेल तर या कास्तकाराला वर्षातून दहा ते वीस हजार रुपये तरी मिळतील. कापसाच्या, सोयाबीनच्या आणि धानाच्या भावा संबंधीची मागणी करणे येथपर्यंत ठीक आहे. या संबंधीचे भाव वाढवून दिले तरी काही फरक पडणार नाही. शेतीला उद्योगाचा दर्जा मिळाला पाहिजे, कास्तकाराच्या मुलांना जमीन घेण्यासाठी, ट्रॅक्टर घेण्यासाठी किंवा एखाद्या कास्तकाराचा मुलगा इयत्ता दहावी, इयत्ता बारावी झाला असेल आणि त्यांने एखादा प्रोजेक्ट तयार केला तर त्याच्या प्रोजेक्टला लोन मिळाले पाहिजे. त्या प्रोजेक्टसाठी लागणाऱ्या अन्य कोणत्याही सवलती शासनाने दिल्या पाहिजेत मग इन्शुरन्स असेल किंवा नुकसान झालेले असेल तर शासनाने ते भरुन काढले पाहिजे. उद्योग बंद पडतात. नागपूरमध्ये एम्प्रेस मिल होती, ती बंद झाली. या मिलमधील कामगारांना आजपर्यंत त्यांची देणी मिळालेली नाही. पण या मिलची जमीन मात्र करोडो रुपये भावाने विकली जात आहे. मुंबईमध्येही अशीच परिस्थिती आहे. उद्योग आणि कास्तकार यांच्यामध्ये फरक आहे. उद्योगासाठी वेगवेगळया सवलती देण्यात येतात, कर्ज माफ करण्यात येते. पण कास्तकाराला एपीएमसीला एक रुपया, दोन रुपये टॅक्स इमानदारीने भरावा लागातो. तेव्हा उद्योगाच्या धर्तीवर कास्तकाराला सवलत देण्याची आवश्यकता आहे. कास्तकाराच्या मुलाने एखादा प्रोजेक्ट तयार करुन दिला तर त्या प्रोजेक्टसाठी शासनाने संपूर्ण सवलती दिल्या पाहिजेत तरच हे शासन विदर्भातील आणि महाराष्ट्रातील कास्तकाराला न्याय देऊ शकेल.

सभापती महोदय, आज विदर्भातील सिंचनाची काय परिस्थिती आहे?. विदर्भ महाराष्ट्रात सामील झाला,या गोष्टीला आज 50 वर्षे झालेली आहेत..

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धारित प्रत / शोधनेसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी .....

विदर्भातील सिंचनाचा एकही प्रकल्प पूर्ण झालेला नाही. वर्धा प्रकल्प असेल, चंद्रपूरचा अमलनाला प्रकल्प असेल किंवा गोसीखूर्द प्रकल्प असेल, एकही प्रकल्प शंभर टक्के पूर्ण झालेला नाही. गेल्या 50 वर्षात एकही प्रकल्प पूर्ण झालेला नाही. धरण झाले तर कालवे झाले नाहीत. कालवे झाले तर रस्ते नाहीत. पाणी सोडण्याचे दरवाजे नाहीत. जी काही धरणे झाली ती शासनाने हळूच उद्योगांना देऊन टाकली. आमच्या कोरपना, गडचांदूर तालुक्यामध्ये एक मोठे धरण झाले. सर्व शेतकरी खूश झाले. एक उद्योग आला, त्याला आम्ही पाणी दिले. दुसरा उद्योग आला, त्याला पाणी दिले. मग तिसरा उद्योग आला, त्याला पाणी दिले. चौथा उद्योग आला, त्याला पाणी दिले. पाचवा उद्योग आला, त्याला पाणी दिले. अशा प्रकारे त्या धरणातील पाणी संपून गेले. त्या अमलनाला धरणामध्ये पाणी नाही. त्यामुळ पाईपलाईन होऊ नये, अंबुजा कारखान्याला पाणी देऊ नये, अमुक उद्योगाला पाणी देऊ नये यासाठी शेतकऱ्यांची आंदोलने झाली. नंतर त्या धरणाची उंची वाढविण्याची एक योजना निघाली. त्यासाठी शासन 400 ते 500 कोटी रुपये खर्च करणार आहे. आपण उद्योगाला पाणी देणार. पैसे मात्र सरकारच्या तिजोरीतून देणार. त्या धरणाची उंची सुध्दा वाढलेली नाही आणि अजूनही शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही. उद्योगांना 100 टक्के पाणी मिळत आहे. कोणता कायदा आहे, कोणते नियम आहेत, कोणते अधिकारी आहेत, हे आपण सांगणे बरोबर नाही. आपल्याकडे एक प्रथा आहे. मोठ्या लोकांची कामे घरी बसून होतात पण गरीब माणूस जिल्हाधिकारी कार्यालयात, तहसीलदार कार्यालयात कितीही वेळा गेला किंवा कोणाकडेही गेला तरी त्याचा अर्ज पुढेच जात नाही. मोठ्या माणसाच्या अर्जावर मात्र शिक्का वगैरे मारुन त्यांची ऑर्डर घरी येते.

सभापती महोदय, आज या ठिकाणी कापसाच्या संदर्भात चर्चा होत आहे. माझी शासनाला एकच विनंती आहे. विदर्भातील शेतकरी आज आत्महत्या करीत आहेत. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त सवलत मिळाली पाहिजे, त्यांच्या मालाला भाव मिळाला पाहिजे या दृष्टीने शासनाचे प्रयत्न चालू आहेत. जोपर्यंत विदर्भातील शेतकऱ्यांना सिचंनाची सोय तसेच वीज मिळत नाही तोपर्यंत सोयाबीन, कापूस किंवा धान पिकाच्या संदर्भातील प्रश्न सुटू शकणार नाही. विदर्भात जंगल आहे, पाणी आहे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी ....

खनिज आहे. आमच्याकडे 50 टक्केच्यावर जंगल आहे. आपण महाराष्ट्राची विभागणी ग्रामीण आणि शहरी अशा दोन भागात करतो. महाराष्ट्रात शहरी भागाचे प्रमाण 30 ते 35 टक्के आहे आणि ग्रामीण भागाचे प्रमाण 60 ते 65 टक्के आहे. पण यामध्ये जंगलाचे प्रमाण राहून जाते. आमच्या विदर्भामध्ये शहरी, ग्रामीण आणि तिसरे जंगल अशी विभागणी आहे. पण आपण जंगलाला गृहीत धरत नाही. विदर्भात शहरी भागाचे प्रमाण 30 टक्के आहे, जंगलाचे प्रमाण 30 ते 40 टक्के आहे आणि 25 ते 30 टक्के ग्रामीण भागाचे प्रमाण आहे. त्यामध्ये शेतीची जमीन आहे. त्यासाठी शासनाने कायमस्वरुपी सिंचनाची व्यवस्था केली पाहिजे. आपण शेतकऱ्यांना आता काही देणार पण काही सन्माननीय सदस्यांना अशी भीती वाटते की, बजेटमधून त्याची कपात होईल. पण हे पैसे विदर्भातील सिंचन, विदर्भातील रस्ते विकास किंवा विदर्भातील विकासाचे जे प्रश्न आहेत त्यात कपात करुन तेच पैसे इकडे वळते होणार की काय अशी सदस्यांना भीती वाटते. त्याबाबत सुध्दा शासनाने खात्री दिली पाहिजे. शासनाने कापसाला जास्तीत जास्त मदत दिली पाहिजे. नागपूरला हे अधिवेशन होत आहे. या अधिवेशनामध्ये विदर्भातील प्रश्न मार्गी लावावेत अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आज या ठिकाणी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अतिशय महत्वपूर्ण चर्चा होत आहे. शेतकऱ्यांच्या कापसाला जास्तीत जास्त भाव मिळाला पाहिजे यासाठी या ठिकाणी चर्चा होत आहे. अनेक दिवसांपासून अनेक राजकीय पक्ष, विविध संघटना आणि इतर लोकांच्या मनामध्ये शेतकऱ्यांच्या कापसाला जास्तीत जास्त भाव मिळाला पाहिजे अशी जी भावना आहे त्यासाठी विदर्भामध्ये अतिशय तीव्रतेने फार मोठा संघर्ष होत आहे. तो संघर्ष होत असताना शेतकऱ्यांच्या मनामध्ये शासनाने आमची थट्टा चालविलेली आहे की काय अशा प्रकारचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सर्वांना माहीत आहे की, विदर्भामध्ये कापूस, सोयाबीन, धान, ज्वारी ही प्रमुख पिके आहेत. त्यामध्ये कापूस हे नगदी पीक आहे. सर्वांना माहीत आहे की, कापूस विकल्यानंतर जे पैसे मिळतात त्यातून शेतकरी आपला वर्षभराचा खर्च करीत असतो. आपल्या मुलाचे शिक्षण, औषधोपचार, मुला-मुलींचे लग्न आणि इतर जो काही खर्च असेल तो त्या पैशातून भागवित असतो. बाकीचे जे धान्य आहे ते शेतीसाठी आणि स्वत:साठी वापरतो. परंतु आज या विदर्भातील शेतकऱ्यांची अतिशय वाईट परिस्थिती झालेली आहे. शेतकऱ्यांचे हे पीक निसर्गावर अवलंबून आहे. चांगला पाऊस झाला तर पीक चांगले येते. पाऊस कमी झाला तर पीक कमी येते. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते. त्याचबरोबर वाढलेली महागाई तसेच शेतमालाचे घसरलेले भाव यामुळे त्यांची फार आर्थिक हानी होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला हमीभाव मिळाला पाहिजे ही गोष्ट अतिशय महत्वाची आहे.

सर्व लोकांकडून, सर्व पक्षांकडून, सर्व संघटनांकडून वेगवेगळ्या प्रकारच्या मागण्या होतात. कोणी 5 हजार रुपये भाव देण्याची मागणी करतात, कोणी 6 हजार रुपये भाव देण्याची मागणी करतात तर कोणी 7 हजार रुपये भाव देण्याची मागणी करतात. शासनाकडे खूप मोठी यंत्रणा आहे. शासनाकडे अभ्यास करणारा खूप मोठा वर्ग आहे. शासनाकडे तज्ज्ञ लोक आहेत. शेतकऱ्यांना कापूस पिकविण्यासाठी एकरी किती खर्च येतो आणि त्या उत्पादन खर्चावर शेतकऱ्याला किती भाव मिळाला पाहिजे हे पाहणे महत्वाचे आहे. कारण आम्ही शेतकरी इतके निर्बुध्द आहोत की, आमच्या शेतमालाचा भाव दुसरे लोक ठरवितात. आमचा माल बाजारात गेला तर दुसरे व्यापारी त्याचा भाव ठरवितात. आम्हाला भावाची कोणतीही हमी नाही पण एखादा चॉकलेट तयार करण्याचा कारखाना असेल तर तो कारखानदार 6 रुपये, 10 रुपये या प्रमाणे आपल्या चॉकलेटची किंमत ठरवितो. पण शेतकऱ्याला त्याच्या शेतीमालाचे भाव ठरविण्याची आजही मुभा नाही. म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. वसंतराव खोटरे ....

हा शेतकरी नागवला जात आहे. दिवसेंदिवस शेतकऱ्यांची दयनीय अवस्था होत ओ. म्हणून शासनाने या शेतकऱ्यांसाठी कठोर उपाय केले पाहिजेत.

सभापती महोदय, आज आपण शेतकऱ्यांना हमीभाव कसा देणार ? शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भाव कसा वाढवून देणार ? मागच्या वर्षी जेव्हा व्यापारी खरेदी सुरु होती तेव्हा कापसाला जवळपास 6 हजार 800 रुपये क्विंटल प्रमाणे काही शेतकऱ्यांना भाव मिळाला. पण मागच्या वर्षी आपले अधिवेशन संपल्यानंतर आम्ही जेव्हा गावाकडे गेलो तेव्हा भाव गडगडले. त्यावेळी अनेक शेतकऱ्यांना प्रती क्विंटल 2500 ते 3200 रुपये या भावाने कापूस विकावा लागला. एवढे माठे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांचा गेल्या वर्षीचा कापूस अजूनही घरात आहे.आपण माझ्या बरोबर आमच्या भागात जाऊन बघावे. अजूनही शेतकऱ्यांच्या घरामध्ये मागच्या वर्षीचा कापूस आहे. त्यांना अजूनही आपल्या कापसाला 5 हजार रुपये, 6 हजार रुपये भाव मिळेल अशी आशा वाटते. 7 हजार भाव मिळणार नाही कारण निर्यात बंदी उठविली की नाही हे माहीत नाही. जागतिक पातळीवर काय घडते हे आम्हाला माहीत नाही. म्हणून शासनाने अतिशय चांगली भूमिका घेतली पाहिजे. शासनाजवळ अतिशय चांगली यंत्रणा आहे. शेतकऱ्यांचा कापूस घेण्यासाठी शासनाकडे यंत्रणा आहे. शासनाने शेतकऱ्यांचा कापूस हमी भावाने विकत घेतला पाहिजे. त्याला किती हमीभाव द्यावयाचा हे शासनाने आधी ठरविले पाहिजे. तरच शेतकऱ्याला न्याय मिळेल. आम्ही वर्तमानपत्रात वाचतो की, शासन शेतकऱ्यांना एकरी काही तरी अनुदान देणार आहे. मी निश्चित सांगतो की, शासन शेतकऱ्यांना प्रत्येक क्विंटलप्रमाणे भाव देणार नाही हे आम्हालाही कळते आणि शेतकऱ्यांनाही कळते. कारण शासन कापूस खरेदी करणारच नाही. मग शासन प्रत्येक क्विंटलला भाव कसा देणार, हा महत्वाचा प्रश्न आहे. आपण शेतकऱ्याला नागवू नका, लुबाडू नका, फसवू नका. शेतकऱ्याला कसा भाव देणार हे शासनाने सांगावे. शासन ते सांगत नाही. कोणी सांगत नाही, कोणी बोलत नाही. भाव कसा मिळणार हे आम्हालाही समजत नाही.

मी स्वत: शेतकरी आहे. माझ्याकडे सुध्दा शेती आहे. आमचे बापजादे जमीन कसतात. सुरुवातीपासून आमच्याकडे जमीन आहे. पण शासन भाव कसा देणार ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे.....

शेतकऱ्यांना 3 हजार रुपये हमी भाव दिला जात होता. त्यामध्ये 2 हजार रुपयांची वाढ केली तर त्यांना 5 हजार रुपये मिळू शकतील. परंतु शासन तेवढा भाव देणार नाही. म्हणून आमचे असे म्हणणे आहे की, शासनाने शेतकऱ्यांच्या कापसाची 7 हजार रुपये भावाने खरेदी करावी. इतका भाव शासन देणार नाही हे देखील आम्हाला माहीत आहे. शेतकऱ्यांकडे 7-12 आहेत. या सर्व शेतकऱ्यांनी आपला कापूस खरेदी केंद्रावर आणल्यावर त्यांना योग्य किंमत द्यावी. हा एक प्रमुख उपाय आहे. 7 हजार हमी भावामध्ये शासन कापसाची खरेदी करणार नाही. शेतकऱ्यांना शासन कधीच लाभ देणार नाही. त्यासाठी माझ्याकडे दुसरा एक उपाय आहे. ज्या शेतकऱ्यांनी कापूस पिकविला आहे त्या सर्व शेतकऱ्यांना शासन लाभ देणार नाही. पण 20 एकर जमिनीवर कापसाची लागवड केली असेल तर प्रति एकर 5 हजार रुपयांचे अनुदान दिले तर तो उपाय देखील उत्तम होईल. त्याप्रमाणे शासनाने अनुदान द्यावे अशी शासनाला माझी विनंती आहे.

सोयाबीन हे चांगले पीक असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीनची पेरणी केली. एक एकरातून 8-10 क्विंटल इतके उत्पादन मिळते. पण पाऊस कमी पडला तर तेच उत्पादन 3-4 क्विंटलपर्यंत मिळते. धानाचे सुध्दा तसेच आहे, ज्वारीचे सुध्दा तसेच आहे. शेतकरी वर्षातून एकदाच पेरणी करतात. 12 महिने या पिकांच्या पैशावर आपली उपजीविका करावी लागते. आपल्या मुलांचे शिक्षण पूर्ण करावे लागते, औषधोपचारावर खर्च करावा लागतो. आपल्या मुलांचे लग्न करावे लागते. या तुटपुंज्या आर्थिक प्राप्तीमध्ये हा सर्व खर्च कसा भागवित असेल ते शासनाने आम्हाला सांगावे. शासनाने शेतकऱ्यांची फसवणूक करु नये, शेतकऱ्यांना न्याय द्यावा. हे शासन शेतकऱ्यांना निश्चितपणे जास्तीत जास्त फायदा देईल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मांडलेल्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मी एक शिक्षक आहे हे प्रथम सांगतो. मी विद्यार्थी असताना शिकत होतो तेव्हापासून ऐकले आहे, बोलत आलो आहे, लिहित आलो आहे. भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे. या देशातील 70 टक्के जनता कृषीवर आधारित आहे. जर खेड्यांचा विकास झाला, शेतीचा विकास झाला तरच देशाचा विकास होईल. या देशातील मानव संस्कृती जीवंत राहील हे आम्ही ऐकतो, बोलतो व लिहितो. परंतु व्यवहारात तसे वागत नाही हे दुर्भाग्य आहे याबद्दल मला दु:ख होते. या सभागृहात कापूस व धानाच्या प्रश्नावर कालपासून चर्चा सुरु आहे. शेती मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे. या चर्चेचा गंर्भीतार्थ असा आहे की, आज शेती मालाला योग्य भाव दिला जात नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून 64 वर्षे झाली आहेत. इंग्रजांच्या काळानंतर आपण आपल्या समाज सुधारकांचे नाव घेऊन जीवन जगतो. महात्मा ज्योतिबा फुले ओरडून सांगत होते. शेतकऱ्यांचे दु:ख ओळखा. शेतक-यांचा आसूड हे पुस्तक वाचल्यानंतर असे वाटते की, त्या पुस्तकात लिहिलेल्या वेदना जीवंत ठेवण्याचे महापाप आम्ही केले. हे किती दिवस करणार, ते दूर करणार की नाही ? शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर आयएएस अधिकारी सांगणार की, शेतकऱ्यांनी दारु पिऊन आत्महत्या केली, रोगग्रस्त झाल्यामुळे आत्महत्या केली. आमच्या धोरणामुळे आत्महत्या झालेल्या नाहीत.

आपले शिक्षण सुध्दा कुचकामी आहे, हे आमच्या आयएएस अधिकाऱ्यांच्या निष्कर्षावरुन सिंध्द होत आहे. म्हणून माझी स्पष्ट भूमिका आहे. स्वतंत्र भारतामध्ये आम्ही दोन घटकांवर जाणीवपूर्वक अन्याय केला आहे. एक घटक म्हणजे शिक्षण व दुसरा घटक म्हणजे शेती. या दोन्ही घटकांवर शासनाने दुर्लक्षच केले. आम्ही त्याच्यावर भरपूर बोललो आणि आजही बोलतो. परंतु बोलतो तसे वागत नाही. शेतीशी माझा संबंध आहे. मी शेतकऱ्याच्या घरात जन्माला आलो आहे त्यामुळे मला शेती कशी करावी हे मला समजते असे सांगितले जाते. पण पदावर गेल्यावर तो शेतकऱ्याला विसरतो. खेड्यातील दु:खाला विसरतो. तो मुंबईचे ऐष आरामी जीवन जगत असतो. तो खरे कारण शोधू शकत नाही. शासनाकडून 70 टक्के जनता शेतीवर जगते असे सांगितले जाते. खेडयाचा विकास, शेतीचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो पुंडलिक गाणार....

असे आपण म्हणतो. पण बजेट तयार करीत असताना शासन हे का विसरते, ही भावना बाजूला का ठेवली जाते, शेतीला दुय्यम स्थान का दिले जाते याचा आपण विचार केलाच पाहिजे. शेती व उद्योग यामध्ये भेदभाव का केला जातो ? उद्योगपती व शेतकरी यांच्यामध्ये शासन उद्योगपतींकडे का झुकते व शेतकऱ्यांकडे जाणीवपूर्वक का दुर्लक्ष करते याचे केवळ चिंतन करुन चालणार नाही तर आपल्या कृतीमध्ये व व्यवहारामध्ये बदल करावाच लागेल. शेतकऱ्यांच्या बाजूचे आहोत हे दाखविण्यासाठी बोलणार असू तर हे शेतकरी एक दिवस शासनाला सोडणार नाही. त्यांनी शासनाला मोकळे सोडू नये.

शेतकरी शेती मालाचे उत्पादन करतो. या उत्पादनाची गरज समाजासाठी, राज्यासाठी, देशासाठी, मानव जातीसाठी आहे की नाही हेही आपण ठरविले पाहिजे. शेतकऱ्याला शेती खर्चावर आधारित शेती मालाचे भाव ठरविण्याचा अधिकार का दिला जात नाही ?

त्याला हा अधिकार दिला जात नसेल तर ते योग्य नाही. त्याच्या खर्चाच्या आधारावर भाव दिलाच पाहिजे, ही नैतिकता आपण पाळली पाहिजे. ही नैतिकता आपण पाळत नाही हे दु:खदायक आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, शेतीला उद्योगाचा दर्जा दिलाच पाहिजे. शेतक-यांच्या शेती मालाला खर्चावर आधारित भाव ठरविण्याचा अधिकार दिला पाहिजे. उद्योगपती व शेतकरी यांच्यामध्ये भेदभाव करण्याची वृत्ती, नीती, धोरण यामध्ये बदल केलाच पाहिजे. नाही तर एक दिवस शेतकरी आपली ताकद दाखविल्याशिवाय राहणार नाही. तो दिवस आता दूर नाही. आज शेतकरी मरत आहे, आत्महत्या करीत आहे. कारण आता त्याच्याजवळ दुसरे देण्यासारखे काहीच नसल्यामुळे जीव देत आहे. निसर्गाने त्याला जीवन दिले आहे ते अंतिम जीवन समर्पित करीत आहे. यापुढे हे बंद होऊन आपला जीव घेतल्याशिवाय राहणार नाही. म्हणून आपण सर्वांनी गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. म्हणून शासनाला माझी नम्रपणे व कळकळीची प्रार्थना आहे की, शेतकऱ्याला किती भाव द्यावा यावर चर्चा करण्याची गरज नाही.

आज व्यवहारात खर्चावर आधारित शेती मालाचे भाव ठरविले जात नाहीत. इतर उत्पादनाच्या खर्चाच्या 10 पट मूल्य सरसकट ठरविले जाते. बाजारात ते राबविले जाते, विकले जाते. मग शेतकऱ्यांच्या उत्पादनाचे मूल्य ठरविताना खर्चाच्या 10 पट मूल्य का घोषित केले जात नाही ? त्याकरिता 6-7 तास सर्व कामकाज बाजूला ठेवून चर्चा करण्याची काय गरज आहे या

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो पुंडलिक गाणार....

प्रश्नाचे उत्तर आपण शोधले पाहिजे. शासनाने तात्काळ शेती मालाच्या खर्चाच्या आधारावर भाव दिले पाहिजेत. त्याला जीवंत ठेवण्याचे कर्तव्य शासनाचे आहे. ही जबाबदारी शासनाने पार पाडली पाहिजे. शेतीला उद्योगाला दर्जा घोषित करुन त्यांना शेतीचे सर्व लाभ दिले पाहिजेत ते आमचे कर्तव्य आहे. हे आम्ही ज्या दिवशी कृतीने दाखवून देऊ त्या दिवशी या सदनाचे सभासद आहोत असे म्हणण्याचा आम्हाला नैतिक अधिकार राहील एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री.गिते.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या सभागृहात माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी अतिशय ज्वलंत विषयावर नियम 97 अन्वये प्रस्ताव मांडला आहे. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी अतिशय अभ्यासपूर्ण विचार मांडलेले आहेत. या प्रस्तावावर मी माझे विचार अतिशय थोडक्यात मांडणार आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या शेतीमालास योग्य भाव मिळाला पाहिजे म्हणून शेतकरी दरवर्षी आंदोलन करतात. या आंदोलनाच्या माध्यमातून शेतकरी आक्रमक होतात. त्यानंतर सदरहू विषयाची विधिमंडळात चर्चा होत असते. त्यानंतर शासनाकडून उपाययोजनेची घोषणा होत असते. सर्व कृषी मालासाठी कायम स्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. सर्व कृषी मालावरील निर्यात बंदी कायम स्वरुपी उठविली पाहिजे. हंगाम सुरु होण्या अगोदर किंवा पेरणी अगोदर कृषी मालासंदर्भात आधारभूत किंमती जाहीर केल्या पाहिजेत. यासंदर्भात संशोधन होणे गरजेचे आहे. आज मला अशी माहिती मिळाली आहे की, चीन देशात कृषी मालाचे हेक्टरी उत्पादन भारतापेक्षा तिप्पट आहे. त्यामुळे तेथे सहाजिकच उत्पादन खर्च कमी होतो. आपण कृषी विद्यापीठांवर करोडो रुपये खर्च करीत आहोत. या कृषी विद्यापीठांना संशोधन करण्यासाठी स्पेसिफीक टार्गेट दिले पाहिजे. कमी पावसात जास्त पीक येईल अशा प्रकारचे वाण एक दोन वर्षात विकसित करा अशा प्रकारचे टार्गेट या विद्यापीठांना दिले पाहिजे.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा पत पुरवठयाच्या बाबतीतील आहे. आज विदर्भातील काही जिल्हा सहकारी बँका वगळता अनेक जिल्हा सहकारी बँका बंद झाल्या आहेत. त्या जिल्हा सहकारी बँका शेतकऱ्यांना पतपुरवठा करु शकत नसल्यामुळे थेट शेतकरी सोसायटयांना पतपुरवठा केला पाहिजे. मराठवाडयात पतमर्यादा कमी आहे. 72 कोटी रुपयांचे कर्ज माफ झाले आहे. याचा जास्तीत जास्त फायदा, जास्तीत जास्त पतमर्यादा मंजूर असणाऱ्या शेतकऱ्यांना झाला. सहाजिकच विदर्भ आणि मराठवाडयातील कमी कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांना त्या गोष्टीचा फरक जाणवला आहे. माझी मागणी अशी आहे की, राज्यात शेती व्यवसाय करण्यासाठी लागणारे भाग भांडवल सारखेच असते. बागायती आणि जिरायती जमिनींना पतपुरवठा सारख्या प्रमाणात झाला पाहिजे. सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे, सन्माननीय सदस्य श्री. गाणार, सन्माननीय

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण...

सदस्य श्री.जव्हेरी यांनी मघाशी सांगितले की, शेतीला उद्योगाचा दर्जा दिला पाहिजे. शेतीला अजूनही उद्योगाचा दर्जा का दिला जात नाही ही बाब आम्हाला अजूनही समजून येत नाही.

महोदय,मोठया उद्योगांना त्यांच्याकडे असलेल्या ॲसेटच्या आधारे पतपुरवठा होतो. ते 100 कोटी रुपयांचा प्रोजेक्ट रिपोर्ट बनवितात. त्यांना 75 कोटी पर्यंत कर्ज मंजूर होते. बिल्डर असो वा अन्य उद्योजक असो, त्यांना मोठया प्रमाणात कर्ज मंजूर करण्यात येते. परंतु शेतीला अशी कोणतीच व्यवस्था नाही. शेतकऱ्यांच्या शेतीचे मूल्य आतापर्यंत काढले गेलेले नाही. शेतीला उद्योगाचा दर्जा दिला तर शेती मुल्यावर आधारित कर्ज पुरवठा शेतकऱ्याला होऊ शकतो. काल सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणात सांगितले की, माननीय श्री.आर.आर.आबांना 6 लाख रुपयांचे कर्ज माफ झाले. याबाबतीत वास्तविकता काय आहे याची मला माहिती नाही. परंतु मराठवाडयात आम्हाला कर्जमाफीचे असे आकडे बघावयास मिळाले नाहीत. माननीय श्री. अजितदादा त्या खात्याचे मंत्री आहेत. मराठवाडयात 15 हजार, 20 हजार, 25 हजार असे कर्जमाफीचे आकडे आम्हाला पहावयास मिळाले. त्याचे कारण असे की, जिल्हा बँकांनी तेथील शेतकऱ्यांना पतपुरवठा केला नाही. त्याचे दृष्टचक्र असे राहिले की, महाराष्ट्रात शेतीसाठी सगळीकडे भांडवल सारख्या प्रमाणात लागत असेल तर येथे पतपुरवठा कमी असल्यामुळे तेथील शेतकरी खाजगी सावकारांकडून कर्ज घेतो. ते कर्ज शासनाने माफ केलेले दिसून येत नाही.

सभापती महोदय, वीज पुरवठा देखील बेभरवशाचा आहे. वीज पुरवठा पुरेशा प्रमाणात झाला पाहिजे. कमी तास वीज द्या, पण दर्जेदार असा वीज पुरवठा झाला पाहिजे अशी आमची या निमित्ताने मागणी आहे. काल सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब बोलले की, आज शिक्षणाची गरज किती आहे ही गोष्ट सगळयांना पटलेली आहे. सामान्य कुटुंबावर शिक्षणाचा भार वाढलेला आहे. त्यामुळे माझी मागणी अशी आहे की, शेतकऱ्याचा भार कमी करावयाचा असेल, शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण द्यावयाचे असेल, ज्याच्याकडे 7/12 असेल त्या शेतकऱ्याच्या मुलाला व्यावसायिक शिक्षण मोफत दिले गेले पाहिजे. काही शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण शुल्क घेतले जाते, त्याबाबतीत

3...

श्री.सतीश चव्हाण...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आमचा काही आक्षेप नाही. ज्या शेतकऱ्यांच्या घरी खाण्यास अन्न नाही, तो जीवन जगण्यासाठी कर्ज काढतो आहे, त्यांनी शिक्षणास तिसरे प्राधान्य दिलेले आहे.

सन्माननीय सदस्य श्री. गणोर साहेबांनी सांगितले ते खरे आहे. शिक्षण आणि शेती हे महत्वाचे विषय असल्यामुळे त्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात मोठया प्रमाणात तरतूद उपलब्ध करुन दिली पाहिजे. शासनाकडून शिक्षणावर बऱ्याच मोठया प्रमाणात खर्च होतो आहे. लाखो रुपये पगार असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मुलांना शिक्षणामध्ये सवलती देतो. परंतु शेतकऱ्याच्या मुलाला शिक्षणाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची शासनाकडून सवलत दिली जात नाही. माननीय श्री. रावते साहेबांनी सांगितले की, अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये 25 हजार, 50 हजार शुल्क आहे. तेवढे शिक्षण शुल्क शेतकऱ्याच्या मुलगा भरु शकत नाही. शेतीवरील भार कमी करतो आहे. शेती बरोबरच शिक्षण व आरोग्य यावरील खर्च कमी झाला तर शेतक-यांच्या कुटुंबीयांना त्याचा फायदा निश्चितपणे मिळू शकेल. यामुळे ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेतील. ज्या ज्या शेतकऱ्यांकडे 7/12 उतारा असेल, त्याच्या मुलांस व्यावसायिक शिक्षण मोफत दिले गेले पाहिजे. या गोष्टीमुळे शासनाचा खर्च वाढत असेल तर कमित कमी जे अल्पभूधारक शेतकरी आहेत, तो कोणत्या घटकातील आहे, कोणत्या समाजातील आहे, याचा विचार न करता त्यांच्या मुलांना मोफत व्यावसायिक शिक्षण दिले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मोफत आरोग्य सेवेबाबत खूप बोलले गेले. शेतकऱ्याला खाण्यासाठी पैसे नाहीत तर तो औषधासाठी पैसे कोठून आणणार ? शेतक-यांनी आरोग्यास देखील शेवटचे प्राधान्य दिलेले आहे. आम्ही अनुभवले नाही, परंतु ऐकून आहेत की, आंध्र प्रदेशात दूरध्वनी केला तर 15 मिनिटांमध्ये रुग्णवाहिका घरी येते. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. आपल्या राज्याचे अनेक डेलिगेशन परदेशात पाठवित असतो. आंध्र प्रदेश तर महाराष्ट्राला लागूनच आहे. शेतकरी अथवा शेतकऱ्याच्या मुलगा चुकून सरकारी रुग्णालयात गेला तर तेथे उपचार करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी उपस्थित नसतात. नर्सेस उपस्थित नसतात. सदर कर्मचारी चुकून उपस्थित असले तर त्या रुग्णालयात औषधे उपलब्ध नसतात. मी काल आंध्र प्रदेशातील आरोग्य सेवेच्या बाबतीतील माहिती घेतली. रस्त्यावरुन जात असलेल्या आजारी नागरिकास अथवा आजारी असलेल्या शेतकऱ्यास शासकीय रुग्णालय लागले तर तो रुग्ण त्या रुग्णालयात जाऊन भरती होतो. त्याचा

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वर केलेल्या औषोधपचाराचे बील शासनाकडे पाठविले जाते. शासन ते बील पे करीत असते. तशी व्यवस्था या राज्यात सुरु केली पाहिजे अशी मागणी श्री. रावते साहेबांनी आपल्या भाषणात केलेली आहे. महाराष्ट्रासारखे पुरोगामी राज्य ही व्यवस्था राज्यात का आणू शकत नाही. आपण आरोग्य सेवेसाठी लाखो करोडो रुपये खर्च करतो आहोत. परंतु सरकारी रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसला तर त्या अधिकाऱ्याचा उपयोग काय ? शेतकऱ्यावरील शिक्षण आणि आरोग्य याचा भार कमी केला तर शेतकऱ्यांचे जीवन सुसहय होईल. या गोष्टीचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशीही माझी मागणी आहे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्य बोलले की, उत्पादन खर्चाची शास्त्रशुध्द किंमत काढली पाहिजे. कापूस वेचणीला पर क्विंटल 500 ते 600 रुपये खर्च येतो. या गोष्टीचा कोणी विचार करीत नाही आणि आपण आपल्या पुस्तकात कापूस वेचणीचा खर्च पर क्विंटल 50 ते 60 रुपये दाखवितो आणि त्यानुसार उत्पादनाचा खर्च काढतो. साखर कारखाने शेतकऱ्यांचा ऊस शेतावरुन कारखान्यापर्यंत घेऊन जातात. त्याप्रमाणे कापूस वेचून तो वाहून नेण्याची व्यवस्था शासनाने करावी आणि तो खर्च उत्पादन खर्चातून डिलीट करावा. आज माननीय श्री. शरदरावजी पवार यांनी मागणी केली आहे की, शेतीच्या कामासाठी जे मजूर लागतात ते मग्रारोहयो योजनेतून उपलब्ध करुन द्यावेत. मी त्यांच्या सूचनेचे स्वागत करतो. आज शेतीची कामे करण्यासाठी मजूर मिळत नाहीत. शेतीच्या कामासाठी मग्रारोहयो योजनेतून मजूर उपलब्ध करुन दिले तर शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल. माननीय श्री.पवारसाहेबांनी केलेल्या सूचनेचा देखील शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, शेतीच्या विकास कामासाठी रोजगार हमी योजना राबविली गेली पाहिजे. शेतीच्या विकास कामासाठी तसेच शेतीचे उत्पादन वाढीसाठी रोजगार हमी योजना का राबवू नये ? शेतकरी हा शेतात काम करीत असतो, त्याला मजूर म्हणून गृहीत धरण्यात यावे. वाटल्यास, त्या शेतकऱ्यांवर होणारा खर्च उत्पादन खर्चातून कमी करा. माननीय श्री. शरदरावजी पवार साहेबांनी जी मागणी केली, ती खरोखरच योग्य आहे. शेतकरी स्वत: शेतीचे काम करण्यास जातो, त्याला रोहयोवरील मजूर म्हणून का गृहीत धरले जात नाही. त्याला रोहयोवरील मजूर म्हणून गृहीत धरले तर त्यांचे जीवन काही प्रमाणात सुसहय होईल. मी पेपरमध्ये बातमी वाचली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कापसाला भाव वाढवून देण्यात यावा अशी सगळयांनी मागणी केलेली आहे, त्यासाठी किती करोडो रुपये खर्च येईल याची मला माहिती नाही. परंतु यासाठी शासनाला अर्थसंकल्पात तरतूद करावी लागेल. त्यासाठी इतर विभागातील तरतूद कमी करुन ती तरतूद इकडे दिली जाईल...

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.गिते 13:30

श्री.सतीश चव्हाण.....

विकास कामासाठी पुरेसा पैसा मिळत नाही. त्यामुळे रोजगार योजना हमी शेतावर राबविली पाहिजे. या विषयावरील सर्व मुद्यांचा विचार करता कापसाला प्रती क्विंटल 6000 रुपये भाव मिळाला पाहिजे अशी मी मागणी करतो आणि मंत्री महोदय उत्तराच्या भाषणामध्ये चर्चेच्या अनुषंगाने मांडलेल्या मुद्यांबाबत ठोस उत्तर देतील अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो.

.2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. दुपारी 2.00 वाजता सभागृहाची बैठक पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.31 ते 2.00 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरा नंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहात अत्यंत महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु आहे. त्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, अनेक वेळा अनेक वर्षे आपण पाहत आहोत की, पावसाळा संपला किंवा सुरु झाला असला तरी पिकाच्या बाबतीत नेहमीच ओरड सुरु असते. सभागृहात ओघानेच तो विषय चर्चेला येतो आणि त्यातून शेतकऱ्याला येणाऱ्या अडचणीतून मदत करणे हे क्रमप्राप्त आहे. अशी चर्चा होत असताना कुठे तरी आपण तात्पुरती उपाययोजना करीत आहोत की काय अशी शंका येते. काय हा विषय कायम स्वरुपी सोडवायला पाहिजे यासाठी आपण काय उपाययोजना करणर आहोत याचाही तेवढ्याच प्रखरतेचे विचार करणे गरजेचे आहे. पावसाचा लहरीपणा हा नव्याने निर्माण झालेल्या ग्लोबल वॉर्मिंगमुळे सुरु झालेला आहे याची आपणा सर्वांना जाणीव आहे. त्या लहरीपणाचा फटका यावर्षी जरी कापसाला लागला असला तरी कदाचित पुढील वर्षी ऊसाला तर कधी द्राक्ष किंवा कोकणातील आंब्याला बसू शकतो. अशा प्रकारे दरवर्षी शेतकऱ्याच्या अडचणीबाबत सभागृहात मागणी होत असते व त्यातून त्याला मदत केली पाहिजे. पण आपण जर ठरविले की, हा लहरीपणा अथवा वातावरणात होणारे नित्याचे बदल अथवा वेगवेगळ्या घटना घडतात या सर्व बाबींचा विचार करणे देखील अत्यंत गरजेचे आहे.

महोदय, मी अमेरिकेला न्यूयार्क विमानतळावर असताना अचानक पाऊस आला तेव्हा मी स्वत:च बोलत होतो की, "अरे बापरे पाऊस । " तेव्हा माझ्या बाजूला असलेला गृहस्थ बोलला की, "Don't worry, this is a passing shower" मी त्यांना म्हणालो कसे, त्यावर ती व्यक्ती मला म्हणाली की, आमच्याकडे 15-20 दिवस अगोदरच वातावरणाबाबतची अत्यंत तंतोतंत स्वरुपाची माहिती मिळत असते. मला असे वाटते की, आपण अनेक गोष्टींचे निदान करीत असतो पण पावसाच्या बाबतीत अत्यंत योग्य मार्गदर्शन शेतकऱ्याला होताना दिसत नाही.

महोदय, मागील वर्षी कापसाला 7 हजार रुपये प्रति क्विंटल एवढा भाव मिळाला, त्यामुळे कोणताही शेतकरी यावर्षी त्या उत्पादनाकडे वळणे ओघानेच आले. काही वेळा दुसऱ्या उत्पादनाला भाव मिळतो, जसे सोयाबीनला भाव मिळाल्यानंतर शेतकरी त्याच पिकाकडे वळले

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे .....

होते. पण आजची बाजारपेठ ही केवळ आपल्या देशापुरती मर्यादित राहिली नसून जागतिक स्वरुपाची झालेली आहे. पण त्या उलट भारतातील हवामान आणि परदेशातील हवामान व ऋतुंमध्ये होणारे बदल यात सुध्दा फरक आहे. त्यासाठीच जगाच्या पाठीवर कोणत्या प्रॉडक्टचे उत्पादन किती होते व त्यातून आपल्या प्रॉडक्टला काय भाव मिळणार आहे याचे अंदाज बांधणे शक्य असतात. त्यातून आपल्या देशाच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करता आपण कोणते उत्पादन घेतले पाहिजे यासंबंधीचे मार्गदर्शन शेतकऱ्याला करण्याची गरज आहे, तसे होताना दिसत नाही. आपल्या राज्यात शेतीवर संशोधन करणाऱ्या संस्था तसेच कृषी विद्यापीठे तसेच काही केंद्रे व विद्यालये आहेत. ते त्यांच्या परीने मार्गदर्शन करीत असतात पण अचूक पध्दतीचे मार्गदर्शन मात्र होत नाही व त्यातूनच नवनवीन समस्या निर्माण होतात.

आपल्या देशात तसेच राज्यात पारंपरिक पध्दतीने अनेक पिके सातत्याने शेतकरी घेत असतो. त्यामुळे एक-दोन किंवा तीन तीन वर्षे पीक घेतल्यानंतर त्या जमिनीचा पोत कमी होत असतो म्हणून काही वर्षाच्या अंतराने वेगळ्या पध्दतीचे पीक घ्यावे अथवा एखाद्या वर्षाचा गॅप ठेवावा, एक वर्ष शेत संपूर्ण मोकळे किंवा पडीक ठेवावे, पण त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होते. अशा सर्व गोष्टी शेतकऱ्याला व्यवस्थितपणे सांगण्याची गरज आहे व त्यातून त्याचे उत्पन्न कसे वाढेल त्याकडे लक्ष देणे हे शासनाने प्रामुख्याने काम आहे. माझे असे म्हणणे नाही की शेतकऱ्याला मदत करु नये, जरुर अडचणीच्या प्रसंगी मदत करावी व ते शासनाचे कर्तव्यच आहे. पण मदत करण्याची वेळ भविष्यात येणार नाही याची दक्षता घेणे सुध्दा तितकेच गरजेचे आहे. आपण अनेक गावात पाहतो की, शेतकऱ्याचे संपूर्ण कुटुंब आपल्या शेतात राबत असते. माननीय शरद पवार यांनी नुकतेच मत मांडले आहे की, शेतीचा व्यवसाय हा जास्त प्रमाणात निसर्गावर अवलंबून असल्याने बेभरवशाचा झालेला आहे. त्यामुळे घरातील एक व्यक्ती दुसऱ्या व्यवसायामध्ये असली पाहिजे, जेणेकरुन अडचणीची परिस्थिती आल्यानंतर त्याचे कुटुंब त्या संकटावर मात करण्यास सक्षम असेल. पण पवार साहेबांच्या बोलण्यावर काही लोक टीका करतात. पण मला वाटते की माननीय श्री. पवार साहेब यांनी जे सांगितले त्याचा फायदा शेतकऱ्यांना जास्त प्रमाणात होऊ शकेल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे .....

महोदय, आम्ही लहानपणी कोकणात जात होतो. साधारण मे महिन्यात शेतीची कामे सुरु होत होती. त्यावेळेस घरातील सर्व लोक दुसऱ्याच्या शेतावर जाताना दिसत होते. तसेच तेच लोक नंतर आपल्या शेतावर काम करीत होते. अशा प्रकारे एकमेकांना मदत केली जात होती. यातून एक प्रकारे सहकाराची भावना दिसून येते. तसे पाहिले तर सहकारी चळवळ कोकणात फारशी रुजली नाही पण अशा प्रकारे एकमेकांना मदत करण्याची भावना त्यातून दिसत होती. या अनुषंगाने मला अशी सूचना करावयाची आहे की, अशा प्रकारच्या सहकारी चळवळीला शेतीच्या बाबतीत चालना देण्याची गरज आहे. काही शेतकरी एकत्र आले तर त्यांना प्रोत्साहन देण्यासंबंधी धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला तर त्यातून एकमेकांच्या शेतात नांगरणी किंवा इतर शेतीची कामे करणे, त्याचबरोबर नरेगा योजनेमुळे शेतीसाठी मजूर मिळत नाहीत, शासनाने शेत मजुरांचे वेजेसचे दर वाढविलेले असल्याने मजूर मिळत नाहीत म्हणून अशा वेळेला सहकारी पध्दतीने शेती करण्यावर भर दिला तर त्याचा फायदा हाईल. ज्या पध्दतीने को-ऑप. स्पिनिंग मिल्स, शुगर मिल्स यासाठी शासनाने मदत करण्याचा निर्णय घेतला त्याच धर्तीवर सहकारी पध्दतीने शेती करण्यासाठी त्याचा फायदा होणार आहे व ती काळाची गरज आहे.

आपल्या राज्यात आपण शेतात अनेक पिके घेत असतो पण मार्केटचा अंदाज न घेतलेले जे पीक असते त्याचा दर काय असेल याची शाश्वती नसते. ज्याप्रमाणे क्रुड ऑईलच्या बाबतीत ॲनालिसीस करुन शासनाच्या लक्षात येते की भविष्यात क्रुड ऑईलचे दर कमी होणार आहेत तेव्हा शासन फॉरवर्ड ट्रेडिंगच्या माध्यमातून अशा ऑईची खरेदी करीत असते.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

त्या पर्चेसींगला फॉरवर्ड पर्चेसींग म्हटले जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजाराचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास केला गेला व त्यासंदर्भातील यंत्रणा संपूर्ण राज्यात उभारली व त्याची माहिती जनतेला दिली तर त्याचा चांगल्या प्रकारे फायदा होऊ शकेल. राज्य सरकार हजारो कोटी रुपये वेगवेगळया कारणासाठी खर्च करीत असते. त्यामुळे शेतीसाठी 24 तास चालणारे शासकीय चॅनल सुरु केले व त्यामध्ये वेगवेगळया तज्ज्ञांना बोलावून त्यांनी शेतीच्या संदर्भातील वेगवेगळी माहिती शेतक-यांना दिली तर त्याचा शेतक-यांना चांगला उपयोग होऊ शकेल. त्यामुळे शेतीसाठी शासकीय चॅनल काढण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सहकारी शेतीचा उल्लेख मी मघाशीच केलेला आहे. कोकणामध्ये आंब्यावर तुडतुडा रोग येतो. सधन शेतकरी आंबा पिकावर तातडीने फवारणी करतो. परंतु या फवारणीचा परिणाम असा होतो की, एका शेतात फवारणी केली तर हा तुडतुडा दुस-या शेतावर जातो. तेथेही फवारणी केली तर तुडतुडा तिस-या शेतामध्ये जातो. त्यामुळे यासंदर्भात मला असे म्हणावयाचे आहे की, थोडयाशा शेतीवर फवारणी न करता शासनाने विमानातून औषधांची फवारणी मोठया प्रमाणात केली तर कोकणातील शेतक-यांना मोठया प्रमाणात त्याचा फायदा होऊ शकेल. यासाठी जो काही खर्च येईल त्याचा दर काय लावावयाचा याची आकडेमोड शासनाला निश्चितपणे करता येईल. त्यामुळे मास फवारणीच्या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी पाऊले उचलली तर शेतक-यांना निश्चितपणे फायदा होऊ शकेल.

सभापती महोदय, ग्रामपंचायतीमध्ये ट्रॅक्टर्स किंवा शेतीला लागणारी आधुनिक यंत्रणा स्थानिक विकास निधीतून त्या त्या ग्रामपंचायतीला दिली व त्याची ऑपरेटींग कॉस्ट आणि स्लाईट मार्जीन ठेवले तर त्याचा फायदा शेतक-यांना आणि ग्रामपंचायतींनाही होऊ शकेल व विकासाला चालना मिळू शकेल. स्थानिक विकास निधीतून आपण अनेक कामे करीत असतो. परंतु अशा प्रकारे काम केले तर यातून प्रत्येक गावागावामध्ये यंत्रणा निर्माण होऊ शकली तर शेतक-यांना मोठया प्रमाणात फायदा होऊ शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

सभापती महोदय, गेल्यावर्षी कापसाला प्रती क्विंटल 7 हजार रुपये भाव मिळाला होता. परंतु या वर्षी कापसाला केवळ 3,300 रुपये भाव मिळत आहे. शेतक-याच्या मालाचा उत्पादन खर्चही निघणार नसेल तर शेतकरी जगणार कसा ? हा महत्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे लॉंग टर्म उपाययोजना शासनाने करणे गरजेचे आहे. लॉंग टर्म उपाययोजना करीत असतांना शासनाला शॉर्ट टर्म उपाययोजनाही कराव्या लागणार आहेत. कापसाच्या संदर्भात शेतक-यांना हेक्टरी मदत दिली गेली पाहिजे असे सर्वांचे मत आहे.

सभापती महोदय, कापसाचे भाव भरमसाठ वाढले तर सूत गिरण्यांना त्याचा फटका बसतो व सूत गिरण्यांचे प्रश्न निर्माण होतात. माझ्या माहिती प्रमाणे आपल्या कडील सूत गिरण्या केवळ 50 टक्के क्षमतेवरच सुरु आहेत. यामुळे रोजगाराचाही प्रश्न निर्माण होत असतो. कापूस हा काही नाशवंत पदार्थ नाही. कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया किंवा तत्सम ज्या संस्था आहेत त्यांनी कापूस ठेवण्यासाठी मोठमोठी गोडाऊन्स तयार केले व त्यामध्ये कापूस स्टॉक करुन ठेवला व ज्यावेळेस आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाचे भाव वाढले व त्या वेळेस स्टॉक केलेल्या कापसाची विक्री केली तर त्यातूनही मोठया प्रमाणात फायदा मिळू शकेल.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा येथे बसलेल्या काही सन्माननीय सदस्यांना मान्य होणार नाही. परंतु मी सांगू इच्छितो की, थेट परदेशी गुंतवणुकीला (एफडीआय) विरोध झाल्यामुळे केंद्राने या योजनेला स्थगिती दिली. आपल्याला कल्पना आहे की, नाशिकमध्ये ब-याच वेळा कांद्याचा भाव 3-4 रुपये किलो असतो परंतु हा कांदा मुंबईत किंवा इतर राज्यात जातो तेव्हा त्याची किंमत किलोला 14 ते 15 रुपये होते. कांदा हा जेव्हा ग्राहकापर्यंत जातो तेव्हा तो 4-5 दलालांकडून जात असल्यामुळे कांद्याची किंमत वाढते पर्यायाने ग्राहकाला जास्त दराने कांदा खरेदी करावा लागतो तसेच शेतक-यालाही त्याच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. खरे म्हणजे एफडीआयच्या माध्यमातून शेतक-याला योग्य भाव मिळणे शक्य होणार होते तसेच ग्राहकाला योग्य दरात माल मिळाला असता. ज्यावेळेस मोठया कंपन्या अशाप्रकारे 4-5 हजार कोटी रुपयांची

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

गुंतवणूक करतात त्यावेळेस ते शेतक-यांना बिन व्याजी पैसे देतात व सांगतात की, तुम्ही हा माल तयार केला तर तुमच्या मालाला हा हा दर कंपनीकडून मिळेल. शेतक-यालाही या दराचा फायदा मिळू शकतो व ग्राहकालाही त्याचा फायदा होऊ शकतो. परंतु दुर्दैवाने आज संपूर्ण देशात वेगळयाच पध्दतीचे राजकारण सुरु आहे. चांगल्या योजनांनाही आज विरोध केला जात आहे, चांगल्या योजनांचा अभ्यास केला जात नाही व त्याचे परिणाम शेवटी शेतकऱ्याला व सामान्य माणसाला भोगावे लागतात.

सभापती महोदय, कापूस, आंबा, काजू, द्राक्ष या पिकांचे आपल्याकडे मोठया उत्पादन घेतले जाते. खरे म्हणजे या मालावर प्रक्रिया करणारे जे उद्योग आहेत त्या उद्योगांना आपण किती वाव देतो, किती मालावर प्रक्रिया केली जाते, किती माल फुकट जातो याचा आपण कधी विचार केला आहे काय ? कोकणातील आंब्यावर लासा रोगामुळे शेतक-यांचे हजारो कोटीचे नुकसान होत असते. यासंदर्भात आपण संशोधन केले नाही तर शेतक-यांचे नुकसान असेच होत राहणार. त्यामुळे शासनाने शेतीच्या क्षेत्रात मोठया प्रमाणात संशोधन करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी सांगितले आहे की, चीनमध्ये आपल्या देशापेक्षा हेक्टरी तिप्पट उत्पादन घेतले जाते. तिप्पट उत्पादन झाल्यामुळे त्यांचा उत्पादन खर्च आपल्यापेक्षा निश्चितपणे कमी असल्यामुळे ते कमी किमतीतही आपला शेती माल आंतरराष्ट्रीय बाजारात विकू शकतात. त्यामुळे शेतीवर शासनाने अजून संशोधन करण्याची गरज आहे. बीटी कॉटनच्या संदर्भात शासनाने पाऊल उचलल्यामुळे कपाशीचे उत्पादन वाढले परंतु आपण बीटी वांग्याला विरोध केला. शेतकरी अनेक वेळेस सांगतात की, आम्ही जे काही बियाणे घेतो ते ब-याच वेळा बोगस असल्यामुळे बियाणे पेरल्यानंतर उगवत नाही व त्यामुळे पूर्ण तीन-चार महिन्यांचा काळ वाया जातो. त्यामुळे बोगस बियाण्यांच्या संदर्भात शासनाने कडक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शेतकरी वाचला पाहिजे, कारण हा देश कृषी प्रधान देश आहे. आपल्या देशातील 70 टक्के जनता शेतीशी निगडीत आहे. जर शेतीमधून शेत माल तयार झाला नाही तर जनतेला खाण्यासाठी अन्न मिळणार नाही. त्यामुळे शेतीच्या संदर्भात शासनाने गांभीर्याने लक्ष

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

देण्याची आवश्यकता आहे. केवळ कापसाच्याच दराचाच प्रश्न नाही तर संपूर्ण शेती व्यवसायाकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहून त्यातून मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. आजची कपाशीच्या संदर्भातील जी काही चर्चा होत आहे ती शेवटची चर्चा आहे असे समजून शेतीकडे शासनाने अत्यंत गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. शासनाने जर लॉंग टर्म उपाययोजना केली तर यातून शेतकरी जीवंत राहू शकेल. दर अधिवेशनामध्ये शेतीच्या प्रश्नावर सर्व कामकाज बाजूला सारुन चर्चा केली जाते व सांगितले जाते की, शेतक-यांना हजार कोटीचे, दोन हजार कोटीचे पॅकेज द्या आणि दुस-या बाजूने ओरडायचे की, पायाभूत सुविधांसाठी शासनाकडे पैसे नाहीत, विजेसाठी पैसे नाहीत. पायाभूत सुविधा वाढल्या नाही तर शेतीचा माल वाहून नेण्यासाठी त्रास होणार आहे. वीज मिळाली नाही तरी शेतकऱ्यांना त्याचा त्रास होईल. त्यामुळे यासंदर्भात शासनाने सांगड घालून, सर्व बॅलन्स मेन्टेन करुन लॉंग टर्म प्लॅनिंग केले तर त्याचा फायदा शेतकऱ्यांना आणि जनतेलाही मिळू शकेल. लॉंग टर्म उपाययोजनेसाठी समिती बनवावयाची असेल तर समिती बनवा परंतु शेतीच्या प्रश्नातून महाराष्ट्रातील शेतकरी मुक्त कसा होईल यासाठी प्रयत्न केला तर आजच्या चर्चेतून आपण काही तरी मिळवले असे म्हणता येईल.

आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या चर्चेचा आजचा दुसरा दिवस आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सभागृह पेटले आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. त्याच बरोबर सोयाबीन, ऊस, धान उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न या चर्चेच्या निमित्ताने पुढे आले आहेत. दोन दिवस चाललेल्या चर्चेचे मुद्दे लक्षात घेतले तर काही मुद्दे हे शासनाने लक्षात घेतले पाहिजेत अशा प्रकारचे आहेत. त्या पलीकडे जाऊन देखील काही मुद्दे रहात आहेत. त्या मुद्यांचा परामर्श घेणे नितांत आवश्यक आहे. तेवढेच मुद्दे आपल्या लक्षात आणून देण्यासाठी मी उभा राहिलो आहे. ही जी चर्चा सुरू आहे त्याद्वारे शेतकऱ्यांच्या विविध प्रकारच्या मागण्यांकडे आपले लक्ष वेधण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे.

आपल्या राज्यात 70 ते 80 टक्के अल्पभूधारक शेतकरी आहेत. अल्पभूधारक शेतकऱ्याची 1एकर, तर काहींची 10-20 गुंठे जमीन आहे. अशा या शेतीवर या शेतकऱ्यांची तीन महिने देखील गुजराण होऊ शकत नाही. एवढेच नव्हे तर दोन-तीन एकर असणाऱ्या शेतकऱ्याची देखील आता शेतीवर गुजराण होत नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांना आपले पोट भरण्यासाठी उद्योगधंदे करावे लागतात. जो मोठा शेतकरी आहे, तो स्वतःच्या कुटुंबाला लागणारे धान्य उत्पादन करून उरलेले धान्य बाजारात विकून त्याद्वारे इतर गरजा भागवितो. असा शेतकरीवर्ग देखील आपल्याकडे आहे. तसेच नगदी पिकाचे उत्पादन करणारा देखील शेतकरीवर्ग आहे. नफा-तोट्याच्या परिभाषेत वावरणारा शेतकरी वर्ग आहे. गेल्या दोन दिवसापासून झालेली चर्चा ही कॅश क्रॉप शेतकऱ्याच्या व्यथांसंबंधी होत आहे असे मला वाटते.

आज अल्पभूधारक शेतकऱ्याला शासनाचा आधार मिळण्याची आवश्यकता आहे. त्याचा विचार यात फार कमी केला गेला आहे असे दिसते. अल्पभूधारक शेतकरी सर्व यंत्रणेचा केंद्र बिंदू मानला पाहिजे. आपण मामलेदार कचेरीमध्ये गेल्यानंतर असे लक्षात येईल की, दररोज अल्पभूधारक शेतकरी शेती विकून मोकळा होत आहे. धनिक शेतकरी, गावातील मोठा उद्योगपती 10-20 गुंठे, 5 एकर जमीन खरेदी करताना दिसत आहेत. आज अल्पभूधारक शेतकरी गावातील जमीन विकून पलायन करताना दिसत आहेत. अशा पद्धतीने अल्पभूधारक शेतकरी भूमिहीन होणे या पद्धतीला प्रचंड प्रमाणावर वेग आला आहे. ही पद्धत फक्त विदर्भामध्येच आली आहे, असा माझा दावा नाही.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे....

मी हिरव्या पट्टयामध्ये राहतो. सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर मध्ये राहतो. तेथे सुद्धा अल्पभूधारक शेतकरी निष्कासित होत आहे. त्या शेतकऱ्याला स्वत:चे घरदार सोडून उदर निर्वाहासाठी मुंबई-पुण्याकडे धाव घ्यावी लागत आहे. अन्य व्यवसाय करण्यासाठी तो धडपडत आहे.

शेतीचे उद्ध्वस्तीकरण होण्यामध्ये शासकीय ध्येय धोरणाचा मोठा वाटा आहे. शेतकऱ्याला आज नैसर्गिक पाणी मिळत नाही. शेतीचा पोत उतरत आहे. शेतीमध्ये रासायनिक खताचा वापर केल्यामुळे जमिनीचा पोत जात आहे. शेतकऱ्याला गायी-म्हशी, बैल पाळणे शक्य होत नाही. त्यामुळे त्याला भाड्याने ट्रॅक्टर घ्यावे लागते. पण त्याचा भाडेपट्टा त्याला परवडत नाही. त्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांना पिकाऊ शेत वर्षानुवर्षे तसेच ठेवावे लागते. त्यामुळे त्याच्याकडे कोणत्याही प्रकारची पेरणीसह आर्थिक क्षमता रहात नाही.

मी माझ्या भाषणाच्या शेवटी एकच मुद्दा आपल्या लक्षात आणून देणार आहे. नेमेची येतो पावसाळा या उक्ती प्रमाणे दर अधिवेशनामध्ये आपण या प्रश्नावर वारंवार चर्चा करतो व ती चर्चा तेथेच सोडून देतो. आपण फक्त थोडीफार डागडुजी करतो. वरवर मलमपट्टी करतो. हे तुम्हा-आम्हाला परवडणारे नाही. आपण लोकांचे प्रतिनिधी म्हणून सभागृहात बसतो. आज 11 कोटी जनतेचे लक्ष आपणाकडे लागून राहिले आहे.

स्वातंत्र्य मिळून 62 वर्षाचा कालावधी झालेला आहे. शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. असे असले तरी आपण त्याच्याकरिता प्रभावी असे काहीही करू शकलेलो नाही. आज शेतकऱ्यांमध्ये वैफल्याची भावना निर्माण झाली असल्यामुळे ते आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहेत. मी या निमित्ताने राज्यकर्त्यांना एवढेच सांगणार आहे की, एक कालबद्ध कार्यक्रम आपण हाती घेतला पाहिजे. सर्व शेतकरी संघटनेचे पदाधिकारी-नेते, राजकीय पक्षाचे प्रमुख नेते, लोकप्रतिनिधी, शेती तज्ज्ञ या सर्वांशी चर्चा करण्यासाठी एक व्यापक यंत्रणा उभी करावी व मार्च अधिवेशानाच्या पूर्वी महाराष्ट्राचे कृषि विषयक धोरण निश्चित करावे. असे धोरण निश्चित करण्यासाठी समिती गठित करू या व येत्या मार्च मध्ये ..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवार साळुंखे....

अंतिम रित्या शिक्का मोर्तब करू या. म्हणजे नवीन आर्थिक वर्षापासून आणि मान्सून पासून ध्येय धोरण निश्चित करून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिलासा देऊ या.

आपण गुजरातचे उदाहरण देतो. एवढेच नव्हे तर सन्माननीय सदस्यांनी देशातील अन्य प्रांतांचा देखील उल्लेख केला आहे. काल पंजाबचा देखील उल्लेख झाला. आपलेही राज्य त्याच्याही पुढे जाऊ शकते. सगळ्यांनी मिळून एक चांगला निर्धार करू या. तरच येथील बोलण्याला व विचार मांडण्याला चांगला अर्थ प्राप्त होईल. नाही तर मग आपण वायफळ चर्चा करणारे आहोत असा चुकीचा संदेश जाईल व आपल्याबद्दल जनमानसात जो असंतोष निर्माण होत आहे, तो अधिक तीव्र व गंभीर होईल. ती वेळ आपल्यावर येऊ नये म्हणून सर्वव्यापी चर्चा करून एक धोरण ठरवू या अशा प्रकारची सूचना करतो आणि येथेच थांबतो.

.....

...4

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : आदरणीय सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांशी संबंधित असा अतिशय संवेदनशील विषय आपल्या परवानगीने सभागृहात मांडलेला आहे. त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांची परिस्थिती केविलवाणी व शोचनीय आहे. आमदार श्री.सय्यद पाशा पटेल यांचे भाषण ऐकल्या नंतर पुन्हा विषयांची पुनरूक्ती न करण्याचे मी ठरविले आहे. या चर्चेच्या निमित्ताने शासनाने मराठवाड्यातील आणि विदर्भातील शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी भावना व्यक्त केली तर ती अप्रस्तुत ठरू नये.

विदर्भ म्हटले की, एकेकाळी कापसाचे बोंड दिसायचे आणि कापसाच्या बोंडामध्ये शेतकऱ्यांचे तोंड असायचे. पण हळूहळू चित्र बदलले आहे. आज मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कापसाचे उत्पादन होत आहे. एकेकाळी आमच्याकडे दिव्याची वात लावण्यासाठी कापूस नसायचा. पण आज तोच मराठवाडा कापसाचे माहेरघर म्हणून ओळखला जात आहे. बीड जिल्हा तर कापसाची जननी आहे. माननीय राज्यमंत्री हे बीड जिल्ह्यातील आहेत. ते आता उपस्थित आहेत. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, टेक्स्टाईल पार्कचा विचार शासनाने जरूर करावा. गेली पाच-सहा वर्षे मराठवाड्यातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती कापसामुळे बदलून गेलेली आहे. मराठवाड्यातील शेतकरी आर्थिक सुबत्ता व संपन्नता कापसामुळे अनुभवतो आहे.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

परंतु मागील पाच-सहा वर्षाच्या तुलनेत या वर्षीचे चित्र अतिशय विदारक आहे. हेक्टरी तीन किंवा साडे तीन क्विंटल कापूस निघू शकेल इतका उतारा पडत आहे. या अगोदरच्या वर्षी शेतकऱ्यांनी हेक्टरी किमान 10 क्विंटल कापूस घेतला होता. या वर्षी देखील शेवटच्या पावसाने शेतकऱ्याला हात दिला नाही. शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसला होता परंतु पाण्याचा थेंब न बरसल्यामुळे शेतकऱ्याचे डोळे कोरडे राहिले. अशा अवस्थेत महाराष्ट्रातील शेतकरी या शासनाकडे मोठया आशेने पहात आहे आणि शासनाकडून मोठी अपेक्षा व्यक्त करीत आहे. शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारे हे सरकार असल्यामुळे त्यांना भरीव स्वरुपाची मदत केली जाईल. किंबहुना एकरी मदत जाहीर केली जाईल. मला शासनाला विनंती करावयाची आहे की, आपण हेक्टरी मदत जाहीर करण्याचा विचार करु नये. "किमान आणि कमाल" या शब्दाचा वापर न करता मराठवाडा, विदर्भातील शेतकऱ्यांना आपण मदत जाहीर करावी, त्याची आज शेतकऱ्याला गरज आहे. मराठवाडयातील, विदर्भातील शेतकऱ्यांनी स्वप्ने पाहिली. आपल्या दारामध्ये मांडव लागेल, आपली मुलगी बोहल्यावर चढेल, तिचे हात पिवळे होतील, ते व्याह्याची वस्त्रे परिधान करतील ही सर्व स्वप्ने पुढे ढकलून पुढील वर्षीच्या अपेक्षेवर आज शेतकरी जगू पहात आहे. या संदर्भात विदर्भातील एका कविने असे म्हटले आहे की,

"चोळी हळद्या रंगाची तशी
लुगळ नेसली
तुवा सुहासन पोरी
दारी शेवंती लाजली"

सभापती महोदय, हे वास्तव चटके देणारे आहे, हे सत्य समाज व्यवस्था जाळून टाकणारे आहे. त्याकरिता शेतकऱ्यांचे स्वप्न प्रत्यक्षात साकार करण्याच्या दृष्टीने राज्य शासन शेतकऱ्यांच्या मदतीला धावले नाही तर मराठवाडा आणि विदर्भामध्ये आत्महत्त्येची शृंखला समाज व्यवस्थेला अनुभवावी लागेल. परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी राज्य शासनाने त्यांना मदत जाहीर करावी अशी मी आग्रहाची विनंती राज्य शासनाला करणार आहे.

सभापती महोदय, यावर्षी सर्वसाधारणपणे 35 टक्के कमी कापसाचे उत्पादन झाले आहे. 100 लाख क्विंटल कापूस कमी उत्पादित होण्याची शक्यता आहे व तशाप्रकारचा तर्क आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

प्रा. सुरेश नवले...

यामध्ये पाच-पंचवीस लाख संख्या कमी-जास्त होऊ शकेल. या संदर्भात माननीय सदस्य श्री. पाशाभाई पटेल यांच्याकडे आकडेवारी आहे. लातूर ते नागपूर असा पायी प्रवास करुन आले आहेत, दिंडी घेऊन आले आहेत. परंतु या विषयासंदर्भात त्यांच्या भावना अतिशय महत्वाच्या आहेत. त्यांच्या तळमळीमध्ये आणि तगमगीमध्ये मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांचे प्रतिबिंब दिसत आहे. त्यांच्या भावना दिंडीमधून साकार झालेल्या आहेत. माननीय मंत्री श्री. लक्ष्मणराव ढोबळे आपणास सांगू इच्छितो की, त्या कापसाच्या बोंडाला इंगळीने विळखा घातलेला आहे. या इंगळीने अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना दंश केलेला आहे. शासकीय रुग्णालयामध्ये आठ तासाच्या आतमध्ये जर त्यांना दाखल केले नाही तर शेतकऱ्याला मृत्यू येऊ शकतो इतकी भयावह इंगळी आहे. त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांचे चित्र संपूर्ण समाज व्यवस्था कोलमडून टाकणारे आहे. याकरिता आमच्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न राज्य शासनाने करावा.

माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना मी सांगू इच्छितो की, आपण संपूर्ण मराठवाडा आणि विदर्भ फिरलात परंतु मी बीड जिल्ह्यातील किमान 150 गावांना भेटी देऊन तेथील शेतकऱ्यांबरोबर चर्चा केली. शेतकऱ्यांच्या शेतामध्ये बी.टी. बियाणे पेरण्याचा प्रयत्न सुरु आहे. या बियाण्यांच्या मुळया साधारणपणे पाच ते सहा इंचापर्यन्त अवती भवती जाऊन पसरतात. पूर्वी गावरान कापसाचे रोप होते, त्याचे सोठमूळ हे जमिनींच्या गर्भामध्ये जायचे आणि पाण्याचा शोध घ्यायचे, पाणी शोषून घ्यायचे. परिणामत: 15 दिवस किंवा एक महिना जरी पाऊस पडला नाही तरी रोपावर परिणाम होत नसे. बी.टी. बियाण्याच्या रोपांची मुळे ही फक्त अवती-भवती पसरतात. त्यांना सोठमूळ नसल्यामुळे आणि जमिनीच्या गर्भामध्ये असलेले पाणी शोषण करण्याची क्षमता नसल्यामुळे दुर्दैवाने त्या रोपाला पाणी मिळत नाही. माझी राज्य शासनाला विनंती आहे की, राज्यातील निष्क्रीय असलेल्या कृषी विद्यापीठांच्या कारभारावर 12 तासाची चर्चा लावावी इतका गंभीर आणि गहन विषय आहे. त्यांना या बी.टी. बियाण्यांवर नवीन काही तरी संशोधन करावयास लावा, त्या बियाण्याचे सोठमूळ जमिनीमध्ये घाला, तरच आमचा शेतकरी वाचू शकेल. एके ठिकाणी कविने असे म्हटले आहे की,

"पायजो पायजो, म्हणता म्हणता,

गेलीच पायात अणी

तरी तुझ्या डोळयात कस आल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

प्रा. सुरेश नवले...

नाही पाणी,
जखम झाल्या पायावर
पदर तरी ठेव
जीवाचाही तुला कसा लागत नाही भेव
तुला वाटल तरी तुवा धनी
येणार नाही,
दूर गेल्या वखरा लोक
तुझी हाक ही जाणार नाही
सपणात राहायच,
बिचार गालातच हसत
मला तर गळे तू मुलखा न्यारीच दिसत
काळं काळं ढेकूण म्हणत
नवरीवाणी दिसते
रक्ताचा थेंबही त्यावर
मेंदीवाणी हसते,
मेंदीवाणी हसते..."

अशाप्रकारे आजचा शेतकरी रक्तबंबाळ अवस्थेत आहे. तो अनवाणी, पादत्राणाविना आहे. या शेतकऱ्याला वाचविण्यासाठी राज्य शासनाने ठोस भूमिका घेऊन पुढे जाण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मला केंद्र शासनाचे आश्चर्य वाटते. ते शासन देखील आमचेच आहे. जगाने खुली अर्थव्यवस्था स्वीकारल्यानंतर निर्यात कधी करावयाची, आयात कधी करावयाची? परंतु निर्यातीवर बंदी आहे. केंद्र शासनामध्ये बसलेले महाभाग कोण आहेत? माननीय श्री. शरदचंद्रजी पवार साहेब हे देशाचे कृषी मंत्री आहेत. त्यांच्याकडे द्रष्टेपणा आहे. त्यांच्या द्रष्टेपणाचा फायदा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना व्हावा ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची अपेक्षा, आकांक्षा आणि इच्छा आहे. परंतु दुर्भाग्याने निर्यातीचे धोरण महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील शेतकऱ्यांच्या मानगुटीवर बसून त्यांच्या माना मोडण्याचे काम करीत आहे. ते बदलण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह

अशुद्धलिखित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

प्रा. सुरेश नवले...

धरावा. महाराष्ट्रातील विशेषत: विदर्भ आणि मराठवाडयातील शेतकऱ्यांना दिलासा द्यावा एवढी आग्रहाची आणि कळकळीची विनंती करुन आणि माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणलेल्या प्रस्तावाबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामधून अनेक प्रकारच्या अडचणी मांडल्या आहेत व त्याव्दारे त्यांनी शेतकऱ्यांच्या भावना या ठिकाणी व्यक्त केल्या आहेत. विदर्भातील शेतकरी असो, मराठवाडयातील शेतकरी असो, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी असो, कोकणातील शेतकरी असो अशाप्रकारे कोणत्याही प्रादेशिक भावनेमध्ये न अडकता राज्यातील शेतकऱ्यांना न्याय देण्याची भूमिका राज्य शासनाने घ्यावी अशा प्रकारच्या भावना सर्व माननीय सदस्यांनी व्यक्त केल्या आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय पाटील . . . .

याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी कापसाच्या संदर्भातील भूमिका व्यक्त केलेली आहे तसेच धानाच्या बाबतीत देखील भूमिका व्यक्त केलेली आहे. आता पश्चिम महाराष्ट्रामध्ये सुध्दा पावसाचे प्रमाण कमी झालेले आहे. त्यामुळे तेथील पिकांवर फार मोठया प्रमाणात परिणाम झालेला आहे. शेतकऱ्याचे जे पशुधन आहे, ज्याच्यावर त्याचे तेल-मीठ चलते, त्या जनावरांवर,पशुधनावर देखील परिणाम झालेला आहे. त्यामुळे शेतकरी अडचणीमध्ये आलेला आहे. त्यामुळे या राज्यातील शेतकरी या शासनाकडे माय-बाप म्हणून पहात आहे, त्या सरकारने या सर्व लोकांना मदत करण्याची भूमिका घेतली पाहिजे. याठिकाणी ज्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत, त्याच्याशी मी पूर्णपणे सहमत असून, शासनाने या शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी भूमिका व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

. . . .3 यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, ज्यावेळी दरवेळेस नागपूर येथे अधिवेशन होते, त्यावेळी अधिवेशनापूर्वी, अधिवेशन सुरु असताना आणि अधिवेशन संपत असताना आपण एक ठराविक ऋतू जावा किंवा एखादा मौसम असावा त्यापध्दतीने लोकांच्या भावभावनांमध्ये हलकल्लोळ झाल्याचे पहात असतो. यावेळेला सुध्दा कापसाच्या प्रश्नावरुन उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ याठिकाणी प्रचंड अस्वस्थता दिसून येत होती. तसेच पश्चिम महाराष्ट्रामध्ये ऊस उत्पादकांनी बारामतीला जे ठिय्या आंदोलन केले होते, त्यानंतर शासनाने ऊस उत्पादकांना काही प्रमाणात दिलासा देणारी घोषणा केली.परंतु कापूस उत्पादकांच्या प्रश्नाबाबत अधिवेशन सुरु होईपर्यंत शासनाने कोणतीही घोषणा केली नाही. आज सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 97 अन्वये जी चर्चेची मागणी केली आहे आणि अजूनपर्यंत आपण या विषयाच्या संदर्भातील उत्तरापर्यंत पोहोचत नाही ही वस्तुस्थिती आहे.खरे सांगावयाचे तर मी ज्या-ज्या वेळी विदर्भामध्ये अधिवेशनासाठी येते, तेव्हा कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न आणि सातत्याने आत्महत्याग्रस्त कुटुंबांची संख्या वाढत असल्याचे दिसते. त्यामुळे मन निश्चितपणे खंतावते, शरमते आणि असे वाटते की, जेव्हा आम्ही सगळे आमदार अधिवेशना साठी येतो, त्यावेळी काही वृत्तपत्रांमध्ये असे म्हटले जाते की, "हे अधिवेशन कापूस खाणार" आणि अनेक लोक तोंडावर देखील बोलतात की, तुम्ही सगळे येथे अधिवेशनासाठी येता आणि निघून जाता, पण त्याऐवजी जर हे अधिवेशनच घेतले नाहीतर जे पैसे शिल्लक रहातील ते जर शेतकऱ्यांना दिले तर उपयोग होईल असे आपल्याला सरळसरळ लोक अपमानित करीत असतात. तरीही या अधिवेशनामध्ये चर्चे मागून चर्चा होत असतात. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पॅकेज जाहीर करण्यात येते. पण यातील निधी किती मिळतो,किती मिळत नाही याबाबत मार्च मधील अधिवेशनामध्ये परत बोलत असतो आणि अधिवेशनामध्ये आपण परत त्याच चर्चेला सामोरे जात असतो.

सभापती महोदय, माझ्या अगोदरच्या सन्माननीय सदस्यांनी बोलत असताना एक भूमिका मांडली. यावर्षी मी असा विचार केला की,नागपूर अधिवेशनाला जाण्यापूर्वी कापूस दिंडीमध्ये सामील व्हावे,त्यांना पाठिंबा द्यावा आणि त्यांना सहकार्य करावे. विदर्भ जन आंदोलन समितीचे श्री.किशोर तिवारी हे नेहमी डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये येत असतात आणि त्यांच्या बरोबर अनेक शेतकरी कुटुंबातील विधवा भगिनी देखील नागपूरला येत असतात म्हणून यावेळेस असा विचार केला की, या सर्व भगिनी नागपूरला येण्यापूर्वी कापूस उत्पादक शेतकरी आणि काही गावांमध्ये जाऊन स्वत:

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भेट द्यावी. म्हणून 13 व 14 ऑक्टोबरला श्री.किशोरभाऊ तिवारी यांच्या सोबत मी सायखेडा, पडागाव येथील भगिनींना स्वत: भेटले,त्यांच्या घरी गेले.पांढरकवडा येथे दोन दिवस राहिले आणि त्यावेळी श्री.किशार तिवारी यांच्याशी देखील तपशीलवार चर्चा केली आणि त्यांच्याकडून काही मुद्दे समजून घेतले. मी 13 व 14 ऑक्टोबर रोजी पांढरकवडा येथे मुद्दाम गेले होते. मला असे वाटत होते की, माननीय मुख्यमंत्री महोदयांना राज्याचा कार्यभार हातामध्ये घेऊन 12 नोव्हेंबरला एक वर्ष पूर्ण होत आहे. त्या निमित्ताने त्यांना काही निवेदने देण्याची किंवा काही विषयांबाबत त्यांच्या बरोबर चर्चा करण्याची संधी मिळाली बरे होईल. कारण कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या संदर्भात विदर्भ जन आंदोलन समिती, इतर अनेक संघटना तसेच शिवसेना-भाजप पक्षाचे कार्यकर्ते देखील सक्रीय आहेत.परंतु हा पक्षीय प्रश्न नसून विदर्भ आणि संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असल्यामुळे पक्षीय हिताच्या पलीकडे जाऊन आपल्याला काय करता येईल हे समजून घ्यावे यासाठी मी त्यांना भेटावयास गेले होते. यावेळी श्रीमती अपर्णा माळीकर या महिलेच्या पतीने आत्महत्या केली होती, तिची देखील भेट घेतली. त्याच वेळेला वेगवेगळया सरकारनी ज्या धोरणात्मक घोषणा केलेल्या आहेत, ते जर तुलनात्मक रित्या समजून घेतले तर मग आश्चर्य वाटते की, काहीवेळेला आपण जी निमित्त करतो, ती कशाची द्योतक समजावयाची ?

सभापती महोदय, सन्माननीय कृषी मंत्री माननीय श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी घोषणा केली आहे. ही बातमी "ॲग्रो-1"मधील आहे. त्या बैठकीला अनेक आमदार उपस्थित होते. त्यावेळी डॉ.एन.पी.हिराणी देखील उपस्थित होते आणि त्यामध्ये त्यांनी असे जाहीर केले की, राज्यामध्ये आठवड्याभरामध्ये कापूस खरेदी केंद्रे सुरु होणार ही त्यांनी दिनांक 08 ऑक्टोबर 2011 रोजी घोषणा केलेली आहे. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीला 12 नोव्हेंबर रोजी एक वर्ष पूर्ण झाले म्हणजे 8 ऑक्टोबर ते 12 नोव्हेंबर एक महिना पूर्ण होऊन गेला आणि त्याच दिवशीचे परत वृत्त आहे आणि त्यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांच्या या वर्षाच्या कारकिर्दीमध्ये 1065 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हे सुरु असताना 24 नोव्हेंबरला पार्लमेंटमध्ये हा प्रश्न बराच गाजला शिवसेना-भाजपच्या बरोबर सन्माननीय सदस्य श्री.राजू शेट्टी यांच्यासारखेही खासदार होते. त्यावेळेला कापूस उत्पादकांना दिलासा मिळणार का? अशा प्रकारची चर्चा झाली, तशी बातमी आली आणि लोकसभेमध्ये सुध्दा बरेच रणकंदन झाले. मात्र या बाबत काहीही घोषणा झाली नाही.

सभापती महोदय, यानंतर 30 तारखेच्या अगोदरची माहिती आहे आणि मला येथे 2-3 प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपस्थित करावयाचे आहेत. पहिले म्हणजे शासनाची कापूस खरेदी लांबणीवर गेली. यामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळाला असला तरी कापूस उत्पादकांना परत वाऱ्यावर सोडण्यात आले.केंद्र शासनाच्या नाफेडने हे नाकारले आणि त्यांनी असे सांगितले की, तुम्ही जो हमी भाव सुचविलेला आहे, तो आम्ही देऊ शकत नाही अशा पध्दतीने नाफेडने शासनाला या संदर्भातील धोरण सांगितले. या मधल्या काळामध्ये शेतकरी मजबूर झाला आणि अनेक शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात मिळेल त्या भावमध्ये कापूस विकला अशी परिस्थिती निर्माण झाली होती.अशा परिस्थितीमुळे शेतकरी लाचार, मजबूर झाला.त्या बरोबरच सरकारने असे जाहीर केले की, निवडणुकीची आचार संहिता असल्यामुळे आम्ही कोणतीही धोरणात्मक घोषणा करु शकत नाही.परंतु राज्य निवडणूक आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती नीला सत्यनारायण यांनी जाहीर केले की, सरकार घोषणा करु शकते, परंतु त्याचे श्रेय घेऊ शकत नाही. सरकार निर्णय घेऊ शकते पण त्याबद्दलचे श्रेय न घेता सुध्दा विकासात्मक कामे करु शकते. आपल्या सर्वांच्या लक्षात असेल की, नागपूर खंडपीठाचा काही वर्षापूर्वीचा निर्णय आहे की, निवडणूक आचारसंहितेसाठी धोरणात्मक निर्णय घेण्याचे बंधन नाही. दैनंदिन जी कामे आहेत, जे जीवनमरणाचे प्रश्न आहेत त्याबाबतीत सरकार घोषणा करु शकते. पण सरकारने आचारसंहितेचे कारण सांगून यासंबंधातील निर्णय लांबणीवर टाकला. या काळामध्ये आपण एका बाजूला कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत सतत बोलतो.पण निर्यात बंदीचा जो विषय आहे, त्या विषयापर्यंत आपण पोहोचतच नाही. एकीकडे निर्यात बंदी होत असताना आज आपण पहात आहोत की, येथे मोठ्या प्रमाणात आयात केली जात आहे. अशा वेळी परदेशात तैवान, चीन आणि इतर देशांमध्ये जे कापूस उत्पादक वस्त्रे बनवितात, त्यांच्यासाठी खुलेपणाने त्यांना मोकळे रान करुन दिलेले आहे आणि याठिकाणी मात्र निर्यात बंदीमुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले ही देखील वस्तुस्थिती आहे. याठिकाणी मघापासून याबाबत केंद्र शासनाचे आणि राज्य शासनाचे काय धोरण आहे याबाबत चर्चा होत आहे. याठिकाणी बोलत असताना मनाला क्लेश होतात.परंतु नाईलाजाने असे बोलणे क्रमप्राप्त आहे.

सभापती महोदय, आपण दोन दिवसापूर्वी सर्वांनी वर्तमानपत्रामध्ये वाचले की, रोजगार हमी योजनेच्या संदर्भात माननीय केंद्रीय कृषी मंत्र्यांनी मत व्यक्त केले की, महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना काही सिझन मध्ये बंद असे,तशाच पध्दतीने राज्यामधील केंद्र शासनाची जी रोजगार हमी योजना आहे ती सुध्दा बंद करावी. मला याठिकाणी प्रश्न उपस्थित करावयास पाहिजे की, केंद्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाची रोजगार हमी योजना नक्की खरोखर किती दिवस चालते ? त्यामुळे किती मजुरांना काम मिळते किंवा मिळत नाही ? तसेच ही रोजगार हमी योजना बंद केल्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना नक्की कोणता दिलासा मिळणार आहे? याचे शासनाने सविस्तर विवेचन मांडले तर आमच्याबरोबरच मजूर आणि सर्वसामान्य लोकांना कळू शकेल की, यातून हा प्रश्न नक्की कशा प्रकारे सुटणार आहे.

यानंतर कु.थोरात .. . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे. . .

सभापती महोदय, केंद्रीय अर्थ मंत्री श्री. प्रणवकुमार मुखर्जी यांनी जाहीर केले की, कापूस उत्पादकांना दिलासा देण्यासाठी आम्ही काही काम करु. अशा प्रकारची आश्वासने एका बाजूला दिली जात असताना प्रत्यक्षात काय घोषणा केली जाईल या बद्दल फार मोठे प्रश्न चिन्ह लोकांच्या मनामध्ये आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना ज्या वेळी एक वर्ष पूर्ण झाले त्यावेळी एका वाहिनीवर मला जाहीरपणे चार महत्वाचे प्रश्न विचारण्यास सांगितले होते. चार महत्वाचे प्रश्न त्यांच्यासमोर मांडावयाचे होते आणि त्या प्रश्नांची उत्तरे माननीय मुख्यमंत्र्यांनी देणे अपेक्षित होते. विदर्भातील आत्महत्याग्रस्त कुटुंबींयांसाठी शासन नक्की काय करणार आहे याबद्दल मी प्रश्न विचारला असता माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. यवतमाळ जिल्हयामध्ये दोन हजार विधवा महिला आहेत असे विदर्भ जनआंदोलन समितीचे श्री. किशोर तिवारी यांनी आम्हाला सांगितले आहे. त्यांच्यापैकी काही विधवा भगिनींनाच मी भेटले. त्यांच्यापैकी फक्त 35 टक्के कुटुंबीयांना मदत मिळते ही आज वस्तुस्थिती आहे. एका बाजूला शेतकरी जेरीस येत आहे. दुसरीकडे असे चित्र बघतो की, कापूस निर्यातीला बंदी आहे. तिसऱ्या बाजूला नाफेडने कापूस एकाधिकार समितीच्या संदर्भात आणि या राज्याच्या भूमिकेच्या संदर्भात जी नकारात्मक भूमिका घेतली आहे त्या बद्दल हे शासन काय करणार आहे हे स्पष्ट झालेले नाही. चौथ्या बाजूला आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांबद्दल आपण वारंवार अधिवेशनामध्ये बोलतो. डॉ. स्वामीनाथन समिती, टाटा इन्स्टिटयुटची समिती, डॉ. नरेंद्र जाधव यांची समिती, इंदिरा गांधी रीसर्च इन्स्टिटयुटची समिती अशा प्रकारे अनेक समित्यांबद्दल आपण बोलतो आणि त्या प्रत्येक समितीच्या अहवालाला दर हिवाळी अधिवेशनानंतर दोन पानांचे जोडपत्र जोडले जाते. त्या जोडपत्रावर नव्याने आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची नावे लिहिलेली असतात. आपण संवेदनशील आहोत काय याबाबत जनता आपल्याला वाटेल त्या नावाने संबोधते. आपल्याला काही वेळा त्यांचा राग येतो. पण दुसरीकडे आपण प्रत्येक वेळी संवेदनाहीन पध्दतीने चर्चा करतो परंतु शेतकऱ्यांच्या पदरात काही पडत नाही. अन्यथा आत्महत्यांची संख्या आपल्याला कमी दिसावयाला पाहिजे होती ती कुठेही कमी झालेली दिसत नाही, ही त्यामधील वस्तुस्थिती आपल्याला सातत्याने निदर्शनास येते.

सभापती महोदय, एका बाजूला सरकार असे म्हणते की, आमच्याकडे पैसे नाहीत. पण पुरवणी मागण्या पाहिल्या तर धान्यापासून मद्य उत्पादनासाठी परत काही कोटी रुपयांची सबसिडी

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे. . .

शासनाने जाहीर केलेली आहे. त्याशिवाय इतर बाबतीत काही अब्जावधी रुपयांचे अनुदान शासनाने जाहीर केलेले आहे. आपल्याला केवळ राजकारणासाठी राजकारण म्हणून या विषयाकडे बघावयाचे नसेल तर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना जीवनाचा अधिकार देण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र आणि राज्य सरकारने या बाबतीत सम्यक पध्दतीने काही भूमिका घेतली पाहिजे. परंतु आमची ही अपेक्षा कधी पूर्ण होईल या बद्दल माझ्या मनामध्ये शंका आहे आणि ती साधार शंका यासाठी आहे की, प्रत्येकवेळी उत्तर देत असताना लोकांनी आम्हाला जनादेश दिलेला आहे, म्हणजेच सर्व प्रश्न संपलेले आहेत अशी विचारांची पध्दत असेल तर शासन जनतेचे समाधान करु शकत नाही, हे जनतेच्या लक्षात आलेले आहे. पण तरीही शासनाला असे वाटत असेल की, आम्ही जे काही करतो त्यामुळे जनता समाधानी आहे तर पुढील डिसेंबर महिन्यातील अधिवेशनात आणखी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या संदर्भात चर्चा करीत असताना जनता जे प्रश्न विचारील त्या बाबतीत शासनाला थोडीसा जरी खंत किंवा खेद वाटणार आहे काय? या संदर्भात मला स्वत:ला एक आमदार म्हणून अतिशय शरमल्यासारखे होत आहे हे मला या ठिकाणी नमूद करणे भाग आहे. धन्यवाद. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. जय भीम. जय महाराष्ट्र.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सोलापूर, सांगली, सातारा या जिल्हयामध्ये या वर्षी पावसाचे प्रमाण अतिशय अल्प झालेले आहे. सांगली जिल्हयामध्ये टंचाईची परिस्थिती जाहीर करण्यात आलेली आहे. त्यापेक्षाही वाईट परिस्थिती सोलापूर जिल्हयातील सांगोला व मंगळवेढा या तालुक्यामध्ये आणि उर्वरित काही तालुक्यामध्ये अतिशय गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. या वर्षी सोलापूर, सांगली व सातारा जिल्हयामध्ये खरीपाची पेरणी झालेली नाही. सोलापूर जिल्हा हा रब्बीचा जिल्हा आहे. संबंध महाराष्ट्राला ज्वारी पुरविणारे मंगळवेढयाचे कोठार पावसा अभावी उद्ध्वस्त झालेले आहे. ज्वारीचे पीक जळून गेलेले आहे. तेथील जनावरे चाऱ्याविना अडचणीत आलेली आहेत. मागच्या पंधरा दिवसापासून आटपाडीच्या तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांनी काही जनावरे नेऊन बांधलेली आहेत. त्या ठिकाणी या वर्षी शासनाने माननीय डॉ. पतंगराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली टंचाईची समिती जाहीर केलेली आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 50 टक्के अनुदान आणि 50 टक्के शेतकऱ्यांकडून पैसे घेण्याचा निर्णय झालेला आहे. त्या ठिकाणी चारा येऊन पडलेला आहे. पण शेतकऱ्यांची 50 टक्के पैसे भरण्याची ऐपत नसल्यामुळे ते चारा घेऊन जाऊ शकत नाहीत. अशा गंभीर परिस्थितीत सोलापूर जिल्ह्यात सुध्दा तातडीने टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर करावी. त्या ठिकाणी पाण्याच्या टँकरच्या मागण्या मोठया प्रमाणात आलेल्या आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला हे शंभर टक्के मान्य आहे की, सन्माननीय सदस्य श्री. साळुंखे हे खूप कमी वेळा बोलतात. मी त्याचा आदर ठेवून एवढेच सांगू इच्छितो की, या ठिकाणी विदर्भातील कापूस, सोयाबीन आणि धान या विषया संबंधीची चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्य सोलापूर जिल्हयातील ज्वारी बद्दल बोलत आहेत. हा विषय अतिशय योग्य आहे. पण ज्या विषयावर या ठिकाणी चर्चा सुरु आहे त्या विषयावर ते बोलत नाहीत. (अडथळा) प्रस्तावाचा विषय वेगळा आहे त्यासंदर्भात शासनाचे सगळे वाभाडे काढावेत. सन्माननीय सदस्य जे बोलत आहेत ते खरे आहे. शासनाने काही केलेले नाही असे ते म्हणत आहेत ते ही खरे आहे. सोलापूरमध्ये केंद्रीय मंत्री असताना तेथे लोक मरत आहेत हे ही खरे आहे त्या संदर्भात आपण बोलावे पण त्या संदर्भात वेगळा प्रस्ताव आणून त्यावर बोलावे असे माझे म्हणणे आहे. आता विदर्भातील कापूस, धान व सोयाबीनवर आपण बोललात तर बरे होईल. सन्माननीय सदस्य जे

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे. . .

सांगत आहेत ते सर्व खरे आहे. त्यांचे सगळे म्हणणे मला पटते. शासनाने काही केलेले नाही हे खरेच आहे. सन्माननीय मंत्री श्री. ढोबळे हे तेथील असून सुध्दा असे होत आहे, हे ही खरे आहे. पण सन्माननीय सदस्यांना अशा प्रकारे विरोधी पक्षाच्या एखाद्या प्रस्तावाचा आधार घ्यावा लागत आहे. म्हणून माझी विनंती आहे की, त्यांनी या संदर्भात वेगळा प्रस्ताव द्यावा. त्यासाठी त्यांना वेगळा वेळ देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री. दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, सोलापूर जिल्हयात कापसाचे उत्पादन कमी असताना सुध्दा सोलापूर येथील सूत गिरणी देशामध्ये पहिल्या क्रमांकाची आहे.

श्री. विनोद तावडे (बसून) : कापसाचे उत्पादन इकडे आणि सूत गिरणी तिकडे.

श्री. दीपकराव साळुंखे : आम्ही तुमच्याकडून कापूस घेऊन सुध्दा सूत गिरण्या चांगल्या पध्दतीने चालवितो. महाराष्ट्रातच नव्हे तर देशामध्ये सुध्दा आता पर्यंत सोलापूरच्या सूत गिरणीचा बऱ्याच वेळा पहिला क्रमांक आलेला आहे. या ठिकाणी शेतकऱ्याच्या कापसाच्या दरवाढीला पाठिंबा देऊन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या विषयावर माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी अल्पाकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. कापसाला योग्य भाव मिळाला पाहिजे. सोयाबीन आणि धान या पिकांना योग्य भाव मिळाला पाहिजे. शेती मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे या संदर्भात माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, विदर्भ, खानदेश आणि मराठवाडा या भागात मोठया प्रमाणात कापसाचे पीक घेतले जाते. या ठिकाणी मोठया प्रमाणात कोरडवाहू शेती आहे. जवळ जवळ 60 ते 70 टक्के शेती ही कोरडवाहू आहे. या ठिकाणी अल्पभूधारक शेतकरी मोठया प्रमाणात आहेत. गेल्या वर्षी कापसाचे उत्पादन चांगले झाले, त्याला भावही चांगला मिळाला म्हणून या वर्षी शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात कापसाचे पीक घेतले. परंतु दुर्दैवाने निसर्गाचा लहरीपणा आणि अनियमितता यामुळे पाऊस उशिरा झाला. सुरुवातीला पाऊस झाला पण नंतर पाऊस झालाच नाही. त्यामुळे कापसाला पोषक हवामान व वातावरण मिळाले नाही. पर्यायाने कापसाचे उत्पादन घटले. मात्र उत्पादन खर्च वाढला. बी-बियाणांचे भाव जास्त वाढले. खतांचे भाव दुप्पटीने वाढले. मजुरीसुध्दा दुप्पटीने वाढली. कापसाच्या वेचणीचे भाव पाच ते सात रुपये किलो इतके वाढले. अशा परिस्थितीत शेतकऱ्याने कापसाच्या उत्पादनावर केलेला खर्च सुध्दा भरुन निघणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे शेतकरी पूर्णपणे भरडला जात आहे. अशा वेळी दोन पध्दतीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. माझ्या मते या संदर्भात कायम स्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी शासनाला विनंती करु इच्छितो की, शेतकऱ्यांना योग्य पध्दतीने मार्गदर्शन मिळाले पाहिजे. शेती तंत्रज्ञान आणि हवामानाची प्रयोगशाळा अत्याधुनिक पध्दतीची असली पाहिजे. शेतमालाला खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. दिलीपराव सोनावणे ...

शेतीला उद्योगाचा दर्जा मिळाला पाहिजे. ज्या ठिकाणी खरोखर शेतकरी भरडला जातो, शेतकरी आपल्या मुलांना शिक्षण देऊ शकत नाहीत अशा शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण मिळाले पाहिजे. त्यांना चांगल्या बी-बियाणांचा पुरवठा झाला पाहिजे. त्यांना खतासाठी अनुदान दिले पाहिजे. शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर सिंचनाची व्यवस्था झाली पाहिजे. शेतीसाठी वीज पुरवठा नियमित व पुरेसा झाला पाहिजे. शेतीसाठी रोजगार हमी योजनेमार्फत मजूर उपलब्ध करुन दिले पाहिजेत. आदरणीय श्री. पवार साहेबांनी नरेगा योजनेच्या संदर्भामध्ये जो पुढाकार घेतलेला आहे त्याप्रमाणे योजना राबविली गेली पाहिजे. शेतीसाठी यांत्रिक पध्दत आणून शेतकऱ्यांना यांत्रिक अवजारांचा पुरवठा अनुदान पध्दतीने केला पाहिजे. सामुदायिक शेती पध्दतीचा देखील विचार झाला पाहिजे. शेतीमाल निर्यात बंदी असावयास नको. अशा पध्दतीच्या जर ठोस आणि कायमस्वरुपी उपाययोजना राबविल्या तर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना दिलासा देऊ शकू.

सभापती महोदय, आजची परिस्थिती पाहून काही निर्णय देखील घेणे् आवश्यक आहे. एक तर कापसाला प्रती क्विंटल भाव वाढवून दिला पाहिजे किंवा शेतकऱ्यांना एकरी अनुदान तरी दिले पाहिजे. शेतकऱ्यांना वाचविणे अत्यंत गरजेचे आहे. शेतकऱ्यांना जगविणे महत्वाचे आहे. म्हणून माझी अशी विनंती आहे की, शासनाने त्यांना एकरी अनुदान द्यावे, शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. शासनाने या बाबतीत ठोस निर्णय घ्यावा. त्याचबरोबर सोयाबीन, धान, कांदा या पिकांच्या संदर्भात देखील चांगले हमीभाव देण्याच्या संदर्भात निर्णय घ्यावा अशी विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला या विषयाच्या संदर्भात बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, या राज्यामध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या ज्या हालअपेष्टा होतात त्यापैकी आज आपल्या निदर्शनास जो ज्वलंत प्रश्न आलेला आहे त्यामध्ये विदर्भ, मराठवाडा, खानदेश या परिसरामध्ये कापूस, धान आणि सोयाबीन या पिकांचे जे उत्पादन झालेले आहे त्याचा आधारभूत दर असेल किंवा त्या उत्पादनात झालेली घट असेल त्यामुळे हवालदिल झालेला जो शेतकरी आहे त्याला आधार देणे आणि त्याच्यावर कोसळलेल्या या संकटातून त्याला बाहेर काढणे यासाठी आज ही जी चर्चा घडवून आणलेली आहे त्याबद्दल मी धन्यवाद देतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये जवळजवळ 137 लाख हेक्टर क्षेत्रापैकी 41 लाख हेक्टर क्षेत्र कापूस, धान, सोयाबीन या पिकाखाली येते आणि प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश या भागातील शेतकऱ्यांचे जीवनमान या पिकांवर अवलंबून आहे. उत्पादन बाहेर आल्यानंतर जो दर मिळतो त्या दराची खात्री नसल्यामुळे, ती बाब अधांतरी असल्यामुळे बऱ्याचवेळा शेतकऱ्यांना संकटाला सामोरे जावे लागते. मग हवालदिल झालेल्या शेतकऱ्याला समोर काहीही आधार दिसत नसल्यामुळे तो आत्महत्या करण्याकडे प्रवृत्त होतो. हा दर ठरवित असताना कृषी मूल्य आयोगाने जे निकष लावलेले आहेत त्यामध्ये केंद्रामध्ये कृषी मूल्य आयोग दर ठरवित असताना प्रामुख्याने एक बाब लक्षात येते की, त्यांच्याकडून सर्व राज्यांना एकसारखेच निकष लावले जातात. सर्व राज्यांना एकसारखे निकष लावले जाऊ नयेत. याचे कारण असे की, सर्व राज्यांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची परिस्थिती आहे. पंजाब, राजस्थान, हरियाणा राज्यामध्ये या पिकांचे ओलिताखाली येणारे क्षेत्र जवळजवळ 99 टक्के आहे आणि आपल्या महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर या पिकांचे फक्त 3 टक्के क्षेत्र ओलिताखाली येते. भारताचे कापसाच्या पिकाखालील क्षेत्र जवळजवळ 121 लाख हेक्टर आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील क्षेत्र 41 लाख हेक्टर आहे. ओरिसा राज्याचे या पिकाखालील क्षेत्र फक्त 2 लाख हेक्टर आहे. महाराष्ट्राचे क्षेत्र 33.59 टक्के असताना आणि ओरिसाचे क्षेत्र 0.6 टक्के असताना दोन्ही राज्यांना एकसारख्या प्रमाणात निकष लावलेले आपल्याला दिसतात. उत्पादनाच्या बाबतीत पाहिले तर भारताचे एकूण उत्पादन 356 लाख गाठी आहे आणि त्यामध्ये महाराष्ट्रातील कापूस उत्पादन जवळजवळ 85 लाख गाठी आहे. हे प्रमाण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

23.56 टक्के असताना 2 लाख गाठी उत्पादित करणाऱ्या ओरिसा राज्याला आणि आपल्या राज्याला एकसारखेच निकष लावले गेलेले दिसतात. देशामध्ये कापसाचे जे उत्पादन निघते त्या बाबतीत सुध्दा विषमता आहे. तामीळनाडू सारख्या राज्यामध्ये एकरी जवळजवळ साडेसात ते साडेआठ क्विंटल उत्पादन घेत असताना आपल्या राज्यामध्ये आपल्याला चार ते साडेचार क्विंटलच्या आसपास जाता येते. मला या ठिकाणी अशी सूचना करावयाची आहे की, केंद्रातील कृषी मूल्य आयोगाने निकष ठरवित असताना देश हा घटक न मानता राज्य हे घटक मानावे आणि प्रत्येक राज्याच्या परिस्थितीनुरुप ते निकष ठरवावेत.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा विषय सिंचनाचा आहे. या संपूर्ण देशामध्ये सिंचनाचे प्रमाण काही राज्यात 90 ते 95 टक्के आहे. देशाचे सिंचनाचे सरासरी प्रमाण 40 टक्के असताना आपल्या महाराष्ट्रामध्ये सिंचनाचे प्रमाण 17 टक्के आहे. म्हणून केंद्राकडून आणि राज्याकडून वेगवेगळ्या योजना राबवून आपल्या राज्यातील सिंचनाचे प्रमाण सुध्दा वाढविले पाहिजे. हे सिंचन वाढवित असताना त्याला विभागवार प्राधान्य न देता तालुका घटक मानून ज्या तालुक्यामध्ये सिंचनाचे प्रमाण कमी आहे, ज्या तालुक्यामध्ये शेतकऱ्यांना शेतीला पाणी देता येत नाही त्या ठिकाणी योजना राबवाव्यात. सिंचन योजना राबबिताना तालुका घटक मानून त्याचे प्रमाण तयार करावे आणि सिंचनाचा प्रश्न सोडवावा. आज वेगवेगळ्या प्रकारच्या तंत्रज्ञानाच्या बाबतीत भारत अग्रेसर असून जगात सर्वात पुढे चाललेला आहे. पण जर हेच तंत्रज्ञान सटेलाईटच्या माध्यमातून शेतीमध्ये वापरुन अशा प्रकारची एखादी नैसर्गिक आपत्ती येत असेल तर त्या बाबतीत या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपण भविष्याचा वेध घेतला तर त्या आपत्तीवर मात करता येऊ शकते असे मला वाटते.

सभापती महोदय, ज्यावेळी कापसाचे पीक येते, कापूस बाहेर येतो त्यावेळेलाच त्याचा दर कोसळला जातो किंवा त्यांना वेगवेगळ्या अडीअडचणींना सामोरे जावे लागते. निर्यातीसारखा महत्वाचा प्रश्न आहे. ज्यावेळी उत्पादन वाढते, शेतकऱ्यांचे उत्पादन बाहेर येते त्यावेळी या पिकावर निर्यातबंदी येते. त्याला अनेक प्रकारची कारणे असतात. मध्यंतरी कांद्याच्या बाबतीत सुध्दा निर्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

बंद झाली. शेतकऱ्यांनी सगळा कांदा रस्त्यावर फेकून दिला. या राज्यातील सर्व नेत्यांनी मिळून आंदोलन केले. त्यानंतर कांद्याची निर्यात सुरु झाली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कांद्याला चांगल्या प्रकारचा दर मिळाला. त्या संकटातून शेतकरी कोठे तरी वाचावयास लागला. अशाच प्रकारे कापसाच्या बाबतीत सुध्दा निर्यातीचा निर्णय घेत असताना राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांवर त्याचे काय दुष्परिणाम होणार आहेत किंवा काय चांगले परिणाम होणार आहेत याचा अभ्यास करुन मगच निर्यातीच्या बाबतीत निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा असे मला वाटते.

सभापती महोदय, दुसरी बाब मला अशी सांगावीशी वाटते की, ऊसाचा दर हा साखरेच्या दरावर अवलंबून राहतो. त्यामुळे कापसाचा दर सुध्दा कापसापासून तयार होणारी जी उत्पादने आहेत त्याच्या दरावर अवलंबून असतो. म्हणून कापसापासून उत्पादित होणारी जी काही उत्पादने आहेत त्यांच्या सक्षमीकरणासाठी शासनाने प्रयत्न करावेत. त्यासाठी सुध्दा वेगवेगळ्या योजना सुरु कराव्यात. स्पिनिंग मिल्स असतील, टेक्स्टाईल पार्क असतील, जिनिंग असेल, प्रेसिंग असेल असे वेगवेगळे उद्योगधंदे कापसावर अवलंबून आहेत. त्या उद्योगांच्या सक्षमीकरणासाठी तसेच जो कापड उद्योग आहे त्याच्या सक्षमीकरणासाठी जर आपण योग्य प्रयत्न केले तर कापसाला चांगला दर मिळण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो. शेतकऱ्यांना पतपुरवठा करणे सुध्दा महत्वाचे आहे. त्यांना ठराविक प्रमाणात आणि ठराविक वेळेमध्ये पतपुरवठा केला तर चांगल्या प्रकारचा वेळेत मिळालेला पतपुरवठा, चांगल्या प्रकारचे मिळालेले बियाणे, चांगल्या प्रकारची वेळेत मिळालेली खते त्याचा उपयोग करुन त्यांना चांगल्या प्रकारचे नियोजन करता येऊ शकते, असे मला वाटते.

सभापती महोदय, शेजारच्या राज्यातील लोक ज्यावेळी आपल्या राज्यामध्ये कापूस घेण्यासाठी येतात त्यावेळी त्याचे निरीक्षण चांगल्या प्रकारे आपल्या प्रशासनामार्फत केले गेले पाहिजे. शेजारील राज्यातील लोक आपल्या राज्यात कमी दर आहे म्हणून दर वाढविण्यासाठी येतात. त्याचा अभ्यास करुन त्वरित आपल्या शेतकऱ्यांना सुध्दा त्यांच्यावर आधारभूत असा दर ताबडतोब देऊन आपल्या शेतकऱ्यांचे नुकसान थांबविले पाहिजे, असे मला वाटते. पाऊस जास्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

होणे आणि पाऊस लांबणे ही कारणे सुध्दा या संकटाला कारणीभूत आहेत असे लक्षात येते. म्हणून याचा अभ्यास करुन वेधशाळेच्या माध्यमातून आपण सुध्दा उपाययोजना कराव्यात असे मला वाटते. जाता जाता मला एवढेच सांगावेसे वाटते की, शेतीपूरक उद्योगाला सुध्दा प्राधान्य द्यावयास पाहिजे. विदर्भातील शेतकरी हा त्याने घेतलेल्या पिकाचे जर नुकसान झाले, त्या पिकाला जर चांगला दर मिळाला नाही तर हतबल होतो, हताश होतो, त्याचे खच्चीकरण होते आणि मग तो कोणताही मार्ग सूचत नाही, दिसत नाही म्हणून आत्महत्या करण्याकडे प्रवृत्त होतो. म्हणून आपण शेतीपूरक उद्योगांना सुध्दा चालना द्यावयास पाहिजे. दुधावर अवलंबून असणाऱ्या उद्योगांना सुध्दा चालना द्यावयास पाहिजे. मग त्यांना गाई-म्हशींचा पुरवठा असेल, शेळ्या-मेंढ्यांचा पुरवठा असेल,

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे...

कुक्कुट पालन, वराह पालन अशा वेगवेगळया योजनांचा अभ्यास करुन त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली तर त्याचा शेतकऱ्यांना चांगला उपयोग होऊ शकतो.

मध्यंतरी या सहा आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांसाठी शासनाने पंतप्रधान पॅकेज दिले होते. केंद्रीय कृषी मंत्री मा.श्री.शरदराव पवार यांच्यामुळे केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये या विषयावर निर्णय घेण्यात आला. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना शेळ्या व मेंढ्या खरेदीसाठी निधी मिळाला. राज्य सरकारकडून कर्ज पुरवठा करण्यासाठी निधी मिळाला नाही. परंतु मा.श्री.शरदराव पवार यांनी केंद्र सरकारकडून पैसे दिले. त्यातून या 6 जिल्ह्यांमध्ये 39 हजार शेळ्या व मेंढ्यांचे वाटप करण्यात आले. अनेक ठिकाणी या पॅकेजबाबत भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले. पण शेळी/मेंढीच्या वाटपात थोडासा सुध्दा भ्रष्टाचार झाला नाही. शेतकऱ्यांना शेळ्या व मेंढ्यांचा चांगला उपयोग झाला आहे. हे मला अभिमानाने सांगावेसे वाटते. त्यामुळे या प्रश्नामध्ये कोणतेही राजकारण न आणता हा महाराष्ट्राचा सामूहिक प्रश्न समजून तो सोडविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेतला पाहिजे. कारण हीच गरीब जनता आपल्या सर्वांना सहकार्य करते. त्यातून आपल्या विकासाची दारे खुली होत असतात. त्यातून राज्याचा विकास होत असतो. म्हणून राज्यातील कापूस, धान व सोयाबीन या पिकांना शासनाने चांगला भाव देऊन त्यांना आधार द्यावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

उप सभापती : या प्रस्तावावर आणखी कोणाही सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे नाही असे दिसते. या अल्पकालीन चर्चेला उद्या मंत्री महोदयांकडून उत्तर देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 41 व्या संसदीय अभ्यासवर्गासंबंधी घोषणा

उप सभापती : आपणा सर्वांना विदित आहेच की, राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे दरवर्षी नागपूर येथील अधिवेशन कालावधीत राज्यातील विद्यापीठांमधील "राज्यशास्त्र व लोकप्रशासन" या विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार यावर्षी सुध्दा दिनांक 14 ते 21 डिसेंबर, 2011 या कालावधीत 41 व्या संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर अभ्यासवर्गाचे उद्घाटन माननीय मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या सन्मान्य उपस्थितीत बुधवार, दिनांक 14 डिसेंबर, 2011 रोजी सकाळी 9.00 वाजता विधानपरिषद सभागृह, विधान भवन, नागपूर येथे होणार आहे. यासंबंधीची निमंत्रण पत्रिका व अभ्यासवर्गाची कार्यक्रम पत्रिका सर्व सन्माननीय सदस्यांना टपाल खणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उद्घाटन सोहळ्यास तसेच संसदीय अभ्यासवर्गास उपस्थित राहून व्याख्यानांचा लाभ घ्यावा.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 14 डिसेंबर, 2011 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 12 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 14 डिसेंबर, 2011 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही